म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २२१५९
REFBK-0020245
REFBK-0020245

१९२८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५(८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

॥ श्रीराम ॥

"—म्हणोनि कर्तृत्व जितुकें जालें। तें शारदा-गुणें"
—श्रीसमर्थ रामदास

# त्रिदल

२०२४५

गिरिजाबाई विंचूरकर
शांताबाई हेबळीकर
स. र. पंतसचिव

यांचा निवडक कविता-संग्रह

किंमत ५.००

प्रस्तावना-लेखक—प्रो० श्रीकृष्ण निळकंठ चापेकर,
एम्. ए., एल्एल्. बी.,
डेक्कन कॉलेज-पुणें

REFBK-0020245

श्रीरामनवमी, शके १८५१
१९२९

प्रकाशक
बाळकृष्ण पांडुरंग ठकार,
भोर [ संस्थान भोर ]


मुद्रक
अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें, नं. २

२२५५ का०२१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

अ. क्र. ३४३५५ ता. ७।०५

क्रमांक २५८ नों. दि. १५।२५।५३



श्रीमंत सरदार रामराव कृष्णराव उर्फ बाळासाहेब विंचूरक

जन्मतिथि—चैत्र शुद्ध ९
१७८९

पुण्यतिथि—माघ वद्य
१८४८

# सादर समर्पण

[ शार्दूलविक्रीडित ]

झालें त्वज्जनु आज मंगल दिनीं
श्रीरामचंद्रापरी।

चारित्र्यें परकार्यतत्पर तुवां
तत्सार्थता दाविली !।

आरामास्तव राम-नाम जपती
श्रीपार्वती-शंकर।

त्यातें जें प्रिय तें तुला 'त्रिदल' हें
अर्पीतसों सादर।

# प्रकाशकांचे दोन शब्द

**यत्कृतं यत्करिष्यामि तत्सर्वं न मया कृतम्।**
**त्वया कृतं तु फलक्त्वमेव मधुसूदन ॥१॥**

प्रस्तुत आम्ही षड्गुणैश्वर्यसंपन्न श्रीसीतारामचंद्राच्या कृपेनें आमची थोडी भूमिका बदलून आमच्या चिरपरिचित आणि रसिक अशा सर्व आश्रयदात्या बंधुभगिनींस हें "**त्रिदल**" नांवाच्या मराठी काव्यखंडाचें उपायन घेऊन भेटत आहों. भोर संस्थानचे युवराज श्री० सदाशिव रघुनाथ ऊर्फ भाऊसाहेब पंतसचिव यांच्या अनुग्रहानेंच ही भूमिका घेण्याचा सुप्रसंग आम्हांस लाभला हें आमचें परमभाग्य होय. सत्यच सांगावयाचें म्हणजे आम्हांस असें वाटतें कीं, आम्हीं सतत दोन तपें अन्यरूपानें वाङ्मय-प्रकाशनरूप उपासना केली, तिचेंच हें फल असावें. कांहीं असो, थोरांची कृपा म्हणजे "**प्रसादचिन्हानि पुरःफलानि**" अशीच ती असणार, हेंच खरें.

या "त्रिदल काव्यखंड पुस्तकांत" एकाच कुटुंबांतील मुलांमुलींच्या भावनाप्रधान अशा भिन्नभिन्न विषयांवरील कविता प्रत्येक कवितेखालीं त्या त्या कर्त्यांचीं नांवें घालून–एकत्र छापिल्या आहेत! यामुळें कोणाची कृति कोणत्या प्रकारची आहे हें सहृदय वाचकांना सहज समजण्यासारखें आहे.

याशिवाय, या काव्यखंडास, डेक्कन कॉलेज, पुणें या संस्थेंतील मराठीचे सर्वगुणसंपन्न, विद्वान् असे प्रोफेसर श्रीयुत **श्रीकृष्ण नीलकंठ चापेकर**, एम्. ए., एल्एल्. बी., यांनीं आपला अमोल वेळ खर्चून लिहिलेली स्वतःची विद्वत्तापरिपूर्ण अशी मार्मिक प्रस्तावना जोडली असल्यामुळें, पुस्तकांतील काव्यरत्नें हीं सुवर्णाच्या कोंदणांत बसविल्याप्रमाणें त्या रत्नांची शोभा हृदयंगम झाली आहे.

तसेंच या काव्यखंडावर अनेक विद्वान् साहित्यभक्तांकडून जे अभिप्राय आले आहेत, त्यांपैकीं कांहीं अभिप्राय स्वतंत्ररीतीनें छापविले आहेत. त्यानेंही या काव्यखंडाचें हृदयंगमत्व सहज प्रतीत होत आहे. या "त्रिदल" काव्यांत कांहीं पद्यें गाण्याला योग्य अशीं आहेत. त्या पद्यांचें नोटेशन संगीतरत्न प्रोफेसर श्रीयुत **कृष्णराव मुळे** यांनीं त्यांना बिलकुल सवड नसतां, वेळांत वेळ काढून करून दिलें तें पुस्तकाच्या शेवटीं दिलें आहे. यामुळें त्यांच्या या सहानुभूतीबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करीत आहोंत.

श्री० युवराज भाऊसाहेब पंतसचिव यांना काव्याभ्यासाचे कामीं व आम्हांस प्रकाशनाचे कार्यांत, सुप्रसिद्ध टीकाकार श्रीयुत रा० रा० **ना. मा. भिडे**, भोर, यांनीं जें अमूल्य साहाय्य केलें, त्यावद्दल सदर भिडे यांचे आम्ही अत्यंत आभारी आहों. कविवर्य केशवकुमार यांनीं वेळोवेळीं श्रीमंतांस जें साहाय्य केलें त्याबद्दल त्यांचाही मी फार आभारी आहें.

'त्रिदला'चे मुद्रक रा० रा० अप्पासाहेब गोखले, मालक 'विजय' प्रेस, पुणें यांनीं अत्यंत काळजी घेऊन हा काव्यखंड वक्तशीर व सुबक छापून दिल्याबद्दल ते सर्वथैव स्तुतीला पात्र आहेत.

अशा प्रकारें अनेक साहित्यभक्तांच्या कृपेनें तयार झालेल्या या काव्यखंडाचा रसिक महाराष्ट्रीय बंधुभगिनींकडून योग्य सत्कार झाला तर तो या नवीन कवित्रयाच्या उत्साहास पोषक होईल, आणि त्यामुळें त्यांना उत्साह येऊन ते उत्तरोत्तर आपल्या कृतीनें रसिकांचें रंजन करितील, अशी आशा व्यक्त करून व सर्वांचे आणखी एकवार आभार मानून आणि त्रिदल काव्यखंडाच्या तिन्ही कर्त्यांचें सर्व प्रकारें अभीष्ट पूर्ण करण्याबद्दल श्रीसीतारामचरणीं भक्तिप्रवण चित्तानें आमचें मस्तक नम्र करून, सर्वांचा निरोप घेतों. इति शम्.

पुणें, मिति चैत्र शुद्ध १<br>
बुधवार, शके १८५१<br>
शुक्लनाम संवत्सरे.

सर्वांचा सेवक व त्रिदलाचा प्रकाशक<br>
**बा. पां. ठकार, भोरकर**

# त्रिदल-सत्कार

**निरुपादानसंभारमभित्तावेव तन्वते।**
**जगच्चित्रं नमस्तस्मै कलाश्लाघ्याय शूलिने ॥**

"Sweet are the pleasures that to verse belong,
And doubly sweet a brotherhood in Song."

—*Keats.*

**कुळीं कन्यापुत्र होती जीं सात्त्विक।**
**तयांचा हरिख वाटे देवा ॥**

राजवंशीय किंवा धनवैभवसंपन्न व्यक्तींच्या ठिकाणीं विद्याभिरुचि, ललितकलादिकांविषयीं मार्मिक रसिकता, काव्यरचनाप्रवृत्ति वगैरे गुण दृग्गोचर झाले असतां, त्यांच्या गौरवार्थ " **निसर्गभिन्नास्पदमेकसंस्थं। अस्मिन् द्वयं श्रीश्च सरस्वती च** " या कालिदासोक्तीचा उल्लेख बहुधा करण्यांत येतो. श्री आणि सरस्वती यांचें विपुलप्रमाणयुक्त साहचर्य जगांत फारच विरळा आढळत असल्यामुळें त्यांच्या अपवादात्मक साहचर्यांत चांगल्या काव्यास प्रेरक व पोषक असा अपूर्वतेचा धर्म प्रतीत होतो. म्हणूनच त्यांच्या एकत्र निवासासंबंधीं श्रीकविकुलगुरु कालिदासानें सहजगत्या पण मार्मिक औचित्यानें ग्रथित केलेल्या वरील उक्तीस सर्वतोमुखीं सुभाषिताची अमरता प्राप्त झाली आहे. श्री आणि सरस्वती यांच्यामधील कौतुकास्पद बाह्य विरोधाचें जसें हें काव्यमय वर्णन सर्वपरिचित आहे, त्याचप्रमाणें तात्त्विक दृष्ट्या या विरोधाचा थोडक्यांत खुलासा व परिहार करणारा असा 'शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते' हा श्रीमद्भगवद्गीतेंतील श्लोकार्धही तितकाच हृद्य व अर्थपूर्ण आहे. चांगल्या



202645

कुळांत जन्म होणें, चांगल्या गोष्टी करण्याकडे स्वाभाविक प्रवृत्ति असणें इत्यादि गोष्टी पूर्व जन्मार्जित सत्कर्मांच्याच द्योतक होत.

यावरील दोन्ही उक्तींचें मर्म ध्यानांत घेऊन विचार केला असतां प्रस्तुतचा 'त्रिदल' नामक कवितासंग्रह, अलीकडे प्रसिद्ध झालेल्या अनेकविध कवितासंग्रहांपेक्षां कांहीं अंशीं निराळ्या स्वरूपाचा व निमित्ताचा असून, तो याच दृष्टीनें कौतुकास्पद व सत्कारार्हही आहे असें दिसून येईल.

श्रीशिवछत्रपतींच्या अपूर्व राजनीतिकौशल्याचीं अजरामर स्मारकेंच अशा **अष्टप्रधान मंडळापैकीं भोरसंस्थानचे पंतसचिव** अधिपति श्रीमंत यांच्यासारख्या प्रमुख व बुद्धिमान् संस्थानिकांच्या स्पृहणीयकीर्तियुक्त घराण्यांतील विद्यारसिक व उदयोन्मुख असे भावी शासनाधिकारी **युवराज** आणि पेशवाईच्या उज्ज्वल पण उल्कापाताप्रमाणें आकस्मिक अधःपातानें उद्वेगजनक झालेल्या उत्तरकालांत आपल्या अतुल बुद्धिचातुर्यानें तत्कालीन 'साडेतीन शहाण्यां'च्या गणनेंत अग्रेसर व सबंध शहाणे या अपूर्व मानानें विख्यात झालेल्या अशा **श्रीविठ्ठल शिवदेव विंचूरकरांच्या**, राजकार्यधुरंधरत्व व व अढळ राजनिष्ठाव्रत यांच्या अखंड व पुण्यशील परंपरेनें इतिहासविश्रुत असणाऱ्या, **सरदारी घराण्यांतील कुलीन व उदात्त-संस्कारसंपन्न अशा दोन आर्य स्त्रिया**—अशा तिघां जणांच्या काव्यरचनाप्रीतीचें व आपल्या प्रिय आणि पूज्य अशा दिवंगत वडील आप्तजनांविषयीं—कै० श्रीमंत **सरदार रामराव ऊर्फ बाळासाहेब विंचूरकर** यांच्याविषयीं—असलेल्या आपल्या भक्त्यादराचें संयुक्त द्योतक म्हणून हें 'त्रिदल' प्रसिद्ध करण्यांत येत आहे. आपल्या दिवंगत पूर्वजांच्या संतोषार्थ रूढ लोकाचारानुसार करण्यांत येणाऱ्या वार्षिक 'श्राद्ध' विधीबरोबर अशा रीतीनें कांहीं तरी वाङ्मयसेवेच्या रूपानेंही आपल्या पूर्वजांचें श्रद्धायुक्त तर्पण करण्याच्या प्रकारांत सहृदय वाचकांस सुसंस्कृत उदात्तता व अपूर्व सात्त्विक रम्यता प्रतीत झाल्यावांचून रहाणार नाहीं असें आम्हांस वाटतें.

संस्थानिक, सरदार किंवा मुत्सद्दी अशांसारख्यांनीं **श्रीशारदेची** काव्य-

रचनाद्वारां उपासना केल्याचीं अलीकडील—इंग्रजी अमदानीच्या नंतरचीं—दोनतीन प्रमुख उदाहरणें म्हटलीं म्हणजे कै० **श्रीमंत गणपतराव हरिहरराव** ऊर्फ **बापूसाहेब कुरुंदवाडकर**, श्री० सौ० **जानकीबाईसाहेब कुरुंदवाडकर** आणि बडोद्याचे माजी दिवाण **सर टी. माधवराव**—हीं होत. यांपैकीं कवित्वाच्या योग्यतेच्या दृष्टीनें श्रीमंत **बापूसाहेब कुरुंदवाडकर** यांचीं '**श्रीगणेशपुराणासंबंधाच्या आर्या**' आणि '**भट्ट-वंश काव्य**' हीं काव्यें उच्च दर्जाचीं असून श्री० सौ० **जानकीबाई कुरुंदवाडकर** यांचीं '**गणेशस्तवपर स्फुट** श्लोक, अभंग वगैरे' रचना व **सर टी. माधवराव** यांच्या **उपदेशपर आर्या** याही सरस व प्रसादपूर्ण आहेत. वरील तिन्ही थोर व्यक्तींच्या रचना स्वतंत्रपणें प्रसिद्ध झाल्या; पण प्रस्तुतचा हा काव्यसंग्रह आपल्या एका प्रिय व पूज्य वडीलजनांविषयीं भक्त्यादर प्रगट करण्यासाठीं तिघांचा मिळून संयुक्तरूपानें प्रसिद्ध होत आहे. हें हल्लींच्या **सहकारित्वाच्या युगधर्माचें** साहजिक योगायोगानें घडून आलेलें एक आनंदजनक व अभिनंदनीय निदर्शकच आहे असें म्हटल्यास हरकत नाहीं.

'**त्रिदल**' या नांवावरून 'तिघां जणांची एकत्र प्रसिद्ध होणारी काव्य-कृति' हाच अर्थ एकदम प्रामुख्यानें मनांत उभा राहतो हें जरी खरें, तरी प्रस्तुत संग्रहाच्या प्रकाशनाचें निमित्त आणि आंतील कवितांचें सामान्य स्वरूप यांच्याविषयीं थोडासा सूक्ष्म व रहस्योद्ग्राही पद्धतीनें विचार केला असतां '**त्रिदल**' या नांवाची सार्थता केवळ बाह्य संकेतापुरतीच नसून **श्रीशिवप्रिय** '**बिल्व-त्रिदला**'च्या धार्मिक कल्पनेंत व लौकिक स्वरूपांत जे विशेष दृग्गोचर होतात त्यांच्याशींही काव्यमय तुलनेच्या दृष्टीनें प्रस्तुत कविता-संग्रहाच्या अंतर्गत विशेषांचें निकट व रम्य साम्य आहे असें दिसून येईल.

'**त्रिदल**' हा शब्द उच्चारतांच पावित्र्य, मांगल्य आणि कल्याणप्रदता, **श्रीशिवप्रियता** व **ईश्वरसमर्पणबुद्धि** याच कल्पना कोणाही भाविक आर्य जनाच्या मनांत मुख्यत्वेंकरून उभ्या राहतात. अर्थात् तुकतेंच

वर सांगितल्याप्रमाणें, हा कविता-संग्रह **वाङ्मय श्राद्ध** ऊर्फ 'वंद्य पूर्वजांच्या पुण्य संस्मृतीस समर्पण केलेली सेवा' अशाच दृष्टीनें प्रसिद्ध करण्यांत येत आहे. आतां कदाचित् ज्या दिवंगत पूज्य वाडिलांस हें **'त्रिदल'** समर्पण करण्यांत आलेलें आहे, त्यांचें लौकिक नांव **'रामराव'** असें असल्यामुळें **'रामा'**स 'त्रिदला'च्या **समर्पणाचा प्रकार** कर्मठ व केवळ सगुणदैवताभिमानी धार्मिक जनांच्या दृष्टीनें सकृद्दर्शनीं अनुचित वाटण्याचा संभव आहे; पण त्याचा परिहार **स्मृति-समर्पणाच्या** श्लोकांत मोठ्या मार्मिकपणानें व काव्योत्कट रम्यतेनें करण्यांत आला आहे. शिवाय ही ईश्वरसमर्पणाची बुद्धि प्रस्तुत संग्रहांत पुष्कळ स्थळीं ठळकपणानें दिसून येते:—

'शिवचरणीं रमली मति, सखे गे !
वंधन जगिं या किती !॥
('वंधन'–पृष्ठ ९३—श्री० **गिरिजाबाई विंचूरकर.**)

**अर्पी त्रिदल तुज** परेशा !।
**शंकरा !** प्रणति तुज सुरेशा !॥
('शंकरा प्रणति तुज सुरेशा !'—पृष्ठ १३१—
श्री० **शांताबाई हेबळीकर.**)

**शिव-प्रिया** ती आम्रमंजिरी।
आम्रफलांची जननि साजिरी॥
(**'कवीचें वेड'** या कवितेस उत्तर—पृष्ठ ८३.)
**कविही मिळवी त्यांत निज स्वर।
भाट जणुं होई। चिद्रूपीं विरुनी जाई॥** (पृष्ठ ८४)

दुसरी गोष्ट:—**'बिल्व-त्रिदलों'**त ज्याप्रमाणें साधारणत: मधलें पान किंचित् मोठें व पक्करस आणि बाजूंचीं दोन्ही पानें त्या मानानें कोमल, लहानसर व नव्हाळीच्या तजेल्यानें चकचकणारीं अशीं असतात, तशाच

तऱ्हेची त्रिविधता प्रस्तुत '**त्रिदलां**'तील कवितांच्या कर्तृत्वासंबंधीं दृग्गोचर होण्याचा योग जुळून आला आहे. **त्रिदलां**तील मध्यवर्ती पानाप्रमाणें श्रीमती **गिरिजाबाई विंचूरकर** या विराजमान असून श्रीमती **शांताबाई हेवळीकर** व श्रीमंत **युवराज पंतसचिव** हे '**त्रिदलां**'तील बाजूच्या दोन पानांप्रमाणें सुशोभित दिसतात. **त्रिदलां**'तील कवितांची एकंदर संख्या ७७ असून त्यांपैकीं श्रीमती **गिरिजाबाई विंचूरकर** व **शांताबाई हेवळीकर** यांच्या अनुक्रमें १८ व १७ कविता आहेत व बाकीच्या ४२ श्रीमंत **युवराज भाऊसाहेब पंतसचिव** यांच्या आहेत. सर्वांचीं मिळून, बारीक टाइपाचीं १३० पानें झालीं आहेत. यावरून संग्रहाच्या भरदार-पणाची व भरींवपणाची चांगली कल्पना येण्यासारखी आहे. शिवाय कवितांच्या विषयवारीकडे सहज नजर टाकल्यास तिच्यांत (१) भक्तिपर, वैराग्यविषयक व चिंतनात्मक (२) सर्वसामान्य निसर्ग, जलस्थल अथवा सृष्टिसौंदर्यवर्णनपर (३) प्रसंगोपात्त होणाऱ्या मनाच्या वृत्ति, मनांत उचंबळणाऱ्या भावना व ऊर्मि आणि (४) बाल्य, प्रेमोद्भव–प्रेमोपभोग–प्रेमा-नुभव–प्रेमनिराशा–संसारांतील सुखदुःख—इत्यादि काव्याच्या सर्वसंमत प्रमुख विभागांचा समावेश झालेला दिसून येतो. कवितासंग्रहाची विविधता अधिक रसवर्धक करण्यासाठीं प्रत्येक कवीची अथवा कवयित्रीची कृति सलग व एकत्र अशी न देतां, निरनिराळ्या कवितांत प्रतिबिंबित झालेल्या भिन्न भिन्न मनोवृत्ति अथवा कवितेचा विषय किंवा त्यांतील विचारप्रदर्शन यांच्यांतील रम्यतासंवर्धक वैचित्र्य लक्षांत घेऊन त्याच्या अनुरोधानें तिघांच्या कविता सरसहा बसतील तशा लागोपाठ किंवा आलटून पालटून घातल्या आहेत. ही योजनाही काव्यरसास्वादाच्या दृष्टीनें व 'त्रिदल' या नांवाची सार्थता विशेष प्रतीत होण्याच्याही दृष्टीनें फार उचित झाली आहे असें मला वाटतें. कारण बेलाच्या '**त्रिदलां**'त तिन्ही पानांचा पृथक्पणा व लहानमोठेपणाचें वैशिष्ट्य, हे भिन्नत्वदर्शक बाह्य विशेष प्रतीत होऊनही त्याच्याचबरोबर तिन्ही पर्णांचें एकमूलाधारत्व, त्यांची एकच प्रकारची

अंतर्व्यापी जीवनरसपूर्णता आणि तिन्हीं पानें पृथक् असून तीं संकलित व सामुदायिक स्वरूपांत असतील तरच 'त्रिदल' या नात्यानें श्रीशिवचरणीं समर्पण होण्याची त्यांची धार्मिक दृष्ट्या ग्राह्यता याही 'त्रिदलां'-तर्गत गुणांची व कल्पनांची जाणीव धार्मिक मनोवृत्तिपर सज्जनांच्या मनास तात्कालिक होते.

या सादृश्याच्या अनुरोधानें प्रस्तुत कवितासंग्रहाकडे पाहिल्यास असें दिसून येईल कीं, तिघांच्याही कवितांत, सर्वसाधारण उच्चकुलीनत्वाची दर्शक अशी एक सर्वव्यापी सात्त्विकपणाची वृत्ति अधिष्ठान रूपानें व्यक्त झाली आहे. तसेंच, कवितेचा विषय व विचारप्रदर्शनाचा ओघ यांच्याशीं समरस झाल्यावर जेथें जेथें प्रसंग येईल तेथें तेथें तिघांचीही, ईश्वराविषयीं आपल्या मनांत वागणारी उत्कट भक्ति व्यक्त करण्याकडे किंवा त्याचें अगाध रचनाचातुर्य, अपार व अतर्क्य सत्तासामर्थ्य यांच्या-विषयीं आपल्या मनांत उचंबळणाऱ्या भक्त्युत्कट व साश्चर्य कौतुकयुक्त भावनांस समयोचित म्हणूनच सहजरम्य अशा तत्त्वचिंतनात्मक व काव्यमय उद्गारांची वाट करून देण्याकडे साहजिक मनःप्रवृत्ति दिसून येते. तिघांच्याही कृतींत सारखाच दृग्गोचर होणारा असा तिसरा विशेष म्हटला म्हणजे भावनेची तीव्र उत्कटता व ती पूर्ण व्यक्त करण्याची सावेश उत्सुकता हा होय. तिघांच्या अंतर्मनोवृत्तींत असें साम्य असल्यामुळें, त्यांच्यापैकीं दोघादोघांच्या एकाच विषयावरील कांहीं कवितांची तुलना केली असतां, समानधर्मी असूनही एकाच विषयासंबंधीं निरनिराळ्या मनुष्यांनीं केलेल्या विचारप्रदर्शनांत अथवा भावनाविष्कारांत व्यक्तिवैशिष्ट्याच्या दृष्टीनें कसें रम्य वैचित्र्य येतें, त्याचा चांगला प्रत्यय येतो. ['भागीरथी', 'यमुना' व 'श्रीकृष्ण–राधा' विषयक तिघांच्या कविता पहा. 'विधवेचें स्वप्न' व 'स्वप्न' या दोन कवितांची तुलना करा.]

याखेरीज, भाषाशैलीच्या दृष्टीनें पाहतां, तिघांचीही पद्यरचना साधारणतः प्रसादपूर्ण व सुश्लिष्ट अशी आहे. तथापि कित्यक ठिकाणीं ऱ्हस्वदीर्घांचे,

शब्दांच्या अनुचित प्रयोगाचे, यतिभंगाचे वगैरे ढोबळ दोष राहून गेले आहेत. (उदा॰ मयुर, आकाश-वत्ति, स्वरुपि, वगैरे). जुन्या व नव्या सत्कवींच्या कृतींतील कल्पना, शब्दयोजना, आणि विचार प्रदर्शनादिकां-संबंधीं ज्या कांहीं चांगल्या गोष्टी आहेत त्या आस्थायुक्त परिशीलनानें आत्मसात् केल्याची साक्ष तिघांच्याही रचनेंत अनेक स्थळीं स्पष्टपणें पटते; इतकी कीं केवळ वरवरच्या दृष्टीनें पाहणारास 'त्रिदळां'तील कांहीं कविता, विषयांची निवड, शब्दांची ठेवण व विचार प्रदर्शनाची शैली या बाबतींत एकाद्या विशिष्ट कवीचें अनुकरण करण्याच्याच हेतूनें प्रेरित होऊन, कवींनीं अथवा कवयित्रींनीं केल्या आहेत कीं काय, असा संभ्रम होतो. चांगल्या कवींच्या कृतींतिल कांहीं विशेष गोष्टींचा दृढ संस्कार आपल्या मनावर होणें व तो कित्येक वेळां आपल्यासही जाणीव न होतां आपल्या काव्यांत उत्कट प्रतिबिंबित होणें हें मानसशास्त्रदृष्ट्या अगदीं साहजिक व अपरिहार्य आहे. ही महत्त्वाची गोष्ट नेहमीं ध्यानांत वागवून कोणाही कवीच्या कृतीचें निरीक्षण करण्याची आपण संवय केल्यास, असा अनिच्छा-मूलक व अज्ञातानुकरणाचा अंश वजा करूनही, कवींच्या स्वतःच्या अभिनव कल्पनांचा व रम्य कवित्वाचा असा पुष्कळ अंश कोणत्याही चांगल्या कवितेंत खऱ्या सहृदय वृत्तीच्या वाचकांस आढळल्यावांचून रहाणार नाहीं.

काव्यरचनेची स्वाभाविक प्रवृत्ति व मुख्यतः केवळ आत्मविनोदनार्थ त्या प्रवृत्तीचा प्रसंगानुसार केलेला **कलाकौतुकी** (Amateur; Dilettante) **विलास** अशा दृष्टीनें 'त्रिदळां'तील दोघां कवयित्रींच्या कविता पाहिल्यास, त्या कविता खरोखर काव्यगुणपूर्ण, वेळोवेळीं मनांत उद्भूत होणाऱ्या उत्कट व तीव्र भावना, गंभीर विचारतरंग, ललितरम्य मृदु कोमल कल्पना-विहार, उद्दीपित, सुखित, किंवा आर्त, व्याकुल, दुःखद्रवित मनोवृत्ति—यांच्या यथार्थ व व्यक्तिवैशिष्ट्ययुक्त प्रतिबिंबरूप आहेत अशी कोणाही रसिक वाचकास प्रतीति आल्यावांचून राहणार नाहीं अशी आमची खात्री आहे.

'त्रिदलां'विषयीं सुचलेल्या कांहीं सामान्य विचारांचें येथवर विवेचन केलें. आतां त्याच्या त्रिविध कर्तृत्वाच्या दृष्टीनें त्यांतील कवि किंवा कवयित्री यांच्या कवितांच्या विशिष्ट स्वरूपाचें दिग्दर्शन करूं.

वर नुकतेंच म्हटल्याप्रमाणें, 'त्रिदलां'तील मध्यवर्ति पर्णाचे स्थानीं श्रीमती **गिरिजाबाई विंचूरकर** या विराजमान असून त्यांच्या कवितेंत साहजिकच उत्कट ईश्वरभक्तिप्रवणता, विचार व कल्पना यांचें प्रौढत्व आणि गांभीर्य, व प्रसंगविशेषीं वैराग्य आणि औदासिन्य यांची छटा, व सामान्यतः प्रशांत, सात्त्विक व तत्त्वचिंतनात्मक वृत्ति इत्यादि गुण प्रतिबिंबित झालेले दिसतात. (उदाहरणार्थ–पृष्ठ २ वरील 'त्रिदल' ही कविता पहा.) काव्य करण्याच्या उत्कट इच्छेनें कवयित्री काव्यरचनेसाठीं सिद्ध होऊन बसल्या असतां, काव्यास प्रेरणा व स्फूर्ति देणारी अधिष्ठात्री देवता जी प्रतिभा तिचा तात्कालिक अनुग्रह अथवा प्रिय व पूज्य व्यक्तींचें सान्निध्य या दोन गोष्टींची अनुकूलता नसल्याचें शल्य त्यांच्या मनास टोंचून राहतें आणि बाह्यतः बुद्धिसंस्काराच्या जोरावर 'त्रिदल' कवितेची रचना पूर्ण झाली तरी अखेर "गुंफिलें त्रिदळ काव्याचें। परि शंकर भुवरि नाहीं!" हा दुःखस्मृति-दायक व औदासीन्यवर्धक विचार आकस्मिकपणें कवयित्रींच्या मनांत उभा राहून, त्या कवितेची खेदपूर्णच परिसमाप्ति होते! आणि यांतच कवयित्रीच्या विशेष गुणांचें व वृत्तींचें खरें स्वारस्य प्रतिबिंबित झालेलें आहे! नेटानें किंवा अट्टाहासानें काव्य करण्यास कवि बसला व इतर शब्दादिकांची सामग्री जरी त्याच्या मनांत जय्यत सिद्ध असली, तरी काव्यास प्रेरक अशा प्रतिभेची स्फूर्ति जर त्यास अनुकूल नसेल तर त्याची स्थिति कशी होते व त्याची काव्यनिर्मितीही कशा प्रकारची होते हें दर्शविण्यासाठीं चांदण्या–चंद्र, मेघमंडळ व चपला, पद्म व भ्रमरगुंजारव, केतकी–नाग, देवता व भक्ति वगैरेंच्या द्वंद्वात्मक कल्पना फार हृद्य व सहजरम्य आहेत, आणि उत्कर्षा-च्या क्रमानुसार शेवटीं **'त्रिदल व शंकर'** यांच्यासंबंधाची कल्पना ग्रथित केल्यानें तर, कवितेचें पर्यवसान भक्त्युत्कटता व पतिनिष्ठा यांच्या

भावनोद्दीपक संमिश्रणानें हृदयस्पर्शी व उदात्त परिणामकारक झालें आहे! पृष्ठ १४ वरील 'यमुना' या कवितेंत यमुना नदीच्या वर्णनपर अशा निरनिराळ्या कल्पनांचें ललितरम्यत्व तर आनंददायक आहेच; पण त्याच्या-बरोबर कवयित्रीच्या आत्मलक्षी किंवा अंतर्मुखवृत्तिदर्शक ( Subjective ) अशा विचारप्रदर्शनाची व तत्सूचक सहजगत्या योजलेल्या शब्दांची चारुता अपूर्व आल्हादजनक आहे व त्याच दृष्टीनें शेवटच्चीं दोन कडवीं सार्थीसुर्धीच पण आवेशयुक्त व भावनोत्कट असल्यामुळें, कवितेचें पर्यवसान रमणीय व सात्त्विक परिणामकारक झालें आहे. शेवटच्चीं दोन कडवीं अशीं:—

जान्हवी **प्रसन्ना** अति। ती **शुभ्रच सरस्वती**।
ही **प्रशान्त** यमुना **सती**। सखे गे!॥
गे सखिनों **वेगें जाऊं। पति-प्रेमालिंगन देऊं**!॥
**तत्स्वरूपें मिळुनी राहुं। सखे गे**!॥ ( साभिप्राय शब्द ठळक घातले आहेत.)

यांखेरीज 'कुसुम', 'मागणें', 'बांसरी', 'राधा', 'आम्रमंजिरी', कवींचें वेड', 'बंधन', 'विश्वमोहिनी', 'स्वप्न' या कवितांतही काव्यगुणाच्या दृष्टीनें शब्द किंवा कल्पना यांचें चारुत्व रसिक वाचकांस प्रतीत झाल्यावांचून राहणार नाहीं.

श्रीमती **शांताबाई हेबळीकर** यांच्या कवितांत उत्कट भावना, कोमल व मार्दवयुक्त वृत्त्याविष्कार, आकस्मिक विधिदुर्विलसितामुळें अल्पवयांतच सर्व जीवनास औदासीन्यानें व्यापून टाकणाऱ्या व स्त्रीजातीस दुःसह अशा अवस्थेचा अशनितुल्य आघात हृदयांतरीं जाऊन भिनल्यामुळें, वरून झांकून टाकलेल्या विहिरींतही आंत जिवंत असणाऱ्या उदकाच्या तिमिर-मग्न वास्तव्याप्रमाणें, प्रत्येक कवितेच्या विषयास औदासीन्याच्या अदृश्य आवरणानें घेरल्याचा भास होतो; आणि विषयाच्या ओघानुसार, त्या वृत्तीस वाव मिळतांच हृदयस्पर्शी व करुणोत्कट काव्योद्गारांच्या द्वारें त्या

आवरणाचा भेद होऊन आंतील वृत्तींचें दर्शन वाचकांच्या मनास जास्तच सद्गदित व गहिंवरयुक्त करितें !

सारांश, ज्याप्रमाणें, उच्च आनुवंशिक संस्कारादिकांच्या योगानें आणि सद्बोध, सद्वाचन, सत्सहवास यांच्या साहाय्यानें अढळ ईश्वरनिष्ठा सद्गुरुमाहात्म्य, विवेकयुक्त गांभीर्य, कुलीनत्वप्रेरित सात्त्विक सहनशीलता इत्यादि वृत्तींचे बीजांकुर कवयित्रीच्या मनोभूमींत रुजून विकसित झालेले दिसतात, त्याचप्रमाणें प्रत्यक्ष सांसारिक अनुभवाच्या दुर्धर दुःखपूर्णतेमुळें, जगांतील एकंदर विषयांकडे संव्यथापूर्ण (Sympathetic) भावनेनें पाहण्याची दृष्टि आणि बाह्य विषयांनीं मनावर होणाऱ्या सूक्ष्म व मार्दवयुक्त संस्कारांनीं सुद्धां मनोवृत्ति चटूकन् आर्त व व्याकुल होण्याइतकी उदात्तभक्तिपूर्ण व विश्वप्रेमसंभृत झालेली दिसते. अशा द्विविध अंतर्वृत्तींच्या मिश्रणानें श्रीमती **शांताबाई** यांच्या सर्व कवितांत, मृदु लालित्ययुक्त रचनासौष्ठव, कोमल व करुणोत्कट भावनाप्रदर्शन, सर्वव्यापी औदासीन्य किंवा अंतःखेदपूर्ण मननशीलता व उदात्त तत्त्वप्रतिपादन यांचें आविष्करण झालेलें पहावयास सांपडतें. (उदा० 'तरंग', 'राधेचें वेड', 'वेणुनाद', 'कलिका,' 'सेवाष्टक' 'गुरुगुज', 'याचना' व 'ज्ञानेश्वर' या कविता पहा) या सर्व सामग्रीच्या शिरोभूत किंबहुना, ह्या सर्व सामग्रीचें अंतर्जीवनसर्वस्वच अशी जी **खऱ्या काव्यप्रतिभांशाची जोड** तीही श्रीमती **शांताबाई हेबळीकर** यांस **श्रीशारदे**च्या कृपाप्रसादानें लाभली असल्यामुळें, त्यांच्या बहुतेक सर्व कविता उच्च प्रतीच्या काव्यगुणांनीं तळपणाऱ्या व सहृदय काव्यरसिकांस सुखित व सद्गदित करणाऱ्या अशा आहेत असें सर्वसामान्य विधान केल्यास त्यांत कांहीं अत्युक्ति किंवा अप्रयोजक प्रशंसा होईल अशी मला भीति वाटत नाहीं. उलट **श्रीमहाराष्ट्र शारदे**च्या विशेष आवडत्या व खऱ्या काव्यप्रतिभासंपन्न अशा विद्यमान अपत्यवृंदांत श्रीमती **शांताबाईंना** बरेंच वरचें स्थान मिळेल असें म्हटल्यास तें वस्तुस्थितीस धरूनच होईल.

'त्रिदलां'तील कनिष्ठ म्हणून विशेष कौतुकास्पद **दल-रूप** म्हटले म्हणजे श्रीमंत **युवराज पंतसचिव** हे होत. हे **डेक्कन कॉलेजांत** बी. ए.च्या वर्गांत असून त्यांचा **ऐच्छिक विषय इंग्रजी व मराठी भाषा** हा आहे. अर्थात् कॉलेजीय शिक्षणक्रम आणि मराठी काव्यव्यासंग या दोहोंच्याही दृष्टीनें ते अजून विद्यार्थीदशेंतच आहेत. तेव्हां त्यांच्याविषयीं किंवा त्यांच्या काव्याविषयीं मला नेहमीं सकौतुक आत्मीयपणा वाटणें साहजिकच आहे. तथापि प्रस्तुत **'त्रिदल-सत्कारां'**त त्यांच्या कवितांविषयीं जो उल्लेख यावयाचा तो सर्व सामान्य स्वरूपाचा असणें हेंही तितकेंच उचित व स्वाभाविक होईल, ही गोष्ट मीं सुज्ञ वाचकांस मुद्दाम सांगितली पाहिजे असें नाहीं.

'त्रिदलां'तील एकंदर ७७ कवितांपैकीं ४२ म्हणजे **जवळ जवळ-दोन तृतीयांश कविता, श्री० युवराज पंतसचिव यांच्या आहेत;** व त्यांत त्या मानानें विषयांचें वैचित्र्यही पुष्कळ आहे, हें **अनुक्रमणिके**वरून ओझरती नजर टाकल्यास कोणाच्याही सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. काव्यगुणाच्या दृष्टीनेंही पाहतां **युवराज भाऊसाहेबांच्या काव्यांत खऱ्या प्रतिभेची चमक** पुष्कळ ठिकाणीं दिसून येते, यांत शंका नाहीं.

**'गान'** (पृष्ठ२६) या कवितेंतील, मुखरूपी नीडांतून निघणाऱ्या प्रीतिरूप शुकाच्या गानाची, किंवा स्वानुभवाशिवाय रचलेल्या प्रेमविषयक गीता संबंधीं 'ज्योतीवांचुनि दीपपंक्ति' ही उपमा (पृ.३२) घोड्यावर बसले असतां, हवेंत उडणाऱ्या शुभ्र फेट्याच्या पदरास नील सरोवरांत पोहणाऱ्या हंसाची, अथवा वायुवेगामुळें नम्रतेनें वांकणाऱ्या तृणास, लज्जाकुलतेमुळें अधोवदन-युक्त 'नवोढे'ची ( नूतनवधूची ) दिलेली उपमा, (पृष्ठ७३) इत्यादि स्थलें **युवराज भाऊसाहेब** यांच्या ठायीं असलेल्या काव्यप्रतिभेच्या रम्य आविष्काराचीं सहजगत्या वाचकांचें लक्ष वेधणारीं अशीं उदाहरणें होत.

तसेंच **वामन, मोरोपंत, केशव-सुत, गोविंदाग्रज** वगैरे प्राचीन अर्वाचीन सत्कवींचें आस्थायुक्त अध्ययन केल्यानें पद्यशैलीच्या बाबतींत

मराठी ग्रंथ संग्रहालय
अ. क्र.

झालेला सुपरिणाम **'भागीरथी'**, **काव्यस्फूर्ति'**, **'स्फूर्ति-देवता'**, **'भोळा जीव'**, **ज्योति'**, **दैव**, **'श्रीकृष्णस्तव'**, **'सीतालक्ष्मण-संवाद'** या कवितांतील सुश्लिष्ट व नादमधुर शब्दरचना, प्रसादपूर्ण अभिनव कल्पनाविष्कार, सहजरम्य अंतर्ध्वनि, इत्यादि विशेषांच्या द्वारें चांगला प्रतीत होतो. **'वसंत-रमणी'**, **'वनविहार'**, **'सुख-धाम** इत्यादि कवितांत निसर्गाची स्वानुभव-युक्त व सूक्ष्म निरीक्षणात्मक वर्णनें आणि यथोचित उपमा-उत्प्रेक्षादिकांनीं हृद्य व मनोहर झालेल्या उज्ज्वल पंक्ती विपुल दिसून येतात. **'वनिता व कविता'** या कवितेंतील मुग्ध प्रणयविनोदाची छटा चांगली साधली आहे. त्याचप्रमाणें काव्यविषयाच्या ओघानुसार ग्रथित केलेले गंभीर विचार किंवा तत्त्वप्रतिपादक उद्गारही पुष्कळ स्थळीं फार मार्मिक व परिणाम-कारक उतरले आहेत.


हें सर्व कौतुकास्पद आहे यांत शंका नाहीं. परंतु अजूनही काव्य-रचनेच्या कित्येक महत्त्वाच्या अंगांसंबंधीं विशेष सुधारणा होणें इष्ट असून त्याच्यासंबंधीं शक्य तितकी दक्षता बाळगणें काव्योत्कर्षाच्या दृष्टीनें अत्यंत अवश्य आहे. शब्दांच्या यथार्थ उपयोगाविषयींची रसिक विवेचक दृष्टि, प्रत्येक कल्पना व प्रत्येक विचार पूर्णपणें स्पष्ट व असंदिग्ध रीतीनें व्यक्त करण्याचा सराव, व्याकरणदृष्ट्या व भाषाप्रयोग ( idiom ) दृष्ट्या अशुद्ध, कर्णकटु किंवा रसापकर्षक असे शब्द व वाक्यरचना आणि पद्य-रचनेंतील वर्णांचें ऱ्हस्वदीर्घत्व, यतिभंग वगैरेसंबंधीं दोष टाळणें व शृंगार-विषयक कल्पना फार उत्तान किंवा अनुचितध्वनिसूचक न होतील अशा-विषयीं विशेष जागरूकता बाळगणें, इतकी गुणसामग्री त्यांच्या कवितेंत सध्यां दिसून येते त्यापेक्षांही अधिक वाढत्या प्रमाणाची संपादन करण्याचा **युवराजांनीं** सोत्साह प्रयत्न करावा. म्हणजे सध्यांच्या त्यांच्या विकासो-न्मुख काव्यशक्तीस अधिक ओज व आल्हादजनक रम्यता हीं निःसंशय प्राप्त होतील असें माझें प्रांजळ मत आहे. **'त्रिदलां'**तील त्यांच्या कवि-तांत वरील बाबतींसंबधीं जीं कांहीं प्रमादस्थळें राहून गेलीं आहेत तीं

साधारण वाचकांच्याही ध्यानांत येण्यासारखीं आहेत व हे दोष आपल्या पुढील काव्यरचनेंत श्रीमंत युवराज पंतसचिव यांस सहज टाळतां येण्यासारखे आहेत. म्हणून अशा दोषांचा येथें मुद्दाम निर्देश करण्याचें प्रयोजन नाहीं.

याप्रमाणें 'त्रिदळा'चें सामान्य स्वरूप आहे. केवळ वाङ्मयाच्या किंवा काव्य-समीक्षेच्या निस्पृह दृष्टीनें पाहिल्यास, सदर्हू संग्रहांत निरनिराळ्या वृत्तीच्या वाचकांस निरनिराळ्या प्रकारची न्यूनता किंवा कमीअधिक दोष दिसणें साहजिक आहे, हें जरी खरें; तरी आरंभीं सांगितल्याप्रमाणें या संग्रहाच्या कर्तृत्वासंबंधीं जी विशेष अपूर्व व अभिनंदनीय गोष्ट आहे ती ही कीं, आमच्यांतील राजसत्तासंपन्न संस्थानिक किंवा पूर्वागतवैभवाढ्य सरदारवर्ग यांच्यांतील उच्च संस्काराच्या व्यक्ति स्वतःच्या स्फूर्तीनें श्रीशारदेच्या पवित्र मंदिरांत सर्वसाधारण 'इतरे जनां'शीं समत्वाचें नातें पत्करून, प्रवेश करीत आहेत व तिच्या चरणीं अक्षर व उज्ज्वल असे सुवर्णांकित शब्दालंकार आणि शाश्वत सुगंधपूर्ण अशीं काव्यमय वाक्पुष्पें यांनीं युक्त अशी वैभवशाली साहित्यपूजा अत्यंत शालीनतेनें समर्पण करण्यास सोत्साह पुढें येत आहेत. ही गोष्ट सांप्रतकालीन 'जनता-जनार्दनीय' युगाच्या वर्धिष्णु प्रभावाची द्योतक व समताधिष्टानारूढ भावी विश्वैक्याच्या मंगलदिनाची सूचक अशी रम्य उषःप्रभाच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. याच सात्त्विक व सौहार्दपूर्ण भावनेनें महाराष्ट्रांतील काव्यरसिक सज्जन या 'त्रिदळा'चें सानंद व सकौतुक स्वागत करतील अशी आशा व्यक्त करून, 'त्रिदळ-सत्कारा'ची ही गोड कामगिरी येथेंच पुरी करितों.

"दुरितांचें तिमिर जावो।
विश्व स्वधर्म-सूर्यें पाहो॥
जो जें वांछील तो तें लाहो।
प्राणिजात॥"—ज्ञानेश्वर.

पुणें
वैशाख कृष्ण द्वितीया
शके १८५१ शनिवार,
(तारीख २५।५।२९.)



# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| श्रीशारदास्तवन ... .... ... ... ... | १ |
| त्रिदल ... ... ... ... ... | २ |
| उषःकाल ... ... ... ... ... | ३ |
| तरंग ... ... ... ... ... | ५ |
| बाल्य ... ... ... ... ... | ६ |
| कुसुम ... ... ... ... ... | ८ |
| चवथीची चंद्रकोर ... ... ... ... | ९ |
| भागीरथी ... ... ... ... ... | ११ |
| यमुना ... ... ... ... ... | १४ |
| वसंत-रमणी ... ... ... ... ... | १५ |
| वन-विहार ... ... ... ... ... | १८ |
| आम्रमंजिरी ... ... ... ... ... | २२ |
| सागर-सहल ... ... ... ... ... | २३ |
| काव्यस्फूर्ति ... ... ... ... ... | २६ |
| प्रेमोद्भव ... ... ... ... ... | २७ |
| कृष्णाचें गाणें ... ... .... ... ... | २८ |
| मार्गावर ... .... ... ... ... | २९ |
| राधेचें वेड ... .... ... ... ... | ३१ |
| गान ... .... ... ... ... | ३२ |
| प्रणय-पत्रिका ... ... ... ... ... | ३३ |
| स्फूर्तिदेवतेस ... ... ... ... ... | ३४ |
| " सोडी मी तुज ना आतां ! " ... ... ... | ३६ |
| वेणु-नाद ... .... ... ... ... | ३९ |
| बांसरी .... ... ... ... ... | ४० |
| रंग-पंचमी ... ... ... ... .... | ४१ |
| प्रेमाची ताटातूट ... ... ... ... ... | ४३ |
| विरही राधेचे उद्गार ... ... ... ... | ४४ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| राधा | ४६ |
| प्रेमाचे बोल | ४९ |
| प्रिया-विरह | ५१ |
| सवदा | ५३ |
| विधवेचें स्वप्न | ५४ |
| स्वप्न | ५६ |
| संक्रमण | ५७ |
| चुकलेलें वांसरूं | ५८ |
| वंचिता | ६१ |
| पोपट | ६३ |
| लिहिलें नाशिबांत रडें | ६४ |
| लतिका | ६७ |
| कलिका | ७० |
| सुख-धाम | ७२ |
| "गा कविराया !" | ७६ |
| पिंजऱ्यांतील पोपटास | ७७ |
| ज्योति | ७९ |
| संशय-नाटिका | ८० |
| वनिता आणि कविता | ८२ |
| "कवींचें वेड" या कवितेस उत्तर | ८३ |
| दैव | ८५ |
| भोळा जीव | ८६ |
| मागणें | ८७ |
| वाढदिवस | ८९ |
| संसाराटवी | ९० |
| विश्रान्ति | ९२ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| बंधन | ९३ |
| बरळणें | ९४ |
| चिलया बाळ | ९७ |
| अभिमन्यु | ९८ |
| संशय | १०० |
| सीता-लक्ष्मण संवाद | १०१ |
| विश्वमोहिनी | १०५ |
| भवानी | १०७ |
| निसर्ग-सुंदरीचा साज | १०९ |
| शांततेचें हास्य | ११० |
| संसार-सागर | ११४ |
| 'तुझी कृपा म्हणजेच सुख !' | ११६ |
| सेवाष्टक | ११७ |
| तुझी आस | ११९ |
| श्रीकृष्णस्तव | १२० |
| मानसपूजा | १२२ |
| गुरु-गुज | १२३ |
| करुणा | १२४ |
| याचना | १२५ |
| ध्यान | १२६ |
| ज्ञानेश्वर | १२७ |
| अभंग | १२८ |
| अभंग | १३० |
| " शंकरा, प्रणति तुज सुरेशा !" | १३१ |
| स्वर-ताल-लेखन | |
| प्रथमचरणाची सूचि. | |

# सुवर्ण-चंपक

## ( प्रो० चापेकर यांची कविता )

प्रो० **श्रीकृष्ण निळकंठ चापेकर,** एम्. ए., एल्‌एल्. बी. ( डेक्कन कॉलेज ) हे सुप्रसिद्ध वक्ते व अभियुक्त लेखक म्हणून महाराष्ट्रास परिचित आहेतच. ह्या पुस्तकानें उत्कृष्ट कवि या नात्यानें त्यांचा महाराष्ट्रास परिचय होत आहे. ह्या काव्यसंग्रहांतत्यांच्या निवडक कवितांचा संग्रह केला असून तो संग्रह श्री० **रा. प्र. कानिटकर, एम्. ए.** यांनीं संपादन केला आहे. " **सुवर्ण चंपका** "स श्रीमंत ना० **दादासाहेब खापर्डे यांची** काव्यवाङ्मयविवेचनपर **रसवती व ओजस्वी प्रस्तावना** आहे. अभियुक्त काव्यवाङ्मयांत प्रस्तुत पुस्तकानें मौल्यवान् भर पडल्याचें अनेक रसिक काव्यसमीक्षक प्रांजलपणें कबूल करतात. '**कवि-परिचय**' जोडल्यानें पुस्तकाच्या उपयुक्ततेंत भर पडली आहे. **किंमत १ रुपया.**

**केसरी**—" हा नवीन कवितासंग्रह पुष्कळांच्या आश्चर्यास तसा आनंदासही कारण होईल यांत शंका नाहीं. सर्व कवितांची भाषा डौलदार, अलंकारिक, गंभीर व जुन्या वळणाची आहे. पुस्तक हौसेनें प्रकाशित केलें असल्यामुळें त्याची अंतर्बाह्य सजावट-ही मनोहर झाली आहे."

**ज्ञानप्रकाश**—" **सोनचाफ्याची** दर्शनीयता, आकर्षकता आणि आस्वाद, हे गुण प्रो० **चापेकरांच्या** प्रस्तुत कवितासंग्रहांत चांगल्या प्रकार प्रतीत होतात. व्यक्तिविषयक सच्छील, कौटुंबिक नीतिमत्ता, समाजसुधारणा आणि आध्यात्मिक जीवन या सर्वांच्या वाढीला एकसमयावच्छेदेंकरून काव्याची मदत होऊं शकते ही गोष्ट पुष्कळ कवि विसरतात. प्रो० **चापेकरांना** ही जाणीव आहे, असें त्यांच्या कवितेवरून दिसून येईल."

**महाराष्ट्र-साहित्यपत्रिका**—" प्रो० चापेकर यांच्या कविता चांगल्या आहेत. श्रुतिमनोहर व प्रसादयुक्त बनल्या आहेत."

**पुस्तकें मिळण्याचें ठिकाणः—प्रभाकर** आणि **मंडळी**

७८८ सदाशिव पेठ, पुणें (२)

# श्रीशारदास्तवन

[ मंदारमाला ]

श्रीशारदा अंकिं घेऊन वीण्यास
सत्काव्यगानास आरंभिते
हृत्कंज उत्फुल्ल सत्काव्यकासारिं
ताला धरोनी करी नृत्य तें।
ऐकूनि वीणारवा त्या समुत्कंठ
होती मदीयान्तरीं भावना
कंजांतला वास अष्टां दिशांमाजिं
सामावुनी वाढवी कल्पना ॥
दिक्पाल विन्मोहुनी भ्रष्ट कार्यास
सौगंध जाई दिशा लंघुनी
ब्रह्माण्ड नाचे नभःश्रीमधें प्रेम–
रज्जूंत गानें पडे बंधनीं।
श्रीशारदेचें तरी गान चालेच
ताला मनाच्या धरोनी जवें
हृत्सारसें हीं कवी–मानसें खेळ
अंकावरी खेळती जे नवे ॥
तारागणां गुंफिलें काव्य–हारांत
वाग्देविनें सुस्वरें गाउनी
सप्तस्वरीं डोलवीली धरा सर्व
आनन्द–सिन्धू उफाळे जनीं
तो मोर नाचे उभारी पिसाऱ्यास
ब्रह्माण्ड सोल्हास नाचें तसें
अंबे! कृपावीक्षणें ह्या पसाऱ्यास
पाही; तुला बाल वंदीतसे ॥

—स. र. पंतसचिव

मराठी ग्रंथ सं...
अ. क्र. ३३३४४

# त्रिदळ

[ चाल—उद्धवा शांतवन कर जा० ]

बैसलें काव्य करण्याला, परि अंतःस्फूर्ती नाहीं ।
गगनांत चांदण्या जमल्या, परि चंद्र उगवला नाहीं ॥
नभ आक्रमिलें मेघांनीं, परि चपला चमकत नाहीं ।
कमलिनी सरोवरिं फुलल्या, परि षट्पद गुंगत नाहीं ॥

दरवळे गंध केतकिचा, परि तक्षक डोलत नाहीं ।
शारदा छेडिते तारा, परि मयूर नाचत नाहीं ॥
चित्रार्थ जमविले रंग, परि कल्पक तेथें नाहीं ।
प्रत्यूषीं स्तोत्रां म्हणते, परि सुस्वर कंठचि नाहीं ॥

पूजिते नित्य देवाला, परि भक्ती लेशहि नाहीं ।
आभरणीं वनिता नटली, परि भालीं कुंकुम नाहीं ॥
सम्राट तिन्ही जगतांचा, परि भूषण बालक नाहीं ।
गुंफिलें त्रिदळ काव्याचें, परि शंकर भूवरि नाहीं ॥

—गिरिजाबाई विंचूरकर

# उषःकाल

[ राग–काफी–जंगला, ताल–दादरा.]

[ चाल–लग्नाला जातों मी० ]

उदयाचलिं रवि आला उजळल्या दिशा ॥
तिमिराची झालि पहा काय ही दशा ! ॥ ध्रु० ॥

लाली पूर्वेस चढत ।
अंधकार नष्ट होत ।
तारागण लपुनि जात । पातली उषा ॥

शीतपवन मंद सुटत ।
नलिनींना कंप देत ।
सृष्टी आनंदभरित । डोलते मुदा ॥

विहगवृंद गान-निरत ।
मनुजांचें भान हरत ।
ईशाचें स्तवन करित । गोड गायनें ॥

संमार्जनिं युवति सक्त ।
ब्राह्मणगण पूजनरत ।
छात्रचमू पाठ म्हणत । उच्च वाणिनें ॥

ऐकुनि खग-गानातें ।
विटपी पुष्पान्वित ते ।
सवितोदयिं प्रणतीतें । करिति मुदभरें ॥

सौरभ कुसुमांचा हा ।
पवन हरी सकल पहा ।
प्रमुदित करि जनमन हा । गंध वाहुनी ॥

निघति युवति स्नाना या।
तटिनीवरि त्या जाया।
कुक्कुटरव परिसुनियां। शीघ्र चालती॥

भ्रमरयुक्त नलिनी ती।
पाहुनि रवि तो वियती॥
मुक्त करी भ्रमर-तती। दुःखिता सती॥

जनसमूह कार्य करित।
देवालयिं भक्त जमत।
श्रवणिं वेदघोष पडत। शुद्ध करितसे।

पर्णावर दंव दिसतें।
मौक्तिकमणि वाटे तें॥
धरणी अंगीं धरिते। दिनकरार्थ ही॥

लाल शालु लेवुनियां।
पत्युत्सुक होउनियां॥
सृष्टी आनंदुनियां। ठाकली उभी॥

—स. र. पंतसचिव.

* या पद्याचें स्वरताल–लेखन शेवटीं पहावें.

# तरंग

[ चाल–चंद्रकान्त राजाची० ]

प्रभातकाळीं सहज विहरतां उद्यानीं गेलें।
दिव्य खरोखर शोभा तेथिल पाहुनि मन रमलें ॥

विचार आला क्षणांत मानसिं असुखद परि एक।
मनुजच कैसा वाटे देवा! करी नित्य शोक! ॥

नदी वाहते कलकल करुनी रव आनंदानें।
सुशीत वायुहि लता, पल्लवां फुलवी प्रेमानें ॥

गुलाबकलिका पहा सुखानें हंसते किति गोड।
सदाच मग कां मानव करितो दुःखाची जोड! ॥

पक्षि नाचती स्वच्छंदानें गगनीं संचरती।
आनंदें मृगबाल विचरती पावुनि सौख्य अती ॥

या सृष्टींतिल वस्तुवस्तु ही सौख्यीं कीं रमली।
परी आत्मकृत दुःखसागरीं नर-मति कशि पडली? ॥

निसर्गरचना अहा! किती ही मधुर सौख्यकारी।
निसर्ग इच्छी सकलहि नांदो सदा हर्ष-शिखरीं ॥

खंति वाटते परी मनुजकृत दुःखांना बघुनी।
कसा होतसे अपुला आपण मानव शत्रु जनीं! ॥

परमेशाचें वचन पाळिते ही सगळी सृष्टी।
सुज्ञ म्हणविते मानव-जाती परि कां हो कष्टी? ॥

—शांताबाई हेबळीकर.

# बाल्य

[ चाल—केशवकरणी अघटित लीला० ]

बालपणांतिल सौख्य मनाला मोहवि कितितरि परी।
येइ ना त्याची कोणा सरी ॥

कर्दमिं रांगें मूल आइचें सुंदर दिसतें मला।
अपेक्षा कसली ना आइला ॥

धांवें दुडुदुडु, खुळखुळ वाजे करगोटा कमरिंचा।
माधुरी अनुपम ये त्या वचा ॥

बालक ओढी रेघोट्यांना, चित्रकाव्य काढतो।
त्यामधें गूढ अर्थ मावतो ॥

अकारणोद्भव हास्य मुलाचें पितरांना तोषवी।
तयांची मति यापरि गुंगवी ॥

अस्पष्टाक्षर शब्द मुखांतुनि येती ते बोबडे।
त्यांमधें सकल काव्य सांपडे ॥

स्तनास लावी माय लेंकरा सौख्य न वर्णूं शके।
इथें ती कविची वाणी थके ॥

बालक पाना करित पाहतो इकडे तिकडे जरा।
वाटतें आहे 'राजा' खरा ॥

बाला, तुजला सत्य वाटतें, काय उणें रे तुला।
आइच्या मांडीवर प्रेमला ? ॥

राजा पृथ्वीचा जरि असला सौख्य न त्याला मिळे।
करतो हेवा तव यामुळें ॥

'क्षोभ न मातृप्रेमीं वसतो' सत्य गोष्ट ही असे।
हृदयीं चित्रफलक हें ठसें ॥

निसर्गान्तरीं माय लेंकरा कुरवाळी हें पहा।
उसळे सौख्यजलनिधी अहा ! ॥

पानांमाजीं पादपगण हे झांकति कुसुमा मुला।
पाउस–वाऱ्यांतुनि कोमला ॥

"आई" यशवंताची ऐकुनि खळ न आसवां पडे।
शिकतों निःश्वासाचे धडे ॥

विचार मानासिं कोंडति जे जे "आईंत"च देखिले।
हृदय हें निःश्वासानें उलें ॥

ॐ ॐ ॐ

रात्रीं ऐके प्रतिदिनिं हांका शयनीं मी 'आइग !'।
कसेंसें होतें या मनिं वघ ॥

नशीव घासुनि दुसऱ्यासंगें मिळे न सुख तें कदा।
जोंवरी आयु जगीं आपदा ॥

—स. र. पंतसचिव.

* या पद्याचें स्वरताल–लेखन शेवटीं पहावें.



# कुसुम

[ चाल-अजि अक्रुर हा ]

जणुं सिंधुंतुनी कमला वरतीं आली।
दिग्भागिं उषा कीं खुलली ॥

कवि-हृदयींची स्फूर्ती वाटे स्फुरली।
कविगानीं प्रतिभा नटली ॥

तुज पाहुनिया शुक्रचांदणी दिपली।
नत चंद्रकोरही झाली ॥

हें बाल्याचें मधुर हास्य पाहूनी।
जातसे विश्व-सुम खुलुनी ॥

मुख पाहुनिया हृदया भरती येते।
इन्दूसहि कोडें पडतें ॥

तुज स्पर्शूनी वायु सुगंधित होतो।
मग जगतावरि दरवळतो ॥

तव गानाला करिति कोकिला साथ।
नाचती मयुर तालांत ॥

निज गानानें माझ्या चित्ता हरिशी।
तूं देवि शारदा गमशी ॥

—गिरिजाबाई विंचूरकर.

# चवथीची चन्द्रकोर !

[ चाल–सखे गे प्रशांत किति यामिनी० ]

**सखे गे !** सुरम्य रजनी खरी। जाउं विशाल नीलांबरीं ॥ ध्रु० ॥

शशिकलाच नौका वरी,
मृदु शीतांगी किततरी,
त्यामधून फिरुं अंबरीं ॥ सखे गे ॥

जलमेघ नितान्ता सरी,
रंजना तारका वरी,
कौमुदी शांतवन करी ॥ सखे गे ॥

सुमनांवरि अमृत झरें,
संगीतें अवनी भरे,
जन मोहुनि निजवी स्वरें ॥ सखे गे ॥

जरि गाती हे सुस्वरीं
गंधर्व विमानान्तरीं,
गा प्रणय-गीत सुंदरी ! ॥ सखे गे ॥

मधु गायन डुलवी धरा,
जललहरी घे अन्तरा,
निःशब्दच ठेका वरा ॥ सखे गे ॥

संगीतें ग्रह–गुंजनीं
प्रभु प्रीती कळवी जनीं,
ही खूण पटे मन्मनीं ॥ सखे गे ॥

नभ-चित्र पहा गे ! कसें
सुखदायक अभिनव दिसे !
जणुं निरभ्र प्रीती असे ॥ सखे गे ॥

मलयानिल सुख दे अती
गे ! वसंत हा संप्रती,
भुलवितेस देवी ! मती ॥ सखे गे ॥

किति अधरामृत-माधुरी !
तव आलिंगन सुन्दरी !
दे अनुपम सुख अन्तरीं ॥ सखे गे ॥

जलकेली सुखवी अहा !
जीवैक्यबंधनीं पहा,
हृन्मीलन प्रेमा महा ॥ सखे गे ॥

या सुखास ना ये सरी,
सुरवरहि झुरे अन्तरीं,
चालवी तरी लवकरी ॥ सखे गे ॥

प्रभु बघेल हें साजणी,
सुख होइ तया त्या क्षणीं
शिवचरण नमूं या झणीं ॥ सखे गे ॥

—गिरिजाबाई विंचूरकर.

# भागीरथी

[ चाल–सुरेख संगम किती० ]

**सुरम्य स्थल हें अहा !** । क्षण विसरुनि देहा पहा । गड्यांनों ! ॥ ध्रु० ॥

हें तारुं जलौघामधीं
डुलतें जणुं काव्यीं सुधी,
**ही वाहे गंगा-नदी** । गड्यांनों । सुरम्य स्थल हें अहा ! ॥

ही प्रशांत भागीरथी
मन्मनास मोही किती,
**जणुं प्रसन्नवदना सती** । गड्यांनों । सुरम्य स्थल हें अहा ! ॥

जणुं जगन्नाथ–वाग्झरी
अवतरे भूतलावरी,
**ने सकल पातकां दुरी** । गड्यांनों । सुरम्य स्थल हें अहा ! ॥

द्विजमेळा बसला इथें,
लागलें कुठें ध्यान तें ?
**चित्समाधिमाजीं रते** । गड्यांनों । सुरम्य स्थल हें अहा ! ॥

हे छत्राखालीं मुनी
अंगासि भस्म चर्चुनी,
**आठवती 'तुलसी' मनीं** । गड्यांनों । सुरम्य स्थल हें अहा ! ॥

हे फकीर जमती किती
'मीराके प्रभु' बोलती !
**सुस्वरें दोहरे गाति** । गड्यांनों । सुरम्य स्थल हें अहा ! ॥

जन स्नाना जमती सुखी,
'भागीरथि गंगे' मुखीं,
**भक्तीच्या रत जणुं मखीं** । गड्यांनों । सुरम्य स्थल हें अहा ! ॥



मराठी ... ग.
अ. क्र. ३४३४०

स्त्रीपुरुष जलीं डुंबती,
'ओंकारा' मुखिं गर्जती,
तें दुरित धुवुनि टाकिती। गड्यांनों। सुरम्य स्थळ हें अहा! ॥

खांद्यावरि ओले पिळे
द्विजवृंद घेउनी पळे,
लाविले ललाटीं टिळे। गड्यांनों। सुरम्य स्थळ हें अहा! ॥

जन 'बिंदुमाधवा'वरी
जणुं चढे मोक्षपायरी
पाहती वळुनि माघारिं। गड्यांनों। सुरम्य स्थल हें अहा! ॥

हा द्वारपाळ भैरवा
दर्शना निघाला थवा,
गंगेवरि करुनी स्तवा। गड्यांनों। सुरम्य स्थल हें अहा! ॥

खणखणाट घंटारवें
हो निनादित स्थल जवें,
भिजलें जणुं शान्ती-द्रवें। गड्यांनों। सुरम्य स्थल हें अहा! ॥

हे पंडये घेती वह्या
थकवा न कशाचा तयां,
हुडकती जनांच्या सह्या। गड्यांनों। सुरम्य स्थल हें अहा!

ते दीप सोडिती थवे
वाहती तरंगांसवें,
वर्णिलें 'माधवानुजें'। गड्यांनों। सुरम्य स्थल हें अहा! ॥

हा वारा गंगेवरी
जनमानस प्रमुदित करी
अनुभवा एकदां तरी। गड्यांनों। सुरम्य स्थल हें अहा! ॥

निशिं गभीर-रव परिसला
नंतर मी पाहीं जला
नद्द तान्यांनीं वेढिला। गड्यांनों। सुरम्य स्थल हें अहा ! ॥

आकाश-बत्ति लागल्या,
तिरिं तारा जणुं उतरल्या,
गंगेतहि प्रतिबिंबल्या। गड्यांनों। सुरम्य स्थल हें अहा ! ॥

मी 'शितळाघाटा'वरी
जातसें कितीदा तरी,
नौकेंत तरंगांवरी। गड्यांनों। सुरम्य स्थल हें अहा ! ॥

—स. र. पंतसचिव.



# यमुना

[ चाल–सखेगे, सुरेख संगम किती० ]

सखेगे, सुरम्य यमुना किती । जाइ भुलूनि माझी मती ॥ ध्रु०॥

तव जलौघ ये खालतीं,
हा प्रशांत झाला किती,
ही उदारहृदया सती ॥ सखेगे ॥

तव विशाल हृदयस्थलीं
वसती जलचर या जलीं,
जीवनामृता तूं भली ॥ सखेगे ॥

नभशशितारांगण दिसें
तव जलांत प्रतिबिंबसें,
हृदिं विमला प्रीती वसे ॥ सखेगे ॥

नाभिं श्यामल मेघावली
ती जलांत प्रतिबिंबली,
कीं श्याम उडी घे जलीं ॥ सखेगे ॥

ती स्मृती असे कां सया,
गोकुळीं निघाशी जावया ?
मग दुभंग होई काया ॥ सखे गे ॥

गंगा यमुना सरस्वती
हृदयंगम संगम किती !
मिळविती त्रिवेणी मुक्ति ॥ सखे गे ॥

जान्हवी प्रसन्ना अती,
ती गुप्तच सरस्वती !
ही प्रशान्त यमुना सती ॥ सखे गे ॥

गे सखिनों, वेगें जाऊं,
पति–प्रेमालिंगन देऊं !
तत्स्वरुपीं मिळुनी राहुं ॥ सखे गे ॥

—गिरिजाबाई विंचूरकर

# वसंत-रमणी

[ जाति–पादाकुलक ]

वसंत-रमणी स्नाना बसली,
आभरणा त्यजुनीही सजली।
पुष्परसाचें नीर आणिलें
झर झर जल अंगीं पाझरलें ॥

सुम-विरचित-सिंहासनिं रमणी
कुसुमांची ही शोभे राणी।
मञ्जुल गाती गाणीं सादर
भाट देविचे विहंग सुस्वर ॥

दूर ठेविले सकला वसना,
तेजोवलयीं बसली स्नाना।
थरथर नेत्रापुढतीं दिसली,
अस्पष्टाकृति देवी झाली ॥

सुम-मधु अंगावरतीं गळला
गोडी आली म्हणुनि वचाला।
कृपावीक्षणें झुलवी सकलां
पुष्पित करते सृष्टी विकला ॥

स्वर्देवी जणुं तारा गगनीं
स्नान दंवाचें घालिति मिळुनी।
तुषार पडतां रमणी खुलली
धरा तिजसवें मोदें हलली ॥

फळाफुलांना बहर पातला,
अंगीं यौवनमद मुसमुसला।

रमणी हंसली शुभ्र-सुमांनीं
जन-सुमनें तइं फुललीं रानीं ॥

वन-कुसुमांत्खचिता मालेनें
सिंहकटी वेष्टियली तीनें ।
शकुन्त देवीचे गुण गाती,
गान-मेलनीं मयूर नर्तति ॥

कर्णफुलें कर्णांत खोविलीं
कुसुमांचीं आभरणें केलीं ।
सदाफुली गालावर खुलली
गुलाब-कलिका कचीं खोचिली ॥

कुसुम-बाल तिज किती आवडे,
कपटाचें ज्या असे वावडें ।
अन्तर्बहि जें धवल हिमासम
मांगल्याचें प्रीती-धाम ॥

सभोंवार वेली हळु डुलल्या
वसंतरमणी पाहुनि धाल्या ।
गगनामधुनीं पुष्पें पडतीं
लतिका शाखा-बाहुंत झेलति ॥


समीर गाई वंश-ततींत,
घुमली मुरली कुंज-वनांत ।
वसंत-रमणी-राधा चळली,
सर्वांगीं सुम-भूपा नटली ॥

रमणी हंसली, अवनी खुलली,
मनें कवींचीं प्रमुदित झालीं ।
पुष्प-परागीं प्रेम रंगलें,
लतिका-अंकावरि सुम डुललें ॥

रुमझुम रमणी वनांत नाचे,
स्थल तें वाटे सुर-देवींचें।
आलक्तांकित धरणी झाली
सुधा-सिंचनीं जणुं ती न्हाली ॥

वीणा घेउनि अंकावरती
भाव-गीत आळवि संगीतीं।
भ्रमर-पंक्तिची तार छेडिली
एक भावनामय भू झाली ! ॥

—स. र. पंतसचिव





२

# वन-विहार

## [ "विश्वासराव" या खंडकाव्यांतील एक प्रसंग.

[ चाल-चंद्रकान्त राजाची० ]

रानीं आपण कसे वागलों, तत्स्मृति मज होई।
स्मृतिसौख्यिच हा! मोदसेवणें नशिबीं मम येई॥

ॐ ॐ ॐ

निर्मानुष वनिं वृक्षततींतुनि गिरिगव्हरिं गेलों।
हाल अपेष्टां गणिलें नाहीं; सहवासीं रमलों॥
सायंकालीं वेलींमधुनी चांचपडत गेलों।
भीत भीत तूं चालशि-ऐसें पुढें पुढें सरलों॥
शुष्क वल्लिचीं जाळीं कितितरि अडकुनि पायांत।
खुंटे गति, संसारीं अडचणि कितिक अशा येत!॥
वेलींना तूं ताप समजशी असेंच जन करिती।
'वाईटांतहि बरें पाहणें'-अपुली ही रीती॥
पानांमधुनीं झपझप जातां छुमछुम नाद निघे।
पायीं पैंजण बांधुनि रुणझुण चालशि वाटे गे॥
हिंडत असतां श्रांत होशि तूं, श्रम होती पथिंचे।
श्वासोच्छ्वासें उरोज हलती, भाते मदनाचे!॥
निरुपम मुख तव रविकिरणांतरिं मोहक किति वाटे!।
मौक्तिक वदनीं चढतां तव गे! कमलमोल वाढे॥
घर्मबिंदु हे नव्हत, मोतिं गे! किरणीं चमचमतीं।
निसर्गदेवी अलंकार जणुं घाली तुजवरती॥
झरोक्यांतुनी झाडींच्या या शीत पवन वाहे।
घर्मांकित तनु सुकवित सुखवित वाहत तो राहे॥
तरुपर्णांतुनि किरणें येतीं जाळीमधुनि जशीं।
लाल कपोलावरती पडतां केतकि जणुं गमशी!॥

ऊन सावली ठिपके पडती वदनावरि लाल।
बुद्धिबळाच्या पटासारिखा भासे तव गाल॥

चतुरंगाचा अनंग-संगर गालावरि थटला।
चिन्हांकित करणारा येथें कोण वीर धजला ?॥

ॐ ॐ ॐ

"दमलिस किति ! गे ! पुसूं काय तव धर्म ?" असें बोलें।
"नको येवढें," हंसुनि वदासि तूं-मदीय मन कळलें ! ॥
धूळी शिरली नयनीं तेव्हां स्मरतें ना तुजला।
फुंकर घाली नयनीं तव मी, सहशी मम लीला ॥

ॐ ॐ ॐ

किर्र किर्र हें रानकिड्यांचें सतत तिथें चाले।
शब्द न ऐकूं येत आपुले आपणास बाले ! ॥
असाच न कळे कुणा कुणाचा नित्य जगीं भाव।
स्वयंदृष्टिनें निरखिति समजति चोर जरी साव ॥
चालत होतों हांसत बोलत, श्रम ना पथिं गणिले।
स्वर्ग भूवरी अवतरला जणुं आपणांस गमलें ! ॥
क्रमतांना पथ उतार-चढही लागति गे ! नाना।
सुखदुःखाचे आयुष्यामधिं असेच असती ना ! ॥
"खळखळ" शब्दें गात आडवा प्रवाह ये मोर्दे।
ओंचे बांधुनि, जपुनी चाले, करिं मम तव कर दे ! ॥
वृक्षतती ती तीरावरची प्रतिबिंबित झाली।
हलती राई दिसली जलिं जणुं धरणी थरथरली ! ॥
दिसलीं पानें प्रवाहांतुनी जातांजातांना।
गोव्यांमधुनी थबकत थबकत जीवित नेतांना ॥
ओढेनाले लंघुनि गेलों ते पुढती पुढती।
कोरांटी जरि अडवित होती अपुली स्वैरगती ॥

तुजविरहित मी जग न मानिलें मानिसि तूंहि तसें ।
विश्वविहारीं तुझिया हृदयीं मन रममाण असें ॥

ॐ ॐ ॐ

गुलाब फुलले वनांत, गालावरिही तव खुलले ।
कोणाचा स्वीकार करावा ? मन माझें भुललें ॥
"गुलाब द्या मज काढुनि," म्हणशी–सरकें मी पुढतीं ।
रुतले कंटक; रति-नाथाचे बाण जणूं घुसती ॥

ॐ ॐ ॐ

स्निग्ध दृष्टिनें पाहशि मज, जणुं प्रेमसरी स्रवती ।
—कंटक हृदयांतूनि निघाले पुनरपि ते वरती ॥
"करिं मोहक हा गुलाब घ्यावा वाटत कां नाहीं !" ।
विचारिशी मज हाय ! धजेना तेव्हां मन, लवही ॥
साळुंकीचें पीस सांपडे–विचार मनिं आले ।
टोचिति यासम नयनाचे तव भाले ! हे बाले ॥

ॐ ॐ ॐ

आपण दोघें वनांत दिनभर गाऊं नाचूं या ।
कुकल्पनेला क्षणभर ना मनिं थारा देऊं या ॥
प्रातःकाळीं गिरिशिखरावरि रविवंदन करुं या ।
निजतेवेळीं ईशनाम तें मुखीं खेळवूं या ॥

ॐ ॐ ॐ

प्रसंग मजला स्मरतो आतां–नभ मेघीं भरलें ।
धुंद दिशा हो, चपला चमकति, गडगड नभिं झालें ॥
येती सरिवर सरि झाडांमधिं ध्वनि हो मोठ्यानें ।
माझा आश्रय भीरू ! घेउनि जाशी धीरानें ॥
झाडीमधुनी क्रमतांना पथ चिंब देह होई ।
टपटप पानांमधुनी पडती बिंदू अंगीं तई ॥

वाटे, वृक्षच रडती, स्खलते नयनोदकमाला।
किंवा मौक्तिकवृष्टी करिती तुजवर वन-बाला॥

पानांमधुनी केसावरतीं बिन्दु तुझ्या गळती।
केशकलापांतुनी हळुहळू गालीं ओघळती॥

ओघळ पाण्याचे बव करिती पदमार्जन बाले!।
वनभू झाली पुनीत येथिल तुझिया पदकमलें॥

ओंचे वरती, डोक्यावरती पदर घेतलेला।
करांत फांदी, जाशी झपझप चिंब देह भिजला॥

पाहुनि तुजला वाटे मजला उतरे सुर-देवी।
ताराया या भ्रष्ट पामरा मत्संगा सेवी॥

ॐ ॐ ॐ

इंद्रधनू नभिं तेव्हां दिसलें वृक्षांवरि सखये!।
सप्तरंग हे रचिले ईशें अतिशय चातुर्यें॥
"सातारंगीं जग नटलें हें नेम न घ्या त्याचा"।
धनु हें सांगे, कळला नाहीं हाय! भाव साचा॥

—स. र. पंतसचिव.

# आम्रमंजिरी

## [ "झोला" या खंडकाव्यांतील एक भाग.]

[ चाल--चंद्रकान्त राजाची० ]

सायंकाळीं नित्य सखे, मीं उद्यानीं जावें।
आम्रतरूच्या झोल्यावरतीं झोंके ते घ्यावे॥
पश्चिम-बाला लाल होतसे सूर्यबिंब येतां।
तिच्यामधें तें विरूनि जातां प्रहसित होइ रता॥
खेळ पहावे असे सृष्टिचे नित्य नवानन्दें।
फुलांतलें हें जीवन माझें भरलें उन्मादें॥
आम्रमंजिरी तशी गोजिरी साजिरि मी बाई !
मज सम सुमनें वेलीवरती डोलति किति पाही॥
मंद मंद हा पवन सखे ग ! उडवी वसनाला।
लांब लांब घेत्रोनी झोंके भेटे गगनाला॥
बालिशतेनें शुद्धमनें मी सुखवी जगताला।
बाल्य संपुनी तारुण्याला बहर नवा आला॥
गंगेमध्य विहार सखये, स्वैर किती कला।
शशीकलेसम मेघोदरिं मम देह तसा फिरला॥
न कळत माधव करि संधाना वसंत-समयाला।
तन्वंगांतुनि तदा माझिया सुगंध दरवळला॥
नवा नवा आनन्द होतसे मजला या कालीं।
झोल्यामधली प्रथमावस्था यापरि अनुभविली !॥

—गिरिजाबाई विंचूरकर.

3037 अ/10/4 992 12/23

# सागर-सहल

[ चाल-चंद्रकान्त राजाची० ]

आठवतें ना सागर-तीरीं त्या रात्रीं फिरलों।
नभःप्रांगणीं देखुन इन्दू ताऱ्यांसह, धालों ॥
निसर्गदेवी-प्रिय बघुनी स्थल प्रमुदितमन झालों।
हातामध्यें हात गुंफुनी प्रेमें कुजबुजलों ॥
स्निग्धदृष्टिनें पाही तुजला बोलत असतां मी।
स्वप्नसुखिं रमतां मम देहाचा राहिं न मी स्वामी॥
सागरलहरी येती लोळत कितिदां जवळ तदा।
गुपित आपुलें ऐकाया परि परतति शिवुनि पदा ॥
एकामागुनि एक सारख्या येती क्रमवार।
ऋतुमागुनि ऋतु सृष्टि-क्रमानें जणुं स्वेच्छाचार॥
शशि-प्रकाशीं चमकति लाटा उजेड-अंधारीं।
रत्नांचा जणुं पडदा कोणी हालवि हळुवारी॥
पायांखालुनि वाळू सुरुसुरु घसरे सुखकारी।
वाटे कोणी मांसल कोमल हस्तें चरण चुरी॥
पद-संस्पर्शन वाळुस घडलें कोमल तव सखये!।
म्हणुनि कोमले! तुझ्या मनासम मृदु ती होय सये!॥
शशांक फेंकी कर दोघांवरि-रोमांचित झालों।
प्रेमानेंही शीतशीकरें किति तरि थरथरलों! ॥
मेदिनि वाटे सुधालपेटें लपेटुनी गेली।
सज्जनसाध्वी कीर्तीयोगें शुभ्र अशी झाली॥
रजतरसानें सृष्टी न्हाली, झाली सुखभरित।
सकल कृष्णही शुभ्रचि झालें शशि-प्रकाशांत॥
जगिं पापाचा तसा तमाचा नुरे कुठे लेश।
मातें दिसला यशःकीर्तिचा सांठा तो देश॥

तारा गगनीं लुकलुक करिती अध्यांनेत्रीं गे ! ।
पाहति तुजसी, तेज न साहे, असेंच ना ? सांगे ॥

यापरि तुझिया सुधा-सिञ्चनीं सहवासीं रमलों ।
सागर खालीं व्योम वरी गे ! आनंदित झालों ॥

अगाध पसरे उदधी खालीं, गगनार्णव वरती ।
अन्त न समजे स्वप्रेमासम, विस्मित होय मती ॥

सागरावरी लहरी येती फेंसाळत शुभ्र ।
कार्पासासम गगनीं लोळति वायुवशें अभ्र ॥

शशी डोलतो वियतिं, चालवी साम्राज्या वरती ।
शशिमुखि ! अवनीवर तूं असशी मन्मानस-शास्ती ॥

सखये ! तव मी रूप पाहुनी देह-भान हरलों ।
स्वर्भूमधलें अन्तर न कळे, वाटे सुर झालों ॥

सागर लहरी—यानामधुनी पवन मंद येई ।
चतुर पतीसम हलुच सखे ! तव वसनाला उडवी ॥

रेतीमध्यें नांव तुझें मीं लिहिलें मुदित मनें ।
नांव पाहतां, वदशी मज तें सस्मित मधुवचनें ॥

"पुरे पुरे हें वरपांगीचें प्रेम मला कळलें !"
"नांव सखे ! रेतींत न केवळ हृदयिंहि कोरियलें !"

आकाशांतुनि एकाएकीं तारा बघ ढळला ! ।
सरसर उतरे दीसे खालीं भूवरि जणुं चपला ॥

वाटे कोणी नांव लिही तव नील-फलक-पृष्ठीं ।
माझी अनुकृति करिते, वाटे गगनोदारें सृष्टि ॥

ॐ ॐ ॐ

जलधीवरतीं दिसलें तारूं मनिंच विचार करूं ।
संसारार्णविं ऐसें आपण तारूं हाकारूं ॥

बसुनी दोघें तारूंमध्यें पुढें पुढें जाऊं ।
प्रेम-फरारा विश्वासाच्या दांडीवर चढवूं ॥

सुख, शान्ती हीं दोन वल्हीं मी करांत घेईन ।
सत्त्व-सुकाणूं करांत तूं धरिं नीट सावधान ॥

सुकर्णधारा नौका असली जन्मोदधिमधुनी ।
संतत नेऊं, भीति न तूं धरिं, आठव देव मनीं ॥

पैलथडीला जाण्याची नच आस धरूं चित्तीं ।
मारित राहूं वल्हीं, जगाची रात्र सरे तंव, तीं ॥

—स. र. पंतसचिव.

# काव्यस्फूर्ति

[ शार्दूलविक्रीडित ]

प्रेमाची मज कल्पना न शिवली पूर्वी कधींही अशी
"देहाला विसरून कांचि असणें," पूर्वी कळेना मशीं।
तूंतें पाहुनि प्रेम-पाठ शिकलों, ओळी रचीं या अशा
होतां बोलकि मूकवृत्ति मम ही, तूंनेंचि झाली वशा ॥

वाटे पूर्वि मला उगीच सनिंचें हें वेड आहे पुरें
आतां प्रेम गमे मनास लटकी ती कल्पनाही पुरे।
पूर्वी मीं रचिलीं अनेक कवनें आत्मा नसे त्यांमधें
ज्योतीवांचुनि दीपपंक्ति, गमतीं आतां तशीं तीं सुधे ! ॥

होतें मुग्ध मदीय प्रेम हृदयीं, तूं जागृतीं आणिलें
विद्युत्स्पर्श अपूर्व गोड गमला जें त्वां मला स्पर्शिलें।
स्फूर्ती तूं जडमानसास दिधली, काव्या रचाया बसे
बाले ! शब्द हवेंतुनी उतरती तूं दृष्टि जें येतसे ॥

पाहोनी जशि रम्य काव्यरचना, जैसा रवी सांजचा
होतें सौख्य तसेंचि पाहुनि तुला, वाहे रस प्रीतिचा।
घेई मी तुजपासुनी प्रथमतः दीक्षा अशी प्रीतिची
आतां ती भिडली मना, तुजविणें जीवीं न राहे रुची ॥

* * *

होतें कानन भ्रष्टपुष्प सगळें, अम्बू नसे सारसा
येतां दृष्टिस तूं वसंत-रमणी कोकील गाई असा ॥

—स. र. पंतसचिव.

# प्रेमोद्भव

[ चाल–शारदे दासकामदे० ]

भाळलें
चित्त हाललें
वेडि जाहलें
सुचेना कांहीं, सुचेना कांहीं
मी मूढ जाहलें ताळचि उरला नाहीं ॥

राजसा
झोंकदारसा
पाहुनी तसा
भुलुनि मन गेलें, भुलुनि मन गेलें
हृद्–द्वार फोडुनि प्रेम-रत्न पळवीलें ॥

न्याहळी
प्रीतिची झळी
जिवा लागली
भोळि सांपडलें, भोळि सांपडलें
मज मन्मथ–सर्पें पुरतेपणिं डंखियलें ॥

हव्यास
हाच जीवास
लागला खास
त्यासि देखावें, त्यासि देखावें
जीवाचें असलें कोड पुरवुनी घ्यावें ॥

संपलें
बाल्य यामुळें
हृदय मम उले
वृत्ति बावरली, वृत्ति बावरली
मनिं प्रीती शिरतां, बाल्यदशा ही सरली ! ॥

—स. र. पंतसचिव.

* या पद्याचें स्वरताल–लेखन शेवटीं पहावें.

# कृष्णाचें गाणें

[ चाल—दासी ऐसें मानुनियां कार्य मला सांगतसे० ]

“ कृष्ण माझा प्राणसखा। देखिलागे काय कुणीं ? ” ॥ ध्रु० ॥

मृत्तिकेसि भक्षुनिया। विश्व दावि चक्रपाणी।
उखळीसि ब्रह्म बांधी। देखिलागे काय कुणीं ? ॥

गोपिसंगें जलक्रीडा। करि वसना लपवोनि।
चढे कदंब—वृक्षावरी। देखिलागे काय कुणीं ? ॥

दूरूनिच फोडि कुंभ। झिरपोनि जाइ पाणी।
बावरोनि जाति गोपी। देखिलागे काय कुणीं ? ॥

खाउनियां दूध लोणी। बोले मुकुन्द गोड वाणी।
ऐके खोड्या नंदराणी। देखिलागे काय कुणीं ? ॥

गोपिसंगें गातो गाणीं। तालावर गोफ विणी।
‘शिव—कांता’ लागे चरणीं। देखिलागे काय कुणीं ? ॥

—गिरिजाबाई विंचूरकर.

* या पद्याचें स्वरताल—लेखन शेवटीं पहावें.



# मार्गावर

[ चाल–केशवकरणी अघटित लीला० ]

एक युवक—


“ चालत होता सुंदर ललना मार्गावरुनी तदा ।
मोहवी माझें मन एकदा ॥
होत्या तीच्या लीला मोहक प्रणयोद्भव-सूचका ।
मजवरि प्रेमामृतवर्षिका ॥
पदर घेतसे सरसावुनि ती, पाहें वळुनी यदा ।
मदनें विद्ध होतसें तदा ॥
केसांवरुनी हात फिरविते, गालांमध्यें हंसे ।
करितसे ती मज वेडंपिसें ॥
हळु हळूच चाले रेंगाळत मागुनी
थबकेहि मधें ती हरिणी जैसी वनीं
फेंकूनि कटाक्षा पाहि पुढें ती क्षणीं
मुरडुनि चालत अशापरीनें प्रेमा ती दाखवी ।
अन्तरीं प्रभा नवी फांकवी ” ॥

एक युवती—

“ पुरुष असा मीं नाहिं देखला जन्मांतहि मी परी ।
जाहलें किति बाई ! बावरी ॥
वडीलधाऱ्या जनांसमोरी लाज सोडुनी गडे ।
पाहिलें फिरफिरुनी त्याकडे ॥
नेत्रीं बिंबित रूप जाहलें, ठसलें हृदयांतरीं ।
उपजे प्रेमभाव अंतरीं ॥
नेत्रां गेले नेत्र भिडोनी, भानहि हरपें कसें ! ।
कळेना काय मनीं होतसे ? ॥

ती वेडवणारी काढ नजर सुंदरा !
मम वडीलधारे जन रे ! असती घरां
ही फसवी आतां मदन-फेंक आंवरा
जातें येथुन लगबग पुनरपि पाहिन ना तुजकडे"।
—परि ती फिरुन पाहि त्याकडे ॥

स. र. पंतसचिव.



# राधेचें वेड

[ चाल-सुरेख संगम० ]

मनासि जडलें पिसें। वदुं कसें जसेंच्या तसें ?। सखेग ! ॥ ध्रु०॥

फिरतसें वनीं उपवनीं। जणुं गमे येत मागुनी
झांकि नयन कसे हा झणीं। सखेग ! ॥

लपे क्षणांत कोठें तरी। मम वृत्ति होय बावरी
मग हळूच धरि मज करीं। सखेग ! ॥

क्षणोक्षणीं भास हो मला। सन्निधीं उभा राहिला
ओढितो धरुनि अंचळा। सखेग ! ॥

निज अंकिं मला बसवुनी। म्हणे 'दावि मला गाउनी'
झालें चूर मनीं लाजुनी। सखेग ! ॥

मी रुसोनि बसतां दुरी। विनवी मज नानापरी
कुरवाळी हृदयावरी। सखेग ! ॥

निशिं निजें एकली घरीं। स्वप्नांत वाटलें परी
मृदु ओष्ठ कपोलावरी। सखेग ! ॥

अंतरीं ध्यान लागलें। चहुंकडे रूप संचलें !
लोचनीं प्रेम चमकलें। सखेग ! ॥

—शांताबाई हेबळीकर.

* या पद्याचें स्वरताल-लेखन शेवटीं पहावें

# गान

[ चाल-गान पुरे हास्य पुरे० ]

सखये ! तव राग पुरे गाइं गीत कोमले ! ।
प्रीति झरे गानांतुनि विश्व गुंग जाहलें ॥
रंगली उषा त्वदीय गानमाधुरीसवें ।
विहग-भाट अनुकरणा त्यासमयीं करिति रवें ॥
त्वन्मुख-नीडामधुनी प्रीती-शुक गान गात ।
दशदिशांत गान भरें, दुमदुमला रव नितान्त ॥
प्रेमाचा रंग तुझा सुरचापीं भासतसे ।
आम्रतरूहिंदोलीं गान तुझें डोलतसे ॥
कुसुमिं राहती पराग तेंविं तूंच अन्तरीं ।
त्वद्गानें हृदय खुलें, गाइ गीत सुन्दरी ! ॥
गंध सुमीं जेविं वसे, प्रेम मन्मनीं ठसें ।
भरलों मी प्रीति-रसें, बोल बोल राजसे ! ॥
त्वदीय नाम संगीतें नटलेलें मी ऐकें ।
सप्तस्वर योजुनि कीं गाइलेंच गायकें ॥
भृंग गुंग त्वद्गानीं, मृगशावकही विलुब्ध ।
परिसाया तव गाना सृष्टीही होत स्तब्ध ॥
गिरिकुहरीं जेविं घुमे जलवृष्टी-रव नितान्त ।
हृदयान्तरिं तेविं घुमें नाम तुझें सुप्रशान्त ॥

—स. र. पंतसचिव.

* या पद्याचें स्वरताल-लेखन शेवटीं पहावें.

# प्रणय-पत्रिका

[ चाल—उद्धवा शांतवन कर जा० ]

गे प्रणयपत्रिके, बाई !
कथिं गोपन माझ्या मनिंचें ॥ ध्रु० ॥

मनयास्तव धांवत जाशी मज सोडुनि तूं परदेशीं ।
मम हृदय चोरुनी नेशी तुज करणी शोभे कैसी ? ।
हुरहूर लागली मजसी ना नीज येइ नयनांसी ।
"मज भेट मुकुंदा !" ऐशीं
अक्षरें वाचुनी प्रियसीं,
हृदयीं मी पाहीं तुजसी
गे प्रणयपत्रिके, बाई ! कथिं गोपन माझ्या मनिंचें ॥

अधरांत बांसरी घ्यावी —गोडी कशि परि वाटावी ! ।
तत्क्षणिं मीं दूर करावी विरहानें वृत्ति भ्रमावी ।
मीं कुंजवनान्तरिं जावें आलिंगन वेलीं द्यावें ।
सुखदायक नच तें व्हावें,
भ्रमनाशें दूर सरावें,
चहुंकडे तुला शोधावें,
गे प्रणयपत्रिके, बाई ! कथिं गोपन माझ्या मनिंचें ॥

बांधिला तरुला झोला स्मृति तुझी होइ त्या काला ।
क्षणिं त्याग तयाचा केला सुखदायक दुःखद झाला ।
मज वैजयंति ही माला तुजविणें खुपे देहाला ।
तापवी उटी अंगाला,
सुम-शय्या खुपते मजला,
मज जाळिति विरह-ज्वाला,
गे प्रणयपत्रिके, बाई ! कथिं गोपन माझ्या मनिंचें ॥

—गिरिजाबाई विंचूरकर

२

मराठी ... ३३ ...
अ. क्र. ३०३११ ...
क्रमांक ...

# स्फूर्तिदेवतेस

[ गझल् ]

तुझी सकलेन्द्रियां सुखदा पाहुनी मूर्ति साजीरी ।
मन सखे ! हेलकावे हें, जशी ती नाव कासारीं ॥
तुझीं नेत्रें, कवी म्हणती, पंकजें सारसामधलीं ।
भ्रुकुटिंना वीचिका म्हणती—तडागा पूर्णता आली ॥
सुखामृतजलतडागीं मीं, करावें स्नान प्रीतीचें ।
हेंच गे ! ध्येय मन्मानिंचें, हेंच मी बोलतों वाचे ॥
टवटवी खेळते वेलीं, त्यापरी हास्य तव वदनीं ।
अहा ! मी जातसें बुडुनी चिदानन्दीं तुझ्या सदनीं ! ॥
ऐकुनी स्वर तुझा वाटे. छेडिली तार वीण्याची ।
मनांची मळणी झाली, थरथरे भावना मनिंची ॥
नभींची चंचला चपला, तेंवि तव चमक नेत्रांची ।
जिव्हारीं जाउनी भिडतां, लता ध्वंसी विवेकाची ॥
कुंकुमा चर्चिलें भालीं, गमे हा रक्त बालार्क ।
प्रीतिचा जाहला वाटे, गुलाली अंगभर सेक ॥

ॐ ॐ ॐ

मनो-मृग राहि निद्रिस्त, उठे मग प्रीतिची हूल ।
तुझीया प्रीति-नुपुरांची लागली हृदयिं चाहूल ॥
न आशा लेशही उरली, मती मम त्वन्मया झाली ।
तुझ्या संकीर्तनीं वाचा प्रेमले ! यापरी खपली ॥
मिळे आनंद तुजमध्यें, जसा गीतेंत भक्तास ।
एकदां हांस सुरदेवी ! राहिली एक ही आस ॥
तुझाची साजणी ! लागे मनाला यापरी छंद ।
तुजविना होति दिङ् साऱ्या धूलिनें जेंवि त्या धुंद ॥

माझिया रोमरोमांत तुझंची संचरे प्रेम।
निघतस सर्व रंध्रांत निशिदिनीं गोड तव नाम ॥

सहारावाळवंटीं या भटकुनी जीव हा शिणला ! ।
दृष्टिचें नीर ओपोनी कोमले ! वांचवी याला ! ।

शुभांगे ! हेलनेची ही प्रवृत्ती काय गे ! वरिली ? ।
सुशोभित ही जरी कविता तुजविना नीरसा ठरली ॥

ॐ ॐ ॐ

सुखामृत-चषक जैं भरला हाय ! मीं लाविला वेळ ! ।
अशा कवनीं अतां करणें नशीबा येतसे खेळ !

—स. र. पंतसचिव.

* या पद्याचें स्वरताल–लेखन शेवटीं पहावें.

# "सोडी मी तुज ना आतां!"

[ चाल–उद्धवा शांतवन कर जा० ]

किति दिन मी वाट जयाची पाही तो दिवस उदेला! ।
सोन्याचा दिन गमवी जो तो मानव जन्मीं फसला! ॥
किति दिवसानें मजजवळी एकांत वास तव घडला! ।
संलग्न हृदय होऊं दे,
तो दुजाभाव जाऊं दे,
हृदयांतरिं मजला स्थल दे,
ठेवीन धरोनी तुजला सोडी मी तुज ना आतां! ॥

उपवास घडावा फार भोजन मग यावें पुढती।
लागावी तृष्णा जीवा अमृत मग यावें हातीं ।
भ्रांती ती पडुनी जीवा मुक्ती मग यावी निकटीं ।
स्थिति ऐशी सखये! झाली,
सुचतें न अशा या कालीं,
लिहिलें मम काय कपाळीं,
कांहींहि जाहलें तरि गे! सोडी मी तुज ना आतां! ॥

नजरेच्या बंदीमाजीं सारसाक्षि! तुज कोंडावें।
झोल्यांत बाहुंच्या दोन्ही सारखें तुला झुलवावें।
सुममृदु प्रेमपाशांनीं बांधुनिया तुज टाकावें।
जाहलें काय ना कळतें!
भांबावुनि वृत्ती जाते!
हा योग अकल्पित वाटे
किति वेळ जरीही झाला सोडी मी तुज ना आतां! ॥

"जन म्हणतिल काय मला ते! मी पुनरपि येइन येथें"।
लाडके! काय हें वदसी? मजला हें शक्य न वाटे।
संधी ही पुनरपि केंशी जन्मांतहि येइल हातें? ।

बाले, हे बोल न बोल !
हृन्मंजूषा आजि खोल !
मन्मानस होय विलोल

ही दवडुं नको गे संधी सोडी मी तुज ना आतां ! ॥
चंद्रही आपणां गगनीं बाहतो जणूं प्रेमानें ।
संगमनीं अपुल्या तारा लुकलुकती आनंदानें ।
वारा बघ 'गुंगुं' करितो प्रेम-गान करि मोदानें ।

सृष्टी ही स्वागत करिते,
अनुकूल प्रेमा दिसते,
प्रेमाचें गुज वाढविते,

लाडके, अशा या काळीं, सोडी मी तुज ना आतां ॥
वनवृक्ष ठाकले पुढती वेलींनीं अटवी नटली ।
खगकूजितयोगें राई प्रेमेंच निनादित झाली ।
माधवें मानसोद्यानीं कुसुमिता सृष्टि ही केली ।

निर्झर हा गाणें गाई,
हंसलें हें नभ ताऱ्यांहीं,
दशदिशा उजळल्या, पाहीं,

या शांत उपवनीं सुभगे ! सोडी मी तुज ना आतां ! ॥
तुजसाठीं विमले ! पाहीं सोडिलें अशनपानाला ! ।
जागून निशा मी काढीं करि संतत तव मननाला ।
पाहिली वाट किति वेळ नंतरीं धीर हा केला ।

भाग्यानें आंतां पडली
गांठ गे तुझी या काळीं,
हृत्कंजें विकसित झालीं,

राजसे ! प्रेम तें बोल, सोडी मी तुज ना आतां ! ॥
क्षणभंगुर मानवजन्म सायासें मिळतो फार ।

भरंवसा नाहिं जीवाचा  विघ्नें तीं येतिं अपार।
आतां तरि सखये, बोल  झालों मी किति लाचार!।

तव हास्य मुखीं खेळूं दे
गुंगवी दिशा तव नादें
सुख यामाधिं मजला लाधें

वद मजसी राजसकन्ये!  सोडी मी तुज ना आतां! ॥
पुनरपि तव गांठी पडणें,  — कोणीं तें वद सांगावें!!।
किति सायासानें पडली!  किति बोलुनि वाटे द्यावें!।
पुरवीन हेतु मम मनिंचा,  मग पाहिन काय करावें!।

अधरामृत प्राशन करुनी,
प्रेमानें कवटाळूनी,
आकंठ तृप्ति मग करुनी,
बोलेन नंतरीं बोला,  सोडीन तुला मी आतां!॥

—स. र. पंतसचिव

* या पद्याचें स्वरताल–लेखन शेवटीं पहावें.




# वेणु-नाद

[ शार्दूलविक्रीडित ]

प्रीतीचा तव वेणु-नाद पडुं दे कर्णांवरी राजसा !
ओठीं गाउनि सुस्वरें विनवितें बन्सीधरा ! मानसा ।
स्वर्गींचा मधु सौख्य-सिंधु सखया ! लोटून दे भूवरी
ही संपेल निशा हृदन्तरिं, शिरे प्रेमांशु तो नंतरीं ॥

सृष्टी प्रेममयी बनेल अवघी वेडावुनी हर्षुनी
प्रेमाचे स्वर छेडि कुंजवनिं तूं प्रीतीजलें न्हाउनी ।
ओष्ठीं वेणु धरीं, अधीर बनलें-झाली-पुरे ! वंचना !
प्रेमाची मम पूर्ण आस घडतां, पर्वा कुणाची मना ! ॥

—शांताबाई हेबळीकर.



# बांसरी

[ चाल–वसन्तीं बघुनि मेनकेला० ]

" बघुनी रूपसुंदरीला ।
 लुब्ध होउनी तिजासि कसा हरि मोहुनियां गेला ! ॥
वाजवी मधुर बांसरीला ।
 अंकित होउनि पुरा सखा बघ गोकुळांत रमला ॥
मोहिनी पुरी पडे त्याला ।
 प्रीतिरंगीं रंगुनि जातां तन्मय हा झाला !॥
आत्मा जीवाचा रमला ।
 सहस्रकल्पें तप आचरुनी मिळविन श्रीहरिला ॥
माझी गोडि तया नुरली ।
 बांसरिची आवड वाटोनी वृत्ति त्यांत रमली ॥
सुवंशा सुस्वर मी असुनी ।
 हरिची वृत्ती विपरित झाली; कळे न तत्करणी !"॥
—राधिका बोले सखि-मेळीं ।
 तिकडुनि आला नाचत हांसत धांवत वनमाळी ॥

—गिरिजाबाई विंचूरकर.

# रंग-पंचमी

[ चाल—सारंगि सारखी तव वाजवुनी० ]

ह्या रंगपंचमीं दंग होउनी रंग खेळुं सखया ! रे ! ॥ ध्रु० ॥

पंचमी ही आज आली,
मनें झालीं एक अपुलीं,
हा खगोल डोले रंग-सागरीं, भिन्ना वृत्ती नुरली ॥

बाहुंनीं तूं वेढिं मातें,
देइ गाढालिंगनातें,
प्रेमाच्या रंगें घाली न्हाणा रोमांचित शरिरातें ॥

हृदयींचे सोडीं वन्ध,
हृद् हृदाला आजि सांध,
मी प्रीती-कैफें झालें सखया ! आतां पाही धुंद ॥

हृदय-कमलें पूर्ण खुललीं,
चिदानंदीं पाहिं डुललीं,
प्रेमाचा हिंदोला बांधियला, मनें त्यामधें घुमलीं ॥

प्रीतिची मज झोत लागे,
गर्व वितळे, नम्र वागे,
'मानिनी, भामिनी' शोभति मज ना नांवें, विनवुनि सांगे ॥

प्रेम-जलधी मजासि वेढी
—नाहिं ना तव चित्तिं आढी ?
प्रेमाची फुंकर घालुनि हृदयीं संशय-कुसळा काढी ! ॥

दृष्टिं पडतां चित्त रमलें,
शब्द वदतां मन मिळालें,
हृदयांगणिं शिरुनी मनोविरामा ! चालविशी हे चाळे ॥

जलामध्यें बिंब जैसें
मन्मनीं तव रूप तैसें,
मम हृदय-सारसीं प्रीतीरेषा अचुक उठे मज भासे ॥

केतकीसम अंग भिजतें,
फुलति कांटे शरीरातें,
अंगावर नियळे रंग जणूं मी प्रीतीनें पाझरतें ॥

माझि मी ती नाहिं उरलें,
भान माझें सर्व हरलें,
तूं सांगशील तशि वर्ते, चतुरा! तुजसि सांगणें नुरलें! ॥

—स. र. पंतसचिव.

* या पद्याचें स्वरताल-लेखन शेवटीं पहावें.



# प्रेमाची ताटातूट !

[ चाल–उद्धवा शांतवन कर जा० ]

घेतील फुलें चुरगळतां — परि वास कसा जाईल ! ।
फुलपांखरुं जाई मरुनी — परि रंग कसा सोडील ! ।
पानांची हिरवी कान्ती — वेगळी कशी होईल ! ।
मुरगळली मान जरीही,
टाकिलीं पिसें उपटुनिही,
कोकिळा-वाणि कशि जाई !
ताटातुट जरिही केली — मन कैसें प्रेमा त्यजिल ? ॥

सहवासामधलें प्रेम — ये कुणा न कधिंही हरतां ! ।
प्रेमांत घातली भिंत — तरि येई प्रेमा उडतां ।
जाहलीं मनें हो ! एक — हे प्रयत्न निष्फळ आतां ।
प्रेमाचा ओढा सुटला
गिरिकंदर भिजवित आला
मिळणार खास सरितेला
काह्के ! दूर जरि असशी — तरि खेळशि मन्मनिं हासिता ॥

—स. र. पंतसचिव.

# विरही राधेचे उद्गार

[ चाल—तूं माझा यजमान० ]

कोठें गेलासी? कन्हैय्या। कोठें लपलासी? ॥ ध्रु०॥

प्राण तुजविणें कंठीं आले
मना विश्व हें शून्य भासलें
आरामस्थल दुजें न उरलें ॥ कोठें गेलासी? ॥

अतसि–कुसुमसम कांती तूझी
मुरली शोभे वदनामाजीं
गळ्यांत माला वनपुष्पाची ॥ कोठें गेलासी? ॥

मोहविशी मज येउन धामीं
वृषभानूची सुता असें मी
आलें येथें तुजकरितां मी ॥ कोठें गेलासी? ॥

प्रेमा सोडुनि माझ्यावरिंचा
निष्ठुर यापरि होशी कैचा?
छंद तुझा मज लागे साचा ॥ कोठें गेलासी? ॥

भिरि भिरि कितितरि वनीं हिंडलें
पडुनि चुकामुक रूप न दिसलें
त्वन्मूर्तीचें वेड लागलें ॥ कोठें गेलासी? ॥

प्रेमें भक्तां वेड लावुनी
दूर राहशी त्यांपासोनी
तळमळतें मन तुझ्यावांचुनी ॥ कोठें गेलासी? ॥

तुझ्या संगतीं रंगुन जावें
पुण्य पदरीं हें सदा पडावें
आज तरी कां यापरि व्हावें? ॥ कोठें गेलासी? ॥

सासु नणंदा यांसि न गणिलें
प्राणपतीसहि क्षुद्र लेखिलें
स्वल्पदप्राप्तिच 'ध्येय' ठेविलें ॥ कोठें गेलासी ? ॥

सकल तारका निष्प्रभ ठरती
शशांक दिसतां नयनां वियतीं
—यासम होई श्रीहरिनिकटीं ॥ कोठें गेलासी ? ॥

भव-सागरिं तूं असशी नौका
कां न तारिशी परिसुनि हांका ?
सोड सोड तूं सखया, हेका ! ॥ कोठें गेलासी ? ॥

संकट-सिंधू पसरे पुढती
नन्द-किशोरा ! घ्या मज हातीं
दूर रहातीं नातीं-गोतीं ॥ कोठें गेलासी ? ॥

चिंतावर्तीं फिरतें देवा !
ये न दया कशि तुला माधवा ?
कलंक आहे हा तव नांवा ॥ कोठें गेलासी ? ॥

प्रातःकालीं लगबग आलें
तरिहि वनीं मम नेत्र न धाले
नेत्रांनीं निःश्वास सोडिले ॥ कोठें गेलासी ? ॥

कुंजामधुनी धांवत येउनि
झांकीं नेत्रां करकमलांनीं
बोल प्रेम-वच माझ्या कानीं ॥ कोठें गेलासी ? ॥

भेट देइं तूं मज लवलाही
तुजविण होई लाही लाही
तुजवांचुनि मज आश्रय नाहीं ! ॥ कोठें गेलासी ? ॥

—स. र. पंतसचिव.

* या पद्याचें स्वरताल—लेखन शेवटीं पहावें.

# राधा

[ चाल–'त्यजि भक्तासाठीं लाज' किंवा 'मजा देते हैं क्या यार' ]

**टाकुनियां सखया, मजला । अजि जाउं नको मथुरेला ! ॥ ध्रु०॥**

अशनपान तें मीं त्यजिलें,
वेष, भूषण, केश न रचिलें,
नेत्रांतरिं जीवन उरलें !
दे दर्शन–सुख तूं मजला ! ॥

पुशिलें मीं तें यमुनेला–
मधु-गंधहि पुष्पां सुटला
कोकिल-रव पंचमिं चढला,
—" कां माधव येथें रमला ? " ॥

तो बहर कसा तूं लुटला !
बहु दिन मज संगें रमला !
'मी–तूं' हा भेदचि मिटला,
त्रिभुवनांत अवघा भरला ! ॥

बांसरी तुला शिकवीली,
तुज युद्धनीति पढवीली,
मग गीता जगता कथिली,
उद्धार जगाचा केला ॥

कां रुक्मिणिनें आडविलें ?
गोपींनीं तुज लपविलें ?
अरिवधा सुदर्शन धरिलें ?
भक्त-काज करुनी दमला ! ॥

तुजवरी मोहिनी पडली
भजवधूंत मति तव रतली

मम मानसिं चिंता पडली—
घननीळ कुठें हा रमला ! ॥

जाहली तुला स्मर-बाधा
भक्ति-भाव माझा साधा !
विनवितें तुला मी राधा
अजि विसर तुला कां पडला ? ॥

ॐ ॐ ॐ

तांबूल त्रयोदशि केला,
पुष्पहारही गुंफीला,
प्रिय सखा मंदिरीं आला,
तो क्षणांत मन्मय झाला ! ॥

केशांनीं पदरज पुशिले,
गोरस तें हातीं दिधलें,
घर्मबिंदु पदरा टिपले,
रणवेष स्वयें उतरीला ! ॥

किति पुण्यें मीं आचरिलीं !
दैवतें बहुत पूजियलीं !
अजि गांठ म्हणुनि तव पडली,
प्रियसखा भेटला मजला ! ॥

किति नवसहि देवा, केले !
बहु संतपदा मीं नमिलें,
तीर्थान्तरिं बहु मी फिरलें !
प्रियसखा भेटला मजला ॥

दूत हे नयन बघ झाले
बहुंकडे तुला धुंढियलें

हृदयान्तरिं मग शोधियलें
प्रियसखा भेटला मजला ॥

शुभ शकुन मला किति झाले !
व्रतदानोद्यापन केलें !
परब्रह्म मला हें भुललें,
—नत राधा प्रभु-पदकमला ! ॥

—गिरिजाबाई विंचूरकर.

* या पद्याचें स्वरताल-लेखन शेवटीं पहावें.



# प्रेमाचे बोल

[ चाल–केशवकरणी अघटित लीला० ]

अति प्रेमाच्या एका बोला मनुज भुकेला असे।
साहिल दुःख इथें राशिसें ॥

येइल भरुनी हृदयामधली जखम बोलण्यामुळें।
जरीही गेले हृदयीं सुळे ॥

प्रेम–झरी तव सखे, आटतां मत्स्यासम तळमळें।
सुधामय दृष्टि न कैशी वळे? ॥

त्वत्प्रेमावरि बांधियलीं मीं कितीक देवालयें।
होतीं ध्वस्त अतां तीं सये! ॥

साउलि असशी सहारामधें, देशी तूं शान्तिला ॥
वितरीं थेंब तरी सुख–जला ॥

स्निग्ध दृष्टियुत दोन शब्द जरि बोलशि, मिळतें मला।
सौख्य जें त्याला जगीं ना तुला ॥

त्या शब्दांना स्मरुनि कंठिं दिन चारसहा, त्यावरी
स्रवती पुनरपि चिन्ता–सरी ॥

मधुनी मधुनी बोलत जा तूं प्रेम-वचा राजसे !।
कसें तरि जीवित कठिन असें ! ॥

आनन्दानें नयन चमकती जेव्हां बाले ! तुझे।
कितितरि मानस माझें रिझे ! ॥

प्रेममधु-वनीं मधुप गुंगला एकेकाळीं सखे ! ।
आतां भिनलीं अंगीं विखें ॥

तुझेंच चिंतन निशिदिनिं केलें, ध्यास तुझा लागला।
प्राण हा त्वन्मय मम जाहला! ॥



४

छळुनी छळुनी दुसऱ्याला किति घ्यावें सांगे सये !।
पुरे ही छलना करुणामये ! ॥

बोल प्रेमळे ! किंवा नुसतें दर्शन वितरीं मला
जीव हा कासाविस जाहला ॥

जतन करोनी ठेवियली तव मूर्ती पुसटूं कशी ?।
होइल मजसह ती नाहिंशी ! ॥

आंतुन पोखरलेलें माझें आयू हो बेगडी ।
हातें स्मरण तुझें घडिघडी ! ॥

विसकटली मम जीवित-घडि गे ! सर्वस्वीं यापुढें ।
आतां नशिबीं येई रडें ! ॥

—स. र. पंतसचिव.

# प्रिया-विरह

[ वसंततिलका ]

जातां त्यजून सखि ! तूं मजला जगाला
आनंद सर्व मजपासुनि दूर झाला ! ।
केव्हां मला मरण येइल हेंचि चित्तीं,
होवो तुझा मशिं कधीं न वियोग चित्तीं ! ॥

आशा-विनिर्मित असा तुटतांच झोला
माझा जगाविपर्ययिंचा भ्रम दूर झाला ।
जें सौख्यपूर्ण गमलें जग एक वेळ
तें जाहलें मज अतां तृणतुल्य फोल ! ॥

कांते ! दिलें मज करीं तुजला पित्यानें,
वाटे तयास 'अजि होइ कृतार्थ दानें' ।
होई तदा उभयलोचनिं अश्रुपूर्ण,
मोती किती टपटपा गळलेहि तूर्ण ॥

अंधार माडिवरती पडतां न जाशी
हांसें तुला, तरि मला सह तेथ नेशी ।
हा ! हाय ! सांग परि एकटि स्वर्गि जातां
भीति न अंतरिं गमे तुज काय आतां ? ॥

वाटे मला क्षण, असा तव राग खोटा
आतां पुरेच सखये ! तव प्रीत-फांटा ।
कोपाविणें, जरि खरें, न रुची सुखाला
ये तूं अतां पुनरपि; बहु कोप झाला ! ॥

होतीस खास जगतीं मजला विसांवा
त्वत्सौख्यसिंधुंतुनि मोद किती लुटावा ! ।
होतीस साउलि जगीं मज तापलेल्या
मत्कारणीं कृति तुवां अनपेक्ष केल्या ॥



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे 20284

आशा कितीतरि तुवां मनिं बांधियेल्या
त्या हाय! अज्ञ अबले! जगिं फोल झाल्या!।
पुष्पासमान सखये! जगलीस येथें,
चित्तास दाहि वरचेवरि हें मनातें ॥

'हे जाउनी दिन असे सुख तें मिळेल'
हेची विचार असती मनिं सर्व काळ।
—आशा-विहंग गगनीं करतो भरारी
तों काळ-व्याध करि कृंतन पक्ष सारी! ॥

'होईल अंत तव यापरि'—लाडके! ही
माझ्या मनास शिवली कधि गोष्ट नाहीं!।
'माझी सखे! असशि तूं'—कितिवार बोलें
हा! हाय! काय घडलें तुज आज बाले! ॥

वाटे मला प्रियसखी मज बोलवीते
स्वर्गास नेइ अति निष्ठुर काळ तीतें।
रात्रंदिनीं वरुनि ती मजला पहाते
दुःखांत पाहुनि मला करि काळजीतें ॥

एकेक याच परिनें दिन सर्व जातां
मद्दुःख नष्ट परि हो, मज काळ नेतां।
होतांचि अन्त मम येइन स्वर्ग-धामीं
मोजीत हे दिन बसें तुजवांचुनी मी! ॥

—स. र. पंतसचिव

# सवदा

[ राग–पिलु, ताल–धुमाळी ]

[ चाल–हृदयीं धरा हा बोध॰ ]

बघुनि तुला मन बावरतें। आवरितां नचऽआवरितें ॥ ध्रु॰॥
खुल्या मनें बोऽलें तुजसी। चोरगतीनें मनिं शिरसी ॥
ध्यास तुझा लागे जीवा। समजुनि आला तव कावा ॥
हास्य दिसें तव मुखावरी। नयन-सुरी उरिं जाय पुरी ॥
सालस समजुनी फांशिं पडलें। मधुर बोलण्या मी भुललें ॥
फसवुनि लाभे काय वदा!। पुरा भोंवला मज सवदा! ॥
पुनरपि फसव्या! येशि घरा!। ओढवला मम भोग पुरा! ॥

—स. र. पंतसचिव.

* या पद्याचें स्वरताल–लेखन शेवटीं पहावें.

# विधवेचें स्वप्न

[ चाल—चंद्रकान्त राजाची कन्या० ]

दिनकर गेला अस्तालागीं, राज्य सुरूं झालें।
रजनीपतिचें, तारक—गण नभिं तेजें लुकलुकले ॥

विश्रांतीची घटिका आली, भव—कंदन सरलें।
दिनभरि शिणलें, चित्त विरमलें, म्हणुनी मी निजलें ॥

घेउनि निज कर उशास केली धूतवस्त्रशय्या।
जनकजननितें प्रभुतें नमिलें हृदयीं स्मरुनीया ॥

आनंदें मग वश झालें मी निद्रा-देवीच्या।
बोलुं लागलें कितीक तिजशीं गोष्टी प्रेमाच्या ! ॥

निद्रेमाजीं स्वप्न देखिलें, स्वप्नचि तें काय ?।
रम्य सत्य तें गोड मनोहर-स्वप्नचि परि हाय ! ॥

रम्योद्यानीं दूर दूर मी निवांत भागांत।
प्रभात-समयीं कुठें चाललें कुठल्या कुंजांत ॥

मधुर वाणिनें मला वाहिलें, सन्निध नाथांनीं।
पूर्वि ऐकिला, तसाच आला स्वर माझ्या कानीं ॥

जवळी जातां, आनंदानें झालें गतभान।
शब्द फुटेना, कंठ दाटला, पाहुनि मत्प्राण ॥

जिविंचा जिवलग सखा भेटतां भरती प्रेमाची—।
ये नच कवणा ? अघटित लीला आहे ईशाची ! ॥

एक जीव कीं झाला त्या क्षणिं प्रेमी हृदयांचा।
उचंबळोनी प्रेमोदधि ये शुद्ध प्रेमाचा ! ॥

वदती " गेलों नाहीं सोडुनि स्वेच्छेनें तुज गे !।
'प्रेम आपुलें नसे मजवरी' असें न वद रागें ॥

परमेशें निर्मुनी आपणां एक-जीव केलें।
त्याची सत्ता मान्य कराया कर्तव्यचि केलें ॥

फिरुनी आज्ञा करील तेव्हां परतुनि येईन।
अंकीं तुजला प्रेमें घेउनि दुःख घालवीन!" ॥

परिसुनियां हें दुःख होउनी स्फुंदत मी वदलें।
"नका जिवलगा! टाकुनि जाऊं, दिवस किती झाले!" ॥

—हाय! हाय! तो आनंदाचा कळसच कीं झाला।
म्हणुनिच आली प्रभात द्याया दुःख काय मजला! ॥

स्वप्नांतिल तो खेळ संपला, अरुणोदय झाला।
शिव! शिव! देवा! काय दाविलें! भासच ना सगळा! ॥

—शांताबाई हेबळीकर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
३०३००
क्रमांक २७२
१५-२-८३

# स्वप्न

[ चाल–नृपममता रामावरती० ]

मज स्वप्न खरोखर पडलें।
क्षणभर तें सुखकर झालें॥ तेधवां॥

पूर्ववृत्त जेव्हां दिसलें।
आनंदीं मन हें रमलें॥ तेधवां॥

तव निकटीं होतें बसलें।
मांडीवरि बालक निजलें॥ तेधवां॥

ऐकुनी। गुंग होऊनि। प्रेम-गुज मनीं। मोहुनि गेलें।
पाहुनी बालक हंसलें॥ तेधवां॥

उचलोनी हृदयीं धरिलें।
गाल लाल चुंबित केले॥ तेधवां॥

नयनांत साम्य बहु दिसलें।
प्रेम-चिन्ह त्या मी वदलें॥ तेधवां॥

धावया पुढें तें केलें।
घेण्यास हात मम धजले॥ तेधवां॥

भीवलें। हात मोकळे। मीच दचकलें। विरुनियां गेलें।
नयनीं मम अश्रू उरले॥ तेधवां॥

—गिरिजाबाई विंचूरकर.

* या चालीचें स्वरताल–लेखन शेवटीं पहावें.

# संक्रमण

[ चाल—केशवकरणी अघटित लीला० ]

बाले ! तिळगुळ द्याया तुजला आलों सदनीं जवें ।
हृदय भरे मम वाटे तेव्हां उत्साहानें नवें ॥
तिळगुळ घ्याया सखये ! जेव्हां तव निकटीं येतसें ।
तीळ न पडुनी करांतुनी मम, तिळतिळ मन तुटतसें ॥
बुबुळें गेलीं बुबुळां भिडुनी-सर्व जगा विसरलों ।
माझें 'मी'पण विसरुनि जातां काय करित राहिलों ॥
पुलकित झालों दोघें आपण तेथ तिळगुळापरी ।
दुःखाचे मज कंटक खुपती सुंदरि ! परि अन्तरीं ॥
'संसारांतिल नाटक' बघती सकल सभोंतीं जन ।
परि होई बेभान, गमे हें थाटें कीं स्मर-रण ॥
हुरहुर लागे हृदया संतत, दावि दया दामिनी ! ।
तुझिया चिंतनिं सकलहि माझ्या जाती दिनयामिनी ॥
प्रेम-तव्यावरि तापत निशिदिनिं सहन आंच मी करी ।
हलव्यासह मी मन-संक्रमणा तुझिया करिं मी करीं ॥
" तिळगुळ घ्यावा, गोडच "—ओष्ठीं अडखळलीं अक्षरें ।
हाय ! सखे ! नशिबास तेंहि ना, जल नयनांतुनि झरें ॥
पुटें प्रीतिचीं चढति न आतां—फुका जळत मी बसें ।
तीळहि उरलों, प्रेमें गुंठित तिळगुळ होणें फसें ॥

ॐ ॐ ॐ

तिळ-संक्रमणीं मोद पावती सकल लोक-भावना ।
परि तव प्रीती-संक्रमणानें होति हृदयिं वेदना ॥

—स. र. पंतसचिव.

# चुकलेलें वासरूं

## एक गौळण कृष्णास म्हणते–

[ चाल–रसने न राघवाच्या॰–किंवा–सोनेका ये समेय॰ ]

तारी अभागिनीला। हे माधवा दयाळा ! ॥ ध्रु०॥

मुरली मनास मोही। जीवास वेड लावी
सकलेंद्रियांस ओढी। स्वत्पादकंज दावी ॥
कुंजांत कृष्ण डोले। चित्तांत कृष्ण घोळे
मुरलींत कृष्ण बोले। तें अन्तरास कळलें ! ॥

पांवा धरोनि ओष्ठीं। सन्मानसास रिझवी
मुरलीवरूनि बोटें। फिरवी, जगास झुलवी ॥
तव राधिका प्रियाली। –मी ती गरीब पोर
हेवा कशी करीन ?। मुग्धेस येथ तार ! ॥

पतिची न गोडि उरली। तव ठायिं भीड सुरली
हृदयाशिं घेइं मजला। विरहांत गाय रुतली ॥
ती भाग्यशालि मुरली। अधरास जी मिळाली
ती बोलकी जहाली। गाते किती सुरेली ॥

मी भाग्यहीन मुरली ! । मैन-समान झुरतें
टाहो वनांत फोडीं। तव चित्त कां न द्रवतें ? ॥
मी प्रीति-मद्य प्यालें। झिंगूनि त्यांत गेलें
मज सांवरी दयाळा ! । हे जीविंच्या विसाव्या ! ॥

देहावरील प्रेम। पुरतेपणीं उडालें
द्वंद्वामधून सुटलें। स्वत्प्राप्ति ध्येय ठरलें ॥
आतां न तोड उरली। त्वद्रूहिं मी निवालें
लावूं नकोस दारा। अळवीत येथ बसलें ॥

मज आंत घेसलें ना। पुरती न कोड मनिंचे
द्वारीं तुझ्या पडाया। दे भाग्य तें शिळेचें! ॥

रचिल्या अनेक माला। सुम गुंफुनी सुमास
गुणहीन त्या जरीही। मी वाहिं त्वन्मनास ॥

आलें तुझ्याचकारितां। मी सोडुनी वराला
दे आसरा प्रियाऽऽ!। अज्ञान वांसराला ॥

मद्देहभान-गानें। अळवीन मी दयाळा!
हृत्तार छेडुनी ही। भुलवीन मी तुम्हांला ॥

जीवीत-रागिं असशी। स्वर वादि तूंच ना रे!
तुजवीण व्यर्थ होई।मम आयु-गान सारें ॥

कांट्याकुट्यांनिं भरलें। जीवीत होय रान!
तुजवांचुनी न आतां। त्राता जगांत जाण ॥

त्वद्रंगिं रंग जमला। मिळुनी तुझ्यांत गेलें
दुसरीच मी न उरलें। तूं एक मी जहालें ॥

वेडी असेन सखया!। परि मी 'तुझी' खरी ना?
समजे मला न कांहीं। परि मी 'तुझी' खरी ना? ॥

हृत्संपुटीं किशोरा! ठेवीन मी सदैव
विसरी न एक पळही। त्वत्प्राप्ति हीच हांव ॥

तूं आम्रवृक्ष सखया!। मी साउली तुझीच
पायीं तुझ्या रहावें। स्थल योग्य तेंच तेंच ॥

हा जीवितौघ माझा। त्वत्सागरीं वळाला
कृष्णांत देह शिरला। दुसरा जरीहि दिसला! ॥

तूं प्रेम-सिंधु असशी। मी वीचिका तुझीच
लोळें त्वदंकिं प्रेमें। कुरवाळि मन्मुखास ॥

मी येतसें पळूनी। कृष्णा! तुझ्याच साठीं
रक्षी मला कन्हैय्या!। बांधून प्रेम-गांठीं ॥

त्वत्सन्निधीं सख्या ! रे ! मातें न कांहिं वाण
'त्वत्सौख्य सौख्य माझें'। ठरलें जगांत जाण ! ॥

तूं रुक्मिणीस दिधला। तैं आसरा रथांत
आतां मलाहि देईं। तेंवी तुझ्या–मनांत ॥

—स. र. पंतसचिव.

● या पद्याचें स्वरताल–लेखन शेवटीं पहावें.



# वंचिता

[ चाल-भूपती खरे ते० ]

तुजसाठीं सखया! त्यजिला मीं संसार
फसविलें मला तूं, भोळी मी पर-नार! ॥ ध्रु० ॥


आठवली मजला कुठुनी लक्ष्मी-भगिनी ?
मी नांदत होतें पतिसह अपुल्या सदनीं।
तव सगुण सुरूपा मुरारि! मी भाळुनी
वाहिलें तनमना घेशिल पदरीं म्हणुनी।
अपराध काय घडलासे मम करीं ?
धरियलें मौन कां सांगें यापरी ?
विनविलें कितिकदां तूंतें बहुपरी
उरले न अतां मज घर वा तव आधार! ॥ फसविलें० ॥

तुज आलिंगाया तनु झाली ही अधिर
तळमळे जीव नच स्वास्थ्य तया क्षणभर।
मज लावियलें कां या आशेचें वेड ?
तरि तूंच करुनि दे मज चरणांची जोड।
निंदिती लोक मज सारे, कथुं किती ?
“ भाळली मुकुंदाला ही,”–बोलती
लागला डाग नांवाला संप्रतीं
पर्वा न मला जनतेची परि तिळभर ॥ फसविलें० ॥

एकांतीं कितितरि दिधलीं मज मधु वचनें
तीं सांगुं कुणाला ? वदुं कवण्या वदनानें ?।

जाणसी एक तूं किंवा माझें सुमन
वद दुजा कुणाला येथ धरूं जामीन ! ।
भुलविल्या कितिक व्रजनारी अजवरी
घेईन जाब तव याचा कधिंतरी
हें पुरें समजुनी राहीं अंतरीं
—मी सर्व जनांमाधिं धरिन तुझा रे पदर ! ॥ फसविलें० ॥

—शांताबाई हेबळीकर.



# पोपट

[ चाल-सुंदरा मनामधिं भरली० ]

हा पोपट विपिनीं येइ, सुस्वरें गाइ, भारुनी वाइ !
करी बेभान ! ॥
शीळेची सांगे खूण, सुखाची खाण, जिवाची आण
जाइ घालून ॥
चित्तास लावुनी वेड, प्रीतिची जोड घेउनी गोड-
करी हैराण ॥
ती माधुरि नयनांतली किती चाखली, गोडि लागली,
लोपलें भान ॥
मधु स्रवते वदनांतुनी, दुष्टता मनीं, ये न हें कळुनि
लागलें ध्यान ॥
एकाकी मजवरि रुसे, खुळी मी फसें; तदा होतसे
जिवाचें रान ! ॥
संकेत-स्थल सांगशी, अतां फसविशी ! -यापरी फशीं
पडे मी सान ॥
आगळीक होई काय ? पुसे तुज राय ! जाहलें गाय
प्रीतिविण दीन ॥
हृत्पंजरिं तुजला सया ! -जाशि कासया ! येन कां दया !
-ठेवि कोंडून ॥
मी मैना येथें झुरे, सांगुं किति बरें ! राग ओसरे
शुका, तव कां न ! ॥
ही पुरुषजात बेमान, जाणते ती न शपथ वा आण
-खचित हें जाण ॥

—स. र. पंतसचिव.

# लिहिलें नशिबांत रडें !

[ चाल–दासी ऐसें मानुनिया० ]

जुलुम करुनि लावियलें। माझें हें लग्न भलें
यावरती खास पुढें। लिहिलें नशिबांत रडें !॥

केवळ थोरास दिलें।—कूपीं मज लोटियलें
बाबांना भूल पडे। लिहिलें नशिबांत रडें !॥

माया ती मावळली। विक्री केवळ केली
पैक्याची प्रीति नडे। लिहिलें नशिबांत रडें !॥

कैंचि कसें हें झालें !। भांबावुनि मन गेलें !
काय करूं जाउं कुठें ?। लिहिलें नशिबांत रडें !॥

लग्न न ही मरण–घडी। जाणुनि अग्नींत उडी
—वेलीवरि वज्र पडें। लिहिलें नशिबांत रडें !॥

हाय ! हाय ! जन्म असा। घालवुं मी सर्व कसा ?
—ऐशी मी नित्य कुढें। लिहिलें नशिबांत रडें !॥

आयु भरें पूर्वि सुखें। परि मध्यें काय खुपें
विपरित हें काय घडें। लिहिलें नशिबांत रडें !॥

बाळपणीं जग नटलें,। कधिं चित्ता नच पटलें–
दुःखाचे पुढति कडे। लिहिलें नशिबांत रडें !॥

लग्न लावि जनक असें,। मी जीवन-कार्यें फसें।
जीवाचे धिंडवडे। लिहिलें नशिबांत रडें !॥

बाल्य सरे, दुःख उरे,। संकट–जाळें पसरे।
गति माझी त्यांत अडे। लिहिलें नशिबांत रडें !॥

जात असे पाण्याला। प्रियकर दृष्टीं आला।
—कोठें याममयिं दडे। लिहिलें नशिबांत रडें! ॥

वरिल मजसि तो कुमर। अमुच्या सौख्या न सर!।
सुख-शिखरीं फार चढें। लिहिलें नशिबांत रडें!॥

जीविच्याच जीवाशीं। होइन संलग्न, अशी—।
अन्तराळिं उंच उडे। लिहिलें नशिबांत रडें! ॥

स्फुरती प्रेम-ज्योती। मालविली जनकें ती।
जग-तिमिरीं चांचरडें। लिहिलें नशिबांत रडें! ॥

उपवनिं कुसुमें फुललीं। नवती ती किति लवली।
—माझें परि चित्त उडें। लिहिलें नशिबांत रडें!॥

दुर्दिन-वृत्त दिवस मणी। शोकाभ्रें तो गगनीं।
दुःखाची वृष्टि झडे। लिहिलें नशिबांत रडें! ॥

तारेवरि नशिबाच्या। कोल्हाटिण मी खेळें।
झोंक जाइ, खालिं पडें। लिहिलें नशिबांत रडें! ॥

येइल मम दृष्टिपथीं। लग्नस्थितींनहि पुढती।
आशेचे व्यर्थ लढे। लिहिलें नशिबांत रडें! ॥

सुख व्हावें मजसि कसें?। आरंभिच घडि बिनसे!।
दैवाशीं पूर्ण तिढें। लिहिलें नशिबांत रडें! ॥

सकल जन्म कंठुं कसा?। क्षुब्ध भयद उदधि जसा।
वायु पडे, तारु बुडे। लिहिलें नशिबांत रडें! ॥

आटत ना आयुनिधी!। हीहि कृपा करि न विधी।
देवहि तो घेइ दडे!। लिहिलें नशिबांत रडें! ॥

जळल्या त्या मम सकला। आशा ज्या सुख-मूला!।
हृदयांतरिं शल्य भिडे। लिहिलें नशिबांत रडें! ॥

अश्रुसरी निशिं गळती। उशि होई चिंब किती।
शिकतें निःश्वास--धडे ! । लिहिलें नशिबांत रडें ! ॥

ॐ ॐ ॐ

सोडी मी सुख-श्वासा। येइ सखा मम वासा।
अंतरांत तोहि रडे !। लिहिलें नशिबांत रडें ! ॥

—स. र. पंतसचिव.



३०३०८
का०५
२९८
१५-२-८३

# लतिका

[ चाल–जरि नाहिं कमल तें करीं० ]

हा वारा येइ भरारा, हरुनि श्रम सारा, देइ निवारा,
नयनांतुनि वाहति धारा ॥

वन फुललें, सृष्टी डुले, मन्मन हले, पालवी झळे
जग सकल वसन्तें नटलें ॥

कोकिळा गाति मधु गान, होइ बेभान ऐकुनी तान,
वनिं सुखास नाहीं वाण ॥

वनिं दिसे लता कोंवळी उभी ठाकली, स्मृती जाहली
वेलींत सखी मज दिसली ॥

सोज्वला लता उमलली, तकतकी खुलली, हळुच थरथरली
सखि नेत्रांमध्यें भरली ! ॥

सुकुमार अंग अनिवार, सुधेची धार बोलते नार,
मच्चित्त करी बेजार ॥

ये कर्णीं हास्य-ध्वनी जरीही दुरुनि, जाइ मी भुलुनी
मन अधीर करि सुम-खाणी ॥

टवटवी खेळते वेलिं, हास्य सखि-गालिं, मुग्ध मति झाली
ती मूर्ती हृदयीं ठसली ॥

पुष्पिता थरारे लता तिज स्पर्शितां, लालि चढतां
सुम-मिषें हांसली आतां ॥

सुम-गेंद, प्रीतिचे बुंद, लागला छन्द गमे आनन्द
कवळाया धांवे धुंद ॥

कंटकीं पुलकिता लता, यौवनीं रता, पादपीं चढतां
हा काम-वात वाहतां ॥

हांसरी लाज पसरली, प्रीतिनें न्हालि, वृत्ति बावरली,
सौन्दर्य-प्रभा फांकली ॥

तव पाणी नयनांतलें जिवा लागलें, चित्त मम चळलें
उन्मत्त अती मज केलें ॥

तव चंचल डोळे सखे ! दीप्ति लखलखे, दुरावलिं सुखें,
तुजवांचुनि जीवित फुकें ! ॥

चालशी कशी मन्दशी, मला मोहिशी, हरुनि मन नेशी
तूं उन्नत पदरें खुलशी ॥

वरुनिया दिससि जरि शान्त, प्रीतिची झोत लाविशी आंत
—तव समजे मजला हेत ! ॥

घन फिरती गगनोदरीं, पहा सुन्दरी ! गति न दुसरी,
तूं फिरशी तशि अन्तरीं ! ॥

खग घेति भरारी व्योमिं, तसा मी प्रेमिं, मन न आरामीं,
तुजविण नच सुख मज धामीं ! ॥

भूतलीं धन्य तो जाण, सुखा नच वाण, प्रीतिची खाण
हो पादप तव जो कोण ! ॥

—जग-स्मरण होइ त्या क्षणीं, पडतसे रणीं, जगाच्या वनीं,
स्मृति-चित्र विरघळें क्षणीं ॥

करपली लता कोंवळी जगाच्या ज्वालिं, उरिं सुरी शिरली
क्षितिवरती ती कोसळली ! ॥

सहवास अन्तरे खास, अतां जीवास, उरे नच आस,
जीवाला लागे न्हास ॥

क्षण वेलिंत सखि मज दिसे, मनाला पिसें, लागलें असें,
भरलों मी प्रीती-रसें ॥

ॐ ॐ ॐ

हा वारा येइ भरारा, हरुनि श्रम सारा, देइ निवारा,
नयनांतुनि वाहति धारा ॥

—स. र. पंतसचिव.

* या पद्याचें स्वरताल–लेखन शेवटीं पहावें.

# कलिका

[ चाल—चन्द्रकांत राजाची कन्या० ]

कोमल कलिके ! काय दशा तव हर ! हर ! ही झाली !।
क्षणापूर्विंची तूंच असशि कां ? —शंका मनिं आली ॥
कृष्णवर्ण हे मेघ अंबरीं जमले बहु थोर।
भीषण शब्दा काढुनि करिती वृष्टी अति घोर॥
भयाण ऐसें दृश्य पाहुनी दचके नर शूर।
तूं तर ललना त्यांत बालिका कोमल-तनु फार ! ॥
बालार्कासमवेत विहरसी विकसन-समयाला।
नानापरि रमलीस त्यासवें, मोल न प्रेमाला ! ॥
गेला क्षण तो निघुनी गेला; काल कठिण आला।
गेले विलया सूर्यकिरण ते, अन्त न दुःखाला ॥
जीवाचा आधार बाइ गे ! सर्व तुझा तुटला।
टळती कोणा विधिलिखितें जीं लिहिलेलीं भाला ! ॥
कोठें गेला रंग गुलाबी तो गालावरचा ? ।
फिकट तनू तव उघड सांगते बाल मानसींचा ॥
'ज्या प्रेमाच्या मुदें फुलावें तो निज सौख्याचा।
तुटतां धागा कसें जगावें !' भाव हाचि मनिंचा ॥
दुःखित ऐशा तुझ्या मनाला देउनि आधार।
सुखवावें तें उलट पहा हा टोंचि तुला भ्रमर ॥
असह्य ऐशी स्थिति पाहुनियां नीच पवन फिरला।
स्पर्शुनि जाई तव देहाला ! मस्त किती झाला ! ॥
हरण करावें तुझ्या हृदयिंच्या मधु मकरंदाला।
आसुरि इच्छा कशी उपजली असल्या समयाला ! ॥

ॐ ॐ ॐ

बाई कलिके! तुज सम आम्ही या विधवा अबला।
दुःख भोगितों परोपरींचें सांगूं किति तुजला! ॥
वैवाहिकसुख-शीतल-पवना सेवावें म्हणुनी।
यौवनोपवनिं पाय टाकितां, पति जाई निघुनी ॥
पति-निधनाचें क्षत हृदयाला प्रथम एक असुनी।
त्यावरि टोंचिति आप्तइष्ट ते कटुतम वचनांनीं ॥
वदवेना मज, चित्त बावरें; कंठ येइ भरुनी।
करुण कहाणी सुरू होतसे अमुची येथोनी! ॥

—शांताबाई हेबळीकर.



# सुख-धाम

## [ " विश्वासराव " या खंडकाव्यांतील एक प्रसंग ]

[ चाल-चन्द्रकान्त राजाची० ]

ॐ ॐ ॐ

निद्रा लागे, दृष्टिस पडलें स्वप्न मोददायी।
उजेड अंधारांत दिसावा, तैसें मज होई॥

प्रकाश पडला, तिमिरहि राहे तेजाभोंवति तें।
नयनां दिसली, सखि मत्संगें अश्वावरि फिरते॥

सर्व दिसे मैदान मोकळें, झाडी तुरळक ती।
उंच सखल तो प्रदेश दिसला-दोघे ती फिरतीं॥

सखे ! मला तूं सत्यासमची स्वप्नांतहि दिसली।
मीही दिसलों माझ्या नयनां-विस्मय हो मजशीं !॥

अश्वावरती मनोहारि तव मूर्ति दिसे नयनां।
-प्रमोददायी स्वप्नहि टिकतें जन्मभरी कां ना!॥

रिकिबीमध्यें पाय ठेविशी ताठ तया करित।
खोंचुनि अडवा पदर, घेतला लगाम हातांत॥

फेंकशि घोडा मजसंगति तूं-टापा वाजति त्या।
संगीतांतिल मधुर ताल जणुं, मोहि मना माझ्या॥

हात खालिंवर होई, ज्यामधिं लगाम तूं धरिशी।
टापांच्या तालातें जणुं तूं साथ करें धरिशी॥

गाण्यामध्यें तालामध्यें भापण जणुं चाले।
'प्रश्न विचारीं, उत्तर मिळतें'-सतत असें गमलें॥

फुरफुर घोडे करिती, धरिती सूर अशा गाना।
सखये! घेई मधुर गळ्यानें या समयीं ताना॥

पायांनाही ताण देउनी उठशी तूं बसशी।
उन्नति, अवनति, चाले क्रम जो जगतीं दावीसी॥

पवनासंगें पदर साजणी ! खेळत तव होता ।
धष्ट पवन तरि तुला रुचावा !-न्याय जगीं मोठा ! ॥

वदनावरती कुंतल येती, दृष्टिरोध करिती ।
झटका मानेला देवोनी सांवरि केंस-तती ॥

गोड गोड तूं गमसी तेव्हां-कच मागें जाती ।
-कोण करिल तव आज्ञाभंगा सांग सये, जगतीं ! ॥

हे गौरांगी ! केंस भुरुभुरू भुरके तव उडती ।
दक्षिण हस्तें सांवरिशी तरि पुनः पुन्हा सुटती ॥

बंधन त्यांचें करिशि कसें जे मुक्त निसर्गानें ? ।
-स्वतां बंधनीं पडुनी हेवा करिशी कां सुमने ! ! ॥

फेट्याचा मम शुभ्र पदर हा हवेमध्यें उडतो ।
वाटे हंसचि नील सरोवरिं पोहत जाई तो ॥

खालीं वरती वाजी जाती वेगानें अपुले ।
जललीलहरींमधुनी जातों आपण जणुं गमलें ॥

गवतामधुनी झपझर जातां सळसळ ध्वनि होई ।
पाणी खळखळ वाहे वाटे अश्वांखालुनिही ॥

वायूसंगें नम्रपणानें तृण बघ वागे हें ।
वधू नवोढा जशी पतीशीं अधोवदन राहे ॥

घोडा मध्यें ठोकर खातां बिचकुनि किति जाशी ! ।
लगाम ओढिशि झणें कर्पसि मम सर्वेंचि चित्तासी ! ॥

चंचलनयने ! तुजसि निरखुनी हंसें जरासा मी ।
खोट्या रागें म्हणशी, " नसतों पडलों कीं आम्ही ! ॥ "

तृणांकुराच्छादित भू होती-अश्व धांवती ते ।
नभोंऽतराळीं सूर्यहि तळपे, वायू फार सुटे ॥

दूर पसरले पर्वत दिसती, राई दूर वसे ।
अश्व धांवती पवनजवें ते-दृश्य मलाच दिसे ॥

घर्मबिंदुंनीं मुख डबडबलें, सुमसम तें सुकलें।
'शांती द्यावी आपण वाहुनि' पवनालहि सुचलें! ॥

फुरफुर करिती. पुच्छ उभारिति अपुले घोडे गे!।
ऐटीनें चालति ते भरभर दम जरि उरिं लागे ॥

दूर पुढें जो पर्वत दिसतो, तें बघ सुख-धाम।
चढणीला वन आहे तेथें, वेऊं विश्राम! ॥

झाडी जेथें किर्र दिसे ग! जाणें अपणाला।
चढुनी जाऊं पर्वत नंतर सुखकर धामाला! ॥

* * *

किती वेळ तरि अशाप्रमाणें चालत ते होतों।
येइ न जवळी शांत स्थल तें-धीर तदा खचतो ॥

पूर्वीपासुनि जितकें होतें दूर तिथें राही।
तेथें जाऊं, सौख्या मिळवूं, वाटे मज तरिही! ॥

सखये! सत्वर तेथ जाउं गे, विलंब तूं करिं न।
तेथें तुझिया सहवासीं मी अखंड राहीन ॥

बागेमधुनी सुमनें आणिन नेमानें खुडुनी।
पुरविन मनिंची हौस तुझ्या तीं वेणिंत गुंफोनी ॥

काव्याची ना रचना येई मजला करितां गे!।
परी सुमांची करीन वेणिंत तुझिया साच बघे ॥

चित्रविचित्रा सुमरचना मी वेणिंत करणार।
सत्कविपरि मी प्रेमाचा तव होइन शाहीर! ॥

मार्गामध्यें उशिर नसावा-लोक पुन्हा असती।
चुंबनसुख अनुभविलें आपण नाहीं गे सुदती! ॥

"कोण तुम्ही?" आम्हांस विचारिति जातां लोक मधीं।
"वाटसरू अम्हि वाट पहातों वाट सरेल कधीं!" ॥

लांब दिसे ती राई तेथें क्षणभर गे! वैसूं।
झुळझुळ-पाणी किलबिल-नादीं विहगांच्या प्राशूं ॥

गर्द वनीं या श्रांत जिवांना शांत करोनी ते।
अश्वा तेथें ठेवुनि आपण लागुं चढायातें ॥

जोंवरि वारा वाहे जगतीं, जोंवरि सूर्य नभीं।
तोंवरि राहूं आपण तेथें-अपणां मुळिं नच भी ॥

झळया लागति संसाराच्या, ताप अती होत।
वीचीसम हालतें हृदय त्वत्सहवासोदधिंत ॥

सुख-धामीं मग जाऊं सखये!—उचंबळुनि मन ये।
अन्त जगाचा होइल तोंवरि राहूं तेथ सये! ॥

ॐ ॐ ॐ

आम्ही ऐसें क्रमीत मार्गां होतों कितितरिही
तरि न मिळालें निवांत-स्थल, तें दूर दूर राही ॥

हाय! जगामधिं असेंच केवळ हिंडाया आलों!।
निवास आम्हां कधिं लाभेना—आशेनें फसलों!! ॥

—स. र. पंतसचिव.



# "गा कविराया !"

[ चाल–चन्द्रकांत राजाची कन्या० ]

गा, कविराया ! गा या समयीं कांहिं गोड कवनें ।
काव्यरसाचा निधि कोकिल तूं, गा स्वच्छंदानें ! ॥ ध्रु० ॥

आकाशांतिल तुझी भरारी क्षणैक थांबवुनी ।
हृद्योन्मादक कूजन ऐकवि काव्य-चषक पिउनी ॥
होय गायनें दुःखद जरि हा प्रवास सुखदायी ।
भवाटवींच्या पथिकासाठीं गात सदा राही ! ॥
त्रस्त मनानें गाणं कधिं का गुणगुणलें जातें ? ।
गाणें म्हणजे सदा मिळविणें नित्यानंदातें ॥
मेघांचा गडगडाट होतां कवि रमवी चित्ता ।
भंवति किति हो कोलाहल तरि, साधी एकांता ॥
श्वासोच्छ्वासहि गायनरूपें सतत जइं चाले ।
हृदयांतरिची शांति घालवी बहिरंगी चाळे ॥
स्फूर्त्युल्हासें रमे, रमवितो रसिकमनां, खुलवी ।
व्यक्तित्वें निज विशाल जगही आलापें भुलवी ! ॥

—शांताबाई हेबळीकर.

# पिंजऱ्यांतील पोपटास !

[ चाल—केशवकरणी अघटित लीला० ]

शुका ! असा तूं पंजरवासी झुरसी कितितरि मनीं
देह झिजविसी फला न भक्षिसि; ध्यान असे का वनीं ? ॥

हाय ! तुझें दुर्भाग्य पाहुनी जीव असा तळमळे ।
भडका होतो प्रेमाग्नीचा शरीर यामधिं जळे ॥

स्वातंत्र्यप्रिय तव वृत्ती ती लोपुनि जाई कशी ? ।
परदास्याचें बंधन पायीं आलें, पडशी फशीं ! ॥

स्वातंत्र्याच्या लीला स्मरशी वाटे निशिदिनिं मनीं ।
हाय ! काय हें घडलें तूंतें—पडशी निर्दय जनीं ! ॥

रत्नखचित हा पंजर देखुनि कोलिस घाई गड्या ! ॥
रत्न न फत्तर समजसि, आतां व्यर्थ तुझ्या या उड्या ! ॥

कवडीमोलाचें बघ झालें जीवित तव बिनमोल ।
—खेद-जलनिधी करि थैमाना पाहुनियां तव हाल ! ॥

पंजरगत तूं केविलवाणा आतों बघशी सला ।
जाळी चित्ता नजर तुझी ही—काय करूं कोमला ! ! ॥

राहणार का आयु जोंवरी ऐसा पंजरिं परी ? ।
स्वातंत्र्यास्तव जन्मोनीया दास्य येतसे शिरीं ॥

सहज मनोहर स्वतंत्रतला भाळ घातला कुणीं ? ।
स्थिति तव पाहुनि होति वेदना चावे हृदिं जणुं फणी ! ॥

मनिंच्या आशा विरोनि जातां जीवित जड वाटतें ।
सनिश्वास अश्रूंनीं संतत हृदय तुझें दाटतें ! ॥

७७
मराठी
ग्रं. क्र. ३४३४४

जन्मा येतां शुका ! समजशी आयु गुलाबापरि ।
तुझ्या नशीबीं कंटक आले-गुलाब अन्या करीं ॥

फडफड करिशी पंजरिं आतां, जीव शिणविसी वृथा ।
होउनि जायाचें तें गेलें, शोक करीसी अतां ॥

क्षीण क्षीणाचि यापरि होउनि झुरसी अन्तरिं शुका ।
सकळ जन्म हा हाय ! हाय ! तव गेला ऐसा फुका ! ! ! ॥

—स. र. पंतसचिव.

# ज्योति

## स्वानितक

[ चाल—शार्दूलविक्रीडित ]

कॉलेजामधिं दीपसन्निध जधीं ओळी रचाया बसे ।
ज्योतीला विनवी तधीं, " वद मला कोठें सखे ! तूं वसे ? ॥
रात्रीं येशि मुळीं न खंड पडतां, तूं कांपशी कां अशी ? ।
येतां सूर्य नभीं गतप्रभ सखे, होशी वदे कां मशीं ! " ॥

ज्योती ती वदली, " निवांत परिसा माझ्या कुळाची कथा ।
येतें मी अभिसारिकेसम गृहीं ती सांज होतां, रता ॥
कांपे स्वन्निकटीं अधीर पतिच्या जैसी नवोढा सती ।
जातें 'जा' म्हणतां जधीं विझविशी, निस्तेज होतें किती ! ॥
प्रीती सर्व तुम्हांवरी, न गणितें मानापमाना इथें ।
स्वच्चित्तास करूनि उज्ज्वल सदा भावें तुला सेवितें ! " ॥

—बाळे ! तूंहि अशी कधीं कथिं मला येशील नेमें गृहीं ! ।
तूं होशी कधिं सोबतीण, जशि ही, राहून अंतर्बही ! ॥
येतां तूं जर सांजकाळिं सखये ! कोंडीन हृत्-पंजरीं ।
'जा' नाहीं तुज सांगणार कधिंही ते दीन ज्योती परी ! ॥

—स. र. पंतसचिव.



# संशय-नाटिका

[ चाल-भूपती खरे ते० ]

**सखी—**

सखि, शोक आवरी चिन्ता कसली तुजला ? ।
तूं उगिच मानिनी, धरिशी आशंकेला ! ॥
मनिं संशय-फणि हा हलके हलके शिरला ।
वन केलें त्यानें त्वन्मन-उद्यानाला ॥
हें मौक्तिक नयनांमधलें कां दवडीशी ? ।
कां मोत्यांची खैरात अशी मांडीशी ? ॥
सखि, सोड अबोला, बोल प्रियकरासह गे ! ।
शोकाकुल झाला, विनवुनि तुज हा सांगे ॥
हीं निष्ठुर वृत्ती ऐशी सोडि गे !
हंसुनी तूं तव सख्याला पाहिं गे !
खुलवी मन त्याचें, झाला दीन गे !
यापरी प्रियकरा कितितरि देशी दुःखां ! ।
रुचतो, मज सांगे, दुष्ट मार्ग हा तुज कां ? ॥

**नायिका—**

तुज कळत नाहिं हे डाव लफंगावाचे ।
हे असले चाळे त्यांचे गे ! नित्याचे ॥
हीं मलाच ठाउक ढोंगें असलीं यांचीं ।
हीं बोलणिं सारीं पुरीं मानभावाचीं ।
मी भोळिबापडी पूर्वी फसलें कितिदां ।
परि अनुभव आला मजला आतां पुरता ॥
बोलती गोड परि कटुता हृदयामधली ।
मज सखये, आतां पुरी प्रत्यया आली ॥

मन चोरुनि नेलें त्यांचें, दुसरिनें,
लाविला ध्यास बघ त्यांना, परकिनें,
–मम जन्म फुकट हा केला, सटविनें !
परि दोष तिचा ना, नशीब माझें फिरलें ! ।
लावुनी स्वभाळा हात स्वस्थ मी बसलें ! ॥

नायक—

सखि ! काय असा हा खोटा संशय घेशी ? ।
हे शब्द नव्हत कीं कर्णि गरळ ओतीशी ! ॥
कुणि दुष्टानें प्रेमांत माति कालविली ।
एकत्रित अपुलीं मनें न त्या पाहवलीं ॥
कीं, आहे सारी उभारणी तव मनिंची ।
संशयी खरोखर मनें असति हो ! तुमचीं ॥
मम लतिकांवरिही प्रेम न खपलें तुजला ।
संशयें वाटतें भारियलें तुज अजला ॥
हे विचार मनिंचे सोडी, कोमले,
तूं सरळ दृष्टिनें पाही, चंचले,
मज स्वतांसही सुख देईं, प्रेमले,
वेडांत शिरोनी भ्रमवी नच निज मतिस ।
स्त्रीजाति-सुलभ संशया न मनिं दे वास ! ॥

—स. र. पंतसचिव.

# वनिता आणि कविता

## स्वानतक

[ शार्दूलविक्रीडित ]

" येई काय मनीं कथा मज, सुधे! चिन्ता कशाची ? सखा!
लागे ध्यास मना, न नीज मुळिं ये, होतें असें कासया?।
दुष्टेनें कवण्या असे वद मना मोहून नेलें तव!
माझ्याशीं वदतां न अक्षर कसे?–ये कां न माया लव?॥
तन्द्री काय मनास लागलि अशी तुम्हांस रात्रंदिवा?
आली कैंवि अहा! तनूस कृशता, ये क्षीणताही रवा "।
" कान्ते, हेंच खरोखरी मज घडे; भाळून गेलें मन
तीच्यावांचुन कांहिं तें न सुचतें ती भूपिता पाहुन ॥
चित्ता रंजविणारि, कोमल सुरें वेडावणारी मना
येतां रुणझुण कानिं शब्द पदिंचा जाती लया यातना।
चेष्टाविभ्रम देखुनी वदनिंच्या, ऐकोनि हास्या तसें!
लागे वेध मना, सुचे न दुसरें,–हें त्यामुळें होतसे!" ॥
" नाहीं लाज कशी? समक्ष वदतां! मातें नको जीवन!"
" कान्ते, ही कविता, न अन्य वनिता; कां माजवीशी रण?" ॥

—स. र. पंतसचिव.

# "कवींचें वेड"* या कवितेस उत्तर

[चाल–वधू ही वल्ली०]

उकललें कोडें। जाहले कवी नच वेडे ॥ ध्रु०॥

शिव–प्रिया ती आम्र-मंजिरी,
आम्रफलांची जननि साजिरी,
कोकिल-गायन भुलवी भारी,
मोहवी सारें। लागतां वसंतीं वारे ॥

आर्यांची ती नैतिक-वृत्ती,
आर्यस्त्रीच्या दृष्टीवरती,
संतसज्जना जन्मदायि ती,
उपमा नाहीं। कवि-गायन विरुनी जाई ॥

नील सरोवरिं रम्य चंद्रिका,
सात्त्विकतेची धवल पताका,
सुमां अर्पुनी तोषवि लतिका,
उज्ज्वल तारे। रत्नहार दिसती सारे ॥

वायु चेतवी प्राणज्योतिला,
योगिजनांच्या स्वाधिन झाला,
चैतन्यींही मिळवी त्याला,
दावि प्रभुला। जो 'स्थिर–चर व्यापुनि उरला' ॥

पवित्र गंगा भूवरि आली,
करुनी पावन जनते, धाली,
विष्णुपदातें दावि माउली,
जीवनदायी। अघ-संचय विलया नेई ॥

* मनोरंजन, जून १९२५ मध्यें कवयित्री सौ० उषाताई खरे यांच्या प्रसिद्ध झालेल्या कवितेस हें उत्तर आहे.

एकचि तारा नभीं चमकली,
नित्य नियम ती कधीं न चुकली,
ईशाज्ञांकित जगीं वर्तली,
बोध हा घेई । कुतुहलें कवी त्या पाही ॥

जनदृष्टीला कलिका पडली,
अल्पकाल जों भ्रमरें सेविलि,
तोंच सुदैवें प्रभुपदिं गेली,
मुक्तता होई । भव-सागर तरुनी जाई ॥

दांपत्याचें गुज एकांतीं,
ऐकतां न कवि मानी खंती,
सर्वांभूतीं ब्रह्म-प्रतीति
शोधुनी पाही । भ्रम सारा सोडुनि देई ॥

कमलें फुलवी शांत सरोवर,
प्रतिबिंबें हृदिं विमल सुधाकर,
अनुपम मैत्री ! दृश्य खरोखर-
प्रेमी साज । उमजे न तुम्हांला आज ॥

नच उल्लंघी सीमा अंबुधि,
देउनि चवदा रत्नांचा निधि,
सरितांना दे आश्रय आधीं,
स्थैर्य न सोडी । कटु वचनें जन जरि ताडी ॥

शुक तैसे चंडोल मयूर,
ईशस्तवला करिति निरंतर,
कविही मिळवी त्यांत निज स्वर,
भाट जणुं होई । चिद्रूपीं विरुनी जाई ! ॥

—गिरिजाबाई विंचूरकर.

# दैव

[ राग–पिलू जिल्हा. ताल–धुमाळी.]

[ चाल–सबसे रामभजन० ]

दुर्दैवाचे फेरे कोणां टळले वद अजवरती ।
हरहर दैव अटळ जगतीं ! ॥ ध्रु० ॥
मिथिलेशाची कन्या, जीचा नाथ जनांचा वाली ।
ऐशी सीता घोर काननीं गर्भ-भरालस पडली ॥ हरहर० ॥
कलिशापानें भ्रष्टमती नल भटके रानोरानीं ।
कापुनि गेला वसनार्धासह राज्ञीतें टाकोनी ॥ हरहर० ॥
हरिश्चंद्र नृपती जेंनिं होता प्रसिद्ध तो सत्यानें ।
डोंबाच्याही घरीं राहिला दळणें दळिलें त्यानें ॥ हरहर० ॥
'अजातशत्रु' ख्यात जगीं, जो धर्म सदा रक्षी ।
तोहि युधिष्ठिर विपिनीं जाउनि कंदमूलफल भक्षी ॥ हरहर० ॥
हरिभगिनीला पांचालीला फरफर ओढित आणिली ।
सभेंत छळतां हंबरडा ती फोडी;–भोग न चुकली ! ॥ हरहर० ॥
देवांनाही चुकलें नाहीं भाललिखित कीं पाही ।
दुर्भाग्याचा काळ पाततां दुःख भोगिती तेही ॥ हरहर० ॥
नेपोलीयन-कर्तबगारी विश्रुत तींही लोकीं ।
करुनि हेलना दैव तयातें 'सेन्टहेलनीं' टाकी ॥ हरहर० ॥
जर्मन-कैसर केसरि मानी अपणा क्षितिपनिंचा ।
गेला गेला राष्ट्रासह तो रसातळाला साचा ॥ हरहर० ॥
चंद्रसूर्य हे गगनीं फिरती त्यांसहि भोग न सुटले ।
ग्रहणा-समयीं राहुकेतुंनीं ग्रासुनि त्यां टाकीलें ॥ हरहर० ॥

—स. र. पंतसचिव.

* या पद्याचें स्वरताल–लेखन शेवटीं पहावें.

# भोळा जीव

## स्वनितक

[ शार्दूलविक्रीडित ]

येते भुर् भुर भुर् करीत चिमणी, ती किल्बिलाटा करी
मातें काव्यविधानिं दंग असतां आणीत भानावरी ।
घेवोनी चिमण्या मुखीं तृणलवा ती ये, पुन्हां जातसे,
आणी काडि पुन्हां तशीच फिरुनी; विश्रांति ना घेतसे ॥

झाला केर किती, तदा पसरल्या खोलींत काड्या किती
पाहीं मी वरती, तिथें मज दिसे दांडीवरी उंच ती ।
बांधावें घरटें म्हणून श्रमते त्या दांडिच्या शेवटीं
ना ठावें तिजला गळून पडते यत्नासवें काडि ती ॥

येथें मानव व्यर्थ यत्न करतो, उद्देश ठेवी मनीं
मांडे खाइ, 'मदीय इच्छित असें जाईल सिद्धी क्षणीं' ।
मूढा त्या परि ना कळे सकल कीं जातील वाया श्रम
कैसा हा मजला कळेल जगतीं ऐसा विधीचा क्रम !! ॥

काव्याचा श्रम-हार हा तवकृते आयगुंणीं गुंफिला ।
वाहीं मी तुजला, जरी वरुनि तो अन्या कुणां अर्पिला ! ॥

—स. र. पंतसचिव

# मागणें

[ राग-झिंझोटी. ताल-धुमाळी.]

[ चाल-भक्ति ग वेणी० ]

मींच मागावें। हें देणें प्रभुनें द्यावें ! ॥ ध्रु०॥

रवि, नक्षत्रां सान्निध जावें,
अवलोकुनि त्या गूढ नुरावें,
विहरत गगनीं नित्य रहावें,
चंद्रिका व्हावें। हें देणें प्रभुनें द्यावें ! ॥

अत्युच्चीं कैलासा जावें
योगि-तपस्वी जन देखावें,
आत्म-साधनीं रमुनी जावें,
भृगुही व्हावें। हें देणें प्रभुनें द्यावें ! ॥

महि भेदुनि पाताळीं जावें,
नारायण-मुख-कमल पहावें,
शेषशायि-प्रभु-चरण चुरावें
लक्ष्मी व्हावें। हें देणें प्रभुनें द्यावें ! ॥

समुद्र-मंथन पुनरपि व्हावें,
सुरासुरांतिल कलह मिटावे,
रत्नां मिळवुनि अमृत प्यावें
अमरहि व्हावें। हें देणें प्रभुनें द्यावें ! ॥


श्री-विजय-प्रद सुगंधि माला-
तत्सुमनें विकसवि सु-मनाला,
वैजयंति जी रुळते माला-
स्वयें मीं व्हावें। हें देणें प्रभुनें द्यावें ! ॥

ऋषि-शापें अवतारां घ्यावें
गर्भवास युगीं युगीं सहावे,

ब्रह्म अंगणीं मम खेळावें
यशोदा व्हावें। हें देणें प्रभुनें द्यावें! ॥
दैत्य-कुलीं भक्तिस्तव जावें,
तन-मन-धन प्रभु—चरणिं वहावें,
कुल-दैवत नरसिंह भजावें,
प्रल्हादच व्हावें। हें देणें प्रभुनें द्यावें! ॥

—गिरिजाबाई विंचूरकर.

* या पद्याचें स्वरताल-लेखन शेवटीं पहावें.



# वाढदिवस

## स्वानितक

[ शार्दूलविक्रीडित ]


पूर्वीं बालपणीं मनास कितिदां आनंद हो या दिनीं
'मोठा होइ' असा प्रमोद मज हो, ना तोष मावे मनीं ।
होई तें नभ ठेंगणें मज तदा, मी साच वाढें किती
आनंदें दिन साजरा करितसें, सौख्या न राहे मिती ! ॥

जातां काळ अधीक याच परिनें, वाटे मना नंतरीं
नाहीं वाढत आयु, मात्र, जवळी ये मृत्यु तो, जो दुरी ।
आयुर्माप कमी कमी भरतसे तें वर्ष जातां नवें
दुःखाश्रू गळती, मनास पटलें, आयुष्य ऐसें सवें ! ॥

चित्तीं ती भडके चिता, पथ जगीं चालून भागे जिव
हा येतां दिन होति वृत्ति हसिता पूर्वीप्रमाणें नव।
होई आयु लुलें, गळयांत पडलें, हें जाचिचें लोढणें
जीवाचें रडणें सरेल जधिं ये तें काळ-बोलावणें ! ॥

येई मृत्यु पदास टाकित पुढें एकेक ऐसा क्षणीं ।
यासाठींच दिनास या टपतसें, ओढीत संवत्-मणी ! ॥

—स. र. पंतसचिव.



# संसाराटवी

## [ जीव आणि मुक्ति यांचा लपंडाव ]

[ चाल–अर्धतनू वारुळीं बुडाली० ]

हृदयाची संपेल कधीं कां तळमळ माझी तरी? ।
काय शोधितों, काय हुडकितों, नुमजे मज अंतरीं ! ॥

वरकरणीं जगिं सकल वस्तु त्या अंकित मम वाटती ।
तरिही मानस कांहितरी तें धुंडित बसतें अती ॥

पूर्ण न कांहीं वाटे येथें–उणीव भासे मला ।
जीव तळमळे माझा जैसा मत्स्य जलावेगळा ॥

सकळ आयुभर हिंडुनि हिंडुनि उसंत नच लाभला ! ।
सीतेसाठीं रामहि भटके तील न तो भेटला ॥

'प्रेयसि वस्तू आज नसे जरि मिळेल तुजला पुढें' ।
आशा फसवी, जीव गुंतले, लागति मानसिं लढे ॥

दोन नयन हे जवळ असोनी गांठ न पडते कधीं ।
तशीच विरहें मम जीवाची होइ अवस्था मधीं ॥

जिवाजिवांचा 'लपंडाव' हा किती वेळ चालला ।
माझ्यावरचें 'राज्य' न संपे–जीव पुरा भागला ! ॥

निर्झर सरिता संगम पावति–वाहे मी एकटा ।
सरिता वाहे अन्यगती मम–धिक् धिक् मज भेकटा ! ॥

खांचाखळग्यांतुनी आक्रमीं, जीवित जड जाहलें ।
वाटे जीवित-ओझें फेंकुनि मरण वरावें भलें ! ॥

विचारयोगें चित्त बावरें, कुठें न मन लागतें ! ।
घेईं कांहींतरी कराया-शून्य जगत् भासतें ! ॥

रात्रंदिन मम नयनापुढतीं प्रेयसि वस्तू दिसे।
स्वप्नीं येते दर्शन घडतें, चित्तीं प्रतिमा ठसे ॥

पडदा मधला बहुजन्मांनीं नष्ट होइ जेधवां।
प्राप्ती कैवल्याची होतां शीण जाइ तेधवां ॥

जन्मोजन्मीं जगतामाजीं वणवण भटके परी।
मज नच मिळते शांतिदायिनी प्रेयसि वस्तू तरी! ॥

—स. र. पंतसचिव.



# विश्रान्ति

## स्वनितक

[ शार्दूलविक्रीडित ]

हिंडूनी नटव्या जगांत सखये ! हा जीव भागे किती !
कांटे आणि खडे कितीक खुपले पायां, न त्यांतें मिती ! ।
ज्यां मूढें गणिलें जगास 'अपुलें', धांवे तया भेटण्या
मातें शत्रुपरी गणून निघतें तेंची पुढें धांवण्या ॥

बाले, मीं जगतीं स्वतांस दिधलें थोडेंहि ना तें सुख
प्रीती-आहुति होमिल्या समजुनी 'हें आयु आहे मख' ।
आतां या पुढतीं पुरें भटकणें, राहोत तीं भांडणें
द्वैता सोडुनि एकरूप सखये ! कंठूं जगीं या जिणें ! ॥

विश्रांतीस्तव जीव हा किति झुरे ! त्यातें सखे, ठाव दे
माझ्या ह्या फुटल्या हृदा स्वहृदयें बांधास घाली, वदे ।
त्वद्वक्षीं दयिते, असें पहुडतां सृष्टी सभोंतीं फुले
मी नेईन क्षपा भुजांतरिं तुझ्या, इंदूहि व्योमीं डुले ॥

ऐशी ना मजला मिळेल सखये, 'विश्रांति' येथें जगीं ।
तें होई फिरुनी सुरू भटकणें जीवास आयुर्धगीं ! ॥

—स. र. पंतसचिव.

# बंधन

[ चाल–गडे हो सत्यहि गुरूची खुण० ]

बंधन जगिं या किती ! । जरि स्वैर कल्पना अती ॥ सखे गे ॥ ध्रु०॥

उषःप्रभेंत किति पोहलें ! । मी अमृतमय रंगलें ।
परि चित्रीं आलेखिती । सखे गे, बंधन जगिं या किती ! ॥

नवरत्नांतरिं रंगलें । दीप्तीनें जन मोहिले ।
मज कनकवलयिं ठेविती । सखे गे, बंधन जगिं या किती ! ॥

सुर-धनूंत मी खेळलें । जल-तरंगिं मी शोभलें ।
काव्यांत कवी गोविती । सखे गे, बंधन जगिं या किती ! ॥

शशिकला नभीं मी डुले । पीयूषें जग सिंचलें ।
नक्षत्रें परि वेढिती । सखे गे, बंधन जगिं या किती ! ॥

प्रतिसुमांत मी बैसलें । आमोदें जन भारिले ।
प्रभु-चरणीं मज वाहती । सखे गे, बंधन जगिं या किती ! ॥

मी प्रेम-जलीं डुंबलें । सौंदर्यें मन मोहिलें ।
मज हृदयीं परि कोंडिती । सखे गे, बंधन जगिं या किती ! ॥

भक्तींत किती मिसळलें ! । परब्रह्म हृदीं रंगलें ।
सन्मालिकेंत गोंविती । सखे गे, बंधन जगिं या किती ! ॥

विश्वान्तरिं सामावले । मज 'नेति नेति' वर्णिले ।
शिव-चरणीं रमली मती । सखे गे, बंधन जगिं या किती ! ॥

—गिरिजाबाई विंचूरकर.

## बरळणें !

[ राग–झिंझोटी. ताल–धुमाळी.]

[ चाल–भक्ति ग वेणी । माझि गुंफा ग साजणी० ]

चित्त बावरलें। एकदां असें तें वदलें ॥ ध्रु० ॥

जलदांमधुनी जलद फिरावें,
हेमाद्री-शिखरां तुडवावें,
स्वैरविहारी मारुत व्हावें,
वपुस सोडावें। पोकळींत भरुनी जावें ॥

संध्यासमयीं मेघ पेटती
तेथें व्हावी अग्नि-शुद्धि ती,
जळत्या ज्वाळीं लाभो मुक्ती !
शुद्ध मन व्हावें। पंचत्वीं मिळुनी जावें ॥

ह्या गिरिवरुनी त्या गिरिं जावें,
पक्ष्यासम गगनांत उडावें,
देह-पंजरा सांडुनि द्यावें,
सोडिलें द्वैत। अद्वैतीं मुरलें चित्त ॥

मनास उडु-कुंजीं रिझवावें,
शशी-सुधेला यथेच्छ प्यावें,
चपलेसम मेघीं चमकावें,
जन दिपवावे। गगनांत खेळ खेळावे ॥

शेष-फणींतिल मणि तें व्हावें,
मौक्तिक होउनि शुक्तिं रहावें,
सागरान्तरीं स्वैर फिरावें
वेथ रहावें। जल-सृष्टींत रंगुनि जावें ॥

वरी वादळें झालीं कितिही
सागर अन्तरिं प्रशान्त राही,

होइल केव्हां मत्स्थिति तशि ही ?
स्थैर्य लाधावें। ध्रुवपदीं अढळ बैसावें ॥

दृश्यें दिसलीं उग्र कितिही
भीति न अन्तरिं शिवली लवही,
प्रभो ! अशी स्थिति देशिल कधिं ही ?
निराशा, धास्ती। जीवाला भिडली पुरती ॥

संशय तरि कां मनांत शिरणें !
शुद्ध मनें का कधिं नच होणें !
–लोकांना तें किति किति जपणें !
मजला साचा। वीट ये लपंडावाचा ॥

तरंग संशय मनीं उसळती
–अशीं तुफानें केव्हां शमती
शान्ति–तारका कधिं नभिं झुकती ?
विमल मन झालें। त्वद्रूपीं देवा, विरलें ॥

प्रेम करोनी काय मिळालें ?
–वेड मात्र तें मना लागलें;
प्रबंध कितितरि यावरि रचिले,
येइ नशिबाला। ही निराश-देवी सबला ! ॥

प्रेम-ज्योती मालवुनी कीं
आशा-मूलां उपटुनि टाकीं;
आतां सुख मज तीर्थ तटाकीं
शांत मन व्हावें। व्याप ते सकल संपावे ॥

कोलाहल हा जिवाजिवांचा
संसारीं नित चाले साचा,
वीट येतसे धांवपळीचा,
वृक्षहि व्हावें। स्थिर निश्चल वनिं विलसावें ॥

रवि-बिंब-ज्योती चमकावी—
नेत्रीं माझ्या, द्युति ती यावी,
उद्भासित मेदिनी करावी,
तमोमय इच्छा। ध्वंसुनी दिशा हो स्वच्छा॥

प्रथम उमलत्या लतिकेवरचें
सुम व्हावें, मज वाटे साचें
बालक मोहक अंकावरचें;
नाहिं जरि आतां। दे पुढील जन्मीं माता!॥

शुभ्र मेघशकलें नभिं दिसती
जणूं शिडांसह नौका विचरति
पवनासंगें व्योमीं विहरति
त्यांत बैसावें। मुक्तिच्या तटा लागावें॥

शोक, रुदन तें संपे सारें
सुखामृताचे सुटलें वारें,
भक्ती-निर्झर हृदयिं पाझरे,
उजळली धरणी। ये उदया मुक्ती-तरणी॥

—स. र. पंतसचिव.

# चिलया बाळ

[ राग–झिंझोटी खमाज, ताल–त्रिताल. ]

[ चाल–साम्य तिळहि नच दिसत मुखाचें० ]

ऐक वचन मम चिलया बाळा ॥ ध्रु०॥
प्रसंग असला अघटित येई,
वांछि अतिथि तव मांस-भोजना,
देउनि सार्थक करि वेल्हाळा ! ॥ ऐक ॥

नच गमवि सख्या, ख्याति हि अतुला
सत्त्वनिष्ठ अति जनक कुलींची,
पुरवि आस ही माझ्या बाळा ! ॥ ऐक ॥

कधिं चुकत नसे मरण मानवा,
होइ निरंतर अमर जगीं या,
कीर्तिरूप राही लडिवाळा ! ॥ ऐक ॥

अश्रु नयनिं जरि पाहिल याचक
घेउनि जाइल सत्त्व पदरिंचें,
जाणसि तूं हें माझ्या बाळा ! ॥ ऐक ॥

पितृऋणाला टाकी देउन
हृदय देउनी, चढवि मोक्षपदिं
प्रिय तव पितया, बाल श्रियाळा ! ॥ ऐक ॥

—शांताबाई हेबळीकर.

* या पद्याचें स्वरताल–लेखन शेवटीं पहावें.

# अभिमन्यु

[ चाल—अजि हौस जिजीची पुरवा० ]

अभिमन्यु बाळ रणिं लढला। ताऱ्यासम चमकुनि गेला ॥
ही भारतमाता पुण्य। एकवार झाली धन्य ॥ ध्रु० ॥
रथि अतिरथि ना ते गणिले। रणिं बाळ लढूनी गेलें ॥
राजीवनयन सुकुमार। पांडवांस सकलां प्यार ॥
वाळला न ज्याचा जार। सर्वांहुनि रणझुंझार ॥
द्रोणानें रचिला व्यूह। बाळाचा पडला देह ॥
कोणी न पुढें ते आले। हा व्यूह भेदिला बाळें ॥
सिंहाचा छावा गमला। तो सेना-सागरिं शिरला ॥
शिरला न पुनरपी आला। लढतांना संगरिं पडला ॥
सौभद्र शिरे रिपुमेळीं। संतप्त होइ त्या काळीं ॥
राहिलें न त्याला भान। कृति मोठी, मूर्ती सान ॥
खणखणाट शस्त्रास्त्रांचे। ढळवी ना स्थैर्य तयाचें ॥
लक्ष्मणा सुयोधन-तनया। पाठविलें झणिं यम-निलया ॥
ते वीर कृपादिक समरीं। विस्मित हो सेना सारी ! ॥
तोंडांत घातिलीं बोटें। उर वीरा पाहुनि फाटे ॥
परि विमुख जाहलें दैव। सांपडे न बाळा वाव ! ॥
गांठला एकटा बाळ। दुष्टांनीं करुनी मेळ ॥
तो पार्थ-तनय बहु दमला। देहीं लव तकवा उरला ! ॥
सर्वांगीं रक्तें न्हाला ! । हतबल तो धरणीं पडला ॥
हातांत गदा घेवोनी। दौःशासनि त्याला हाणी ॥
भळभळा रक्त ओघळलें। तरि अरिंचें चित्त न द्रवलें ॥
कौरवदळ ये धांवोनी। वेढियलें सकल अरींनीं ॥

मारि तें जयद्रथ लाथ। मस्तकीं तयाच्या देख ॥
अपमान-शब्द तो वदला। सक्षार-प्रतोदच गमला॥
तळमळे बाळ अपमानें। परि अगतिक हा! देहानें॥
तें विकट हास्य शत्रूंचें। हृदयांत भल्लसें खोचे! ॥
तो पार्थ-कुमर रणिं पडला। अंतकाळ जवळी आला॥
झांकिलें दोन्हि नयनांला। मनिं बोलविलें कृष्णाला॥
जयघोष चालवी "कृष्ण!। श्रीकृष्ण! कृष्ण! जय कृष्ण!॥"

लढणारा गेला लढुनी। रुधिरानें भिजली धरणी! ॥
स्मृति उरे अमर परि आज। रणभूमी मानी शेज॥
तेजस्वी तारा ढळला। क्षणभरांत चमकुनि गेला॥
होणारें होउनि गेलें!। दुर्दैवी भारत ठरलें!! ॥

—स. र. पंतसचिव.

* या पद्याचें स्वरताल-लेखन शेवटीं पहावें.

मराठी … , ठाणें.

# संशय

[ राग–झिंझोटी ताल–दादरा. ]

[ चाल–संशय कां मनिं आला० किंवा बारी उमर लरकैया० ]

"संशय कां ये नाथा; आतां। तव पदिं रामा, प्रणता ॥ ध्रु०॥

विनवी तुजला बहुपरि राजा। लोपे कां तव ममता।
दशमुखनखही नाहिं देखिलें। सत्य कथितसे कान्ता ॥

शंकित वृत्ती ऐसी वरिली। कोणी वालि न आतां।
शरणागत मी गर्भभरालस। जाऊं कुठें रघुनाथा ॥

राज्ञी असुनी भोगि आपदा। द्रव ये ना तव चित्ता।
दैवच माझें फिरलें वाटे। अन्तरलें पति-चरणीं आतां ॥

धरणिमाय! गे! ठाव देइ तूं। सांभाळी ही दुहिता।
संशयसंभृत जगिं या मातें। नाहीं कोणी त्राता" ॥

–सकंप होउनि दुभंग झाली। तत्क्षणिं धरणी माता।
हृदयिं झेलिलें प्रिय कन्येला। निज गृहिं नेली सीता! ॥

—शांताबाई हेबळीकर.

* या पद्याचें स्वरताल–लेखन शेवटीं पहावें.

# सीता-लक्ष्मण संवाद

[ " सीता-परित्याग " या खंडकाव्यांतील एक प्रसंग.]

[ उपजाति ]

कठोर-आज्ञा परिपालनांत
सौमित्रि होता बहु दक्ष नित्य।
माता-शिरच्छेदन-कर्मकाला
सारील मार्गे भृगुनंदनाला॥
रथांत ने बैसवुनी सतीस,
ज्याच्या नसे स्वास्थ्य मुळीं मतीस।
बोले न कांहीं तई तो तिच्याशीं
गमे तिला गोष्ट अपूर्व ऐशी॥
झाडेंझुडें डोंगर आक्रमीले,
भागीरथी-तीर-समीप आले।
नौकीं बसोनी नदिपार जाती
—श्रीराम-आज्ञा परिपूर्ण हो ती॥
पुढें वनीं चालत जाति कांहीं,
तो मूक सौमित्रि तसाच राही।
सीतेस ही गोष्ट असह्य झाली,
त्या, होउनी आर्त, सती म्हणाली॥
" कां लक्ष्मणा, तूं वद खिन्नसा ? रे
वाटे मला कां उलटेंचि सारें ?।
स्वबंधुची कीं स्मृति होय साची,
गमे मला गोष्ट हि खिन्नतेची॥
स्वरकंठ सौमित्रि, भरून आला
माझ्यासवें बोलशि कां न बोला ?।



ग्रंथालय ठाणे 20254

कडाडुनी झाड पुढें पडे हें
सांगे जणूं 'तूं पुढतीं न जायें' ॥

मला न चिन्हें दिसतीं बरीं हीं,
मला दिसे सर्व असौख्यदायी।

हा दक्षिणाक्षी लवतो अपार,
होतो मनीं रे! थरकांप फार ॥

धृती धरी मानस ना कसें तें!
हें शून्य भासे जग मन्मनातें।

असो प्रियाचें शुभ सर्वकाळ!
सुखी असो तो रघुवंश-लाल! ॥

सदैव चिंती रघुनाथ चित्तीं
अन्या तरी कां मज ही प्रचीती?।

या जीवसृष्टीं, रघु-प्रेम-वृष्टी
ना येइ दृष्टीं मन होय कष्टी! ॥

दृष्टीस येतीं न तपोवनें तीं-
-जीवांस जीं शांति अपूर्व देतीं।

कोठें असे ती वनवृक्षराजी?
-छायेस देण्यास सदैव राजी ॥

श्रमें, गमे, पंथाचे विस्मरोनी
स्थलास येशी वद या कुठोनी!।

ना दीसती कां मृग-बालकें तीं
कन्या ऋषींच्याहि कुठें रहाती? ॥

वेदध्वनी तो नच कर्णिं ये रे!
दिसे सभोंतीं मज रान सारें।

धूमोद्गमें धूसर जी जहाली
कोठें असे लक्ष्मण, ती द्रुमाली?" ॥

ह्या ऐकुनी शुद्ध सती-वचाला
सौमित्रिचा कंठ भरून आला।
तें सांगणेंची नशिबास येई
हळू हळू स्फोट तयास देई ॥
"हा ! देवि ! माझ्या नशिबास आलें !
विमूढ आतां मम चित्त झालें।
सर्वस्वि आहे रघुच्या अधीन
—चळो न त्यापासुनि मी कधीं न ॥
योजी तुझ्या त्यागिं मलाच राम
माते, कसें हें करुं सांग काम ?।
जगीं जरी येइल मृत्यु आतां
होईल धाता सुख हेतु-दाता ॥
वाटेल स्वर्गीं तरि काय ताता
अशी स्नुषेची बघुनी अवस्था ?।
मातें कशाला परि माय व्याली,
ही गोष्ट आली बघणें कपाळीं !॥
होईल वेडा तव तात शोकें
जधीं सुधी तो तव गोष्ट ऐके।
या काननीं टाकुनि तूंस ऐसें
वैदेहि ! जाउं मज सांग कैसें ?॥
कोणी सहाय्यास नसे तुला गे !
नेदी कुणी, जें तुजलागिं लागे।
दासीजनीं वेष्टित जी निजावी
ती एकली कां वनिं हाय यावी !!॥
ही लाभली श्री अमुच्या गृहाला,
सत्कार हीचा परि नाहिं झाला !।

आम्ही हिला हाय ! त्यजोनि जातों
—रघू-कुला डाग सदैव येतो ॥
वैदेहि ! आहे तव काय भालीं !
कळे न मातें, मति गुंग झाली।
येऊं नये वेळ अशी पराला !
ती ये नशीबीं तुज भोगण्याला ॥
रामासही मोह कसा पडावा !
सर्वज्ञ कां यापरि आजि व्हावा !।
किंवा अशीं हीं विधि-चेष्टितेंच
सुज्ञांस जीं गांजिति फार साच ! ॥
सर्वज्ञ देवी, असशी सदैव
—आज्ञा रघूची मनिं घालि घाव।
आज्ञा मला ना तुज सांगतां ये
जी केलि मातें रघुवंश-रायें ॥
साध्वी स्त्रियांना सति, होशि मान्य
वैदेहि ! झालीस जगांत धन्य ! ।
हा दैव-फेरा न कुणा टळेल,
जो ग्रासि रामासहि एकवेळ ॥
कठोर मी यापरि वागतों गे !
पतिव्रते, तूंच क्षमा करी गे !।
हें माउली, लेंकरुं त्वत्पदाचें !"
—विनम्र झालें शिर लक्ष्मणाचें ॥

—स. र. पंतसचिव.

# विश्वमोहिनी

[ चाल—घनश्याम सुंदरा श्रीधरा० ]

ऊठ मनोहर वाजवि सखया कृष्णा, तव मुरली।
गान–सुधान्तरिं देवा, तव रे आत्मवृत्ति मुरली ॥

देवि शारदा स्वांकावरला अति सुस्वर वीणा।
करुनि दूर लवलाहीं होई उत्सुक तव गाना ॥

कल्पवृक्षवर पारिजातक स्वर्गी बहु डोले।
सुमवृष्टीतें करावयाला मंद मंद हाले ॥

शिवभालातें त्यजुनि चंद्रमा व्योमिं पहा विहरे।
देव अप्सरागणहि विमानीं शोभति रे सारे ॥

सप्तसूर ऐकतां शेषही पाताळीं डोले।
तन्मस्तकिंची वसुंधरा ही थरारुनि हाले ॥

आलिंगाया प्रियकर पतिला कालिंदी आली।
भान हरपुनी गानसुधेनें मंद–गती झाली ॥

कोकिल-सारस-चंडोलांनीं नभिं केली दाटी।
मत्स्य-कूर्म ते जलचर आले यमुनेच्या कांठीं ॥

मयूर नाचति आनंदानें हालविती माना ।
त्यजिती मृग जलपान ऐकुनी मधुर मधुर ताना ॥

तृण चरतांना देति गोधनें वत्सां स्तनपाना।
तोंच ऐकतां सुस्वर गाना उभारिती काना ॥

कुंभ घेउनी लगबग जातां गोपींचा मेळा।
मुरली-नादें तिथेंच निश्चल चित्रासम झाला ॥

बघतां तव मुख-चंद्र गोपिका स्वानंदीं रमल्या।
चंद्रोदय होतांचि कुमुदिनी सरोवरीं फुलल्या॥

दीपराग तूं आळवितां भू प्रकाशमय झाली।
त्यायोगें चमकत नक्षत्रें कुतूहलें जमलीं ॥

आळवितोसी सांग कोणता गोपाला राग ।
ज्यायोगें विश्वांत संचरे एकच अनुराग ॥

आवरि ही मोहिनी मोहना, विश्व स्थिर भासे।
'सोऽहम्' नादीं रमले सारे, उरे द्वैत कैसें ॥

धन्य धन्य वसुदेव! देवकी येशि जिच्या पोटीं।
धन्य तूंहि! हें विश्व निर्मिलें जणुं मुरलीसाठीं! ॥

सप्तसुरांतुनि श्रुति-स्मृति, श्री, गीताही कथिसी।
'मामनुस्मर'–सूत्रीं विश्वा गोंवुनि उद्धरिसी! ॥

—गिरिजाबाई विंचूरकर.

* या पद्याचें स्वरताल–लेखन शेवटीं पहावें.





श्रीभवानी

# भवानी !

गझल्

[ ताल–केरवा ]

[ चाल–अगर हम् बागवा होते० ]

भवानी ! मनिं तुझी प्रतिमा संचली लोचन-द्वारें ।
उमटती बोल हृदयींचे मुखावाटें पहा सारे ॥
महन्मांगल्य तुजमध्यें, तुझें पावित्र्य गंगेचें ।
भवानी-खड्गरूपानें 'शिवा'ला ओपिशी भालें ॥
तेज तव नेत्र-चपलेचें 'शिवा'च्या खड्ग चमकोनी, ।
मस्तकीं वरद-हस्तानें येतसे शौर्य प्रस्फुरुनी ॥

ॐ ॐ ॐ

जाहली 'त्राहि' सर्वत्र, 'रुतें मी' गाय हंबरली ! ॥
ऐकुनी हांक मायेची 'शिवा'ची वृत्ति गहिंवरली ! ॥
मावळी घेउनी सेना करी थरकांप यवनांचा ।
महाराष्ट्रीय भूमीचा 'राजा' जाहला साचा ॥
निघाले ठायिं ठायिं तें मावळे सज्ज होवोनी ।
दिलें मोला स्वदेहांनीं स्वराज्या विकत घेवोनी ! ॥
भवानीची कृपा वरती ! कमाईला कशी कमती ! ।
झुंझुनी मावळे जाती, कीर्तिशीं जोडिती नातीं ! ॥
'तोरणा' जिंकिला प्रथम, तोरणा बांधिलें तेथें; ।
–भाग्य हें केवढें मोठें गडाशीं राहिं मम नातें ! ॥
वाहले यवन-रक्तांचे देश-शोणांतुनी पाट ।
स्वराज्याच्या हवेलीचा सजविला नंतरी थाट ॥
जसा हा सिंह वन–राजा, 'शिव' असे हिंदु-पद-राजा ।
'शिवा'ला अशिव नच खपलें, खलांच्या ध्वंसिलें काजा

भवानीखड्ग–धारेनें दिपविली यवन खल-सेना ।
स्वधर्माची असे ढाल 'शिवा'च्या पाठिशीं धन्या ॥
गमे अवतार कृष्णाचा, मावळे गोपबालें हीं
कालिया–यवनसेनेला मर्दिलें पाहिं दरि-डोहीं ॥
"परित्राणाय साधूनां" बोलली कृष्णजी–वाचा ।
शिवाजी जन्म घेवोनी करी उद्धार राष्ट्राचा ॥

ॐ ॐ ॐ

अतांही माळ–मुलुखांत स्वराज्याचा घुमे नाद ।
मावळी तेज मावळलें उरे तरि तोच त्यांच्यांत ॥
मराठ्यांची सदा गाजे अशी देशांत मर्दुमकी ।
तयांची सर न कवणाला येतसे पाहिं या लोकीं ॥
'शिवा'च्या पदरजें झाले पुनित जे प्रान्त तेथेंची ।
नित्य मी फिरतसें, आहे परा सीमा सुभाग्याची ! ॥
तयाचा धन्य हो जन्म लाभली ज्यास शिव–सेवा ।
तयांच्या वंशिं येण्याचें लाभलें भाग्य मज देवा ! ॥
देवते ! त्वत्प्रसादानें अवतरे भूवरी सांब ।
नाशुनी यवन-असुरांना नमितसें तुजसि जगदंब ! ॥
तुझ्या तेजेंच चामुण्डे ! शिवाजी–राज चमचमला ।
पाहुनी तेज दोघांचे 'सदाशिव' लीन पदीं झाला ! ॥

—स. र. पंतसचिव.



# निसर्ग-सुंदरीचा साज

[ चाल–अर्धतनू वारुळीं बुडाली॰ ]

नीलाकाशीं रंग शोभतो माझा सांगा कसा ?।
कटींचा शालू जणुं राजसा ॥
अथांग स्वर्गंगा ही वाहे निरभ्र गगनोदरीं ।
हाच मम पदर-कांठ भरजरी ॥
प्राची–दिक् तेवढी उषेनें रंगुनि गेली कशी ।
कंचुकी लाल घातली जशी ! ॥
चमचम चमकत नक्षत्रें हीं विखुरलिं पाही वरी।
रुळती मौक्तिक अंगावरी ॥
नभांत दिसली गतप्रभ अशी चंद्रकोर वांकडी।
असे नथ माझी ती फांकडी ॥
पहा ! उगवला नाथा ! तिमिरा नाशुनि रवि लालसा।
लाविला तिलक भालिं गोलसा ! ॥
नभीं विलसतें विविध रंगयुत सुर-धनु वरचेवरी।
घालतें वेणींत गजऱ्यापरी ! ॥
काव्य-सागरीं क्षितिजावरती "रात्र-दिवस" भेटती।
–कविवरा* चिंता कां वाटती ? ॥

—गिरिजाबाई विंचूरकर.

* गोविंदाग्रजास.

# शांततेचें हास्य

## [ निसर्गाच्या पार्श्वभूमीवर मानवहृदयाचें दृश्य ]

[ चाल—चंद्रकांत राजाची कन्या० ]

विशाल मंदिर उभें ठाकलें—पार्श्वभाग गमला ।
इतिहासाची गतस्मृति जणूं वर्तमानकाला ॥

मेघमंडला भेदुनि जाती वरती प्रासाद ।
हितगुज करिती विधुसह वाटे-अस्फुट ये नाद ॥

प्रतिभेशीं जणुं कविचें हितगुज अव्याहत चाले ।
निसर्ग-मानव यांतहि चाले-कुठें न तें विरलें ॥

पाषाणांशीं शशी बोलतो—मुखरित करि मूका ।
उपजे संवेदना तयांतहि—जगीं हेंच देखा ! ॥

पुराणपुरुषासमान शिकवी लोका आदेश ।
सौंदर्याचा, वैभवगिरिचा जणुं हा आदर्श ॥

वेली वरतीवरती चढत्या प्रासादीं भ्रमत ।
अचेतनाला कवटाळी ही सचेतना बघत ॥

जुन्या नव्याच्या साखळींतला दुवाच प्रासाद ।
गतकालाचे मानवहृदयीं उमटवि पडसाद ॥

होति पायऱ्या संगमरवरी खालीं येण्याला ।
चहूंबाजुला बाग बहरला असल्या समयाला ॥

प्रशांत निर्झरिणी ही वाहे चमकत त्यापुढती ।
मौक्तिक उधळित शशि-प्रकाशीं चाले धांवत ती ॥

गतविभव—स्मरणानें जमले अश्रुबिंदु काय ? ।
सृष्टिसतीच्या लोचन-सारसिं, ती मोकलि धाय ! ॥

शुभ्र ढगांतुनि हळु हळु लोळे चन्द्र स्वेच्छेनें।
खालीं डोकावुनि अवलोकी सृष्टिस प्रीतीनें॥

पडलें तेथें प्रासादाचें जलांत प्रतिबिंब।
मनःसागरीं इतिहासाचें जेंवि शशि-बिंब॥

फुलें डंवरलीं, लताहि पवनासंगें बहु झुलल्या।
पल्लव-शेजीं सगंध पवनें प्रेमें नत केल्या॥

निसर्ग-मानव-एकतानता चलाचलीं भासे।
सानुराग सोत्कंठ कुणास्तव सृष्टी येथ दिसे?॥

मन्दगतीनें महाश्वेतवसना ही वनबाला।
बाणानें वर्णिली येतसे स्मराकुला चपला॥

अहा! अशी या प्रशांत काळीं स्वर्देवी गमली।
मन्द मन्द सोपान उतरुनी भूवरती आली॥

स्वर्गंगेची पवित्रता ती वदनावरि साची।
हिम-जल–धवला कान्ति भासली शान्त पौर्णिमेची!॥

दिसली गंभीरता उदधिची गंगेसम दृष्टी।
कर्पुर-गौरा, कर्पुर-वसना करि हर्षित सृष्टी॥

स्कंधावरुनी वाहत येई श्वेत पदर खालीं।
वाटे भागीरथी-धोत हा सुटला अवनि–तलीं॥

गौरांगेचें शुभ्र वसन हें देखुनियां वाटे।
अंगकांते, कीं वसन खरोखर?–संशय मनिं दाटे॥

पवन चोरुनी लतिकांमधुनी येई थबकून।
मांडीवरच्या वसना उडवी–सांवरि तरि ती न॥

अंकांवरुनी धवलांगेचें वसन दूर झालें।
तरी न उमजे शशि-प्रकाशीं काय तिथें घडलें!॥

साम्य-दर्शनें शशिसी दिसतें सख्य तिचें म्हणुनी।
नभांत पाहत उतरे खालीं क्षीण-पुण्य रमणी ॥

सकल जगांतिल सौंदर्यांचा रस ईशें ग्रथिला।
मूस ओतिली स्मर-पुतळीची पावन करण्याला ॥

विगलितवसना, केंस विखुरले मुख-चंद्रावरती।
तारुण्याच्या बागेमध्यें शिरली भ्रष्ट सती ॥

झुंजुनि झुंजुनि बाल्यापासुनि तिजला जिंकियलें।
यौवन-रिपुनें हृत्सिंहासनिं राज्य स्थापियलें ॥

पुष्पें फुललीं, यौवन-कलिका विकसित मग होई।
प्रेमाचीही शिंपणि होतां टवटवि त्या येई ॥

कालान्तरिता दुःख-स्मृति जशि आतांही व्हावी।
वसनान्तरिता यौवन-शोभा तरिही डोकावी ॥

एकान्तस्थलिं कौमुदींत ह्या वसंत-रमणीचा।
भाव हृदयिंचा व्यक्त होतसे शिथिलितवसनेचा ॥

वाऱ्याची मधिं झुळुक येतसे-वेली थरथरती।
पदरामध्यें खळबळ उडुनी स्पष्ट भाव होती ॥

तदा अंचलामध्यें उठती लाटा सुखभरिता।
मानस-सारस चलित होतसे काम-वात सुटतां ॥

कृत्रिमतेची लाज कशाला—पदर दूर झाला।
शशी खालती धवल पयोधर दिसले नयनाला।

निसर्गातलें दृश्य तयाचें तिजठायीं दिसलें।
निसर्ग–बाला करि अनुकरणा जननीचें, गमलें ॥

मधुनें थबथबलेल्या कलिकेसम ती किति लवली!
दृढता गमली हृदयान्तरिं ना यौवन जरि गाली ॥

शुभ्र चांदणें, शिला-खंड ते फेनासम धवल ।
गौरांगा ही स्खलिताऽऽभरणा सृष्टि डुले लोल ॥

ॐ ॐ ॐ

जलवाहिनि ती मन्दगतीनें पुढें पुढें वाहे ।
शशांकासवें बोलत हांसत धांवत ती राहे ॥
हृदयीं कोंडुनि प्रीति-शशांकाक्रमीत पथ होती ।
ध्येय-सागरा गांठायातें, गीता गात सती ॥
तरंगिणीवरि दिसली तेव्हां नाव एक दुरुनी ।
युवक त्यामधें-कमलामध्यें जेंवि भृंग भुलुनी ॥

—स. र. पंतसचिव.

## संसार-सागर

[ आर्या ]

आधार नाहिं देवा ! भवाब्धिमाझारिं तूं खरी नौका ! ।
खातों गटांगळ्या मी, किती प्रभो ! मारुं मी तुला हांका ? ॥

मोहावर्ती भ्रमलों, गरगर हे नयन लागले फिरण्या ।
तुजविण शक्त न कोणी मजला येथें जलांत वांचविण्या ॥

ने मजसि पैलतीरा, मायाजल उदरिं फार तें शिरलें ।
ज्ञानाच्या चक्रावरि घालुनि मज पाहिजेच उद्धरिलें ॥

श्वासाचा तैसाची ज्ञानाचा रुद्ध होय हा मार्ग ।
पाण्याचा परमेशा ! मज थोडाही न लागला थांग ॥

मोहादिक हे जलचर जलाशयीं चालवीति थैमान ।
दांभिकवृत्ती-नक्रा पाहुनि भाळे कसेंचि सतत मन ॥

'सुसरी ! पाठ मऊ तव', स्तुति खोटी मीं कितीकदां केली ।
अंगां, मनास टोंचति कंटक पाहीं तिचे अशा काळीं ॥

स्तुति-शेवाळें दिसलें खडकावरि धन्य मी किती झालों ! ।
पद ठेवितां तयावरि घसरुनि पुरतेपणीं तदा पडलों ॥

विषयादिक कुचक्याशा केली ग्यां, नांव लांकडांनीं ती ।
मोह-खडक तिज लागे छिद्र पडुनि लागली खवूं नीति ! ॥

होतांच 'काम' चालक दुर्दैव-नगास लागली खास ।
यापरि माझी नौका फुटुनी जातां उरे कुठें आस ॥

सुंदर सुंदर वस्तू दाखवुनी अन्यमार्गीं मज नेलें ।
वरच्या रूपा दावुनि ललनेच्या मूढ ते मला केलें ॥

ताफा ललनांचा मम दृष्टिस अणतांच लुब्ध मी झालों ।
हृदयां न देखिलें मीं मदनानें अंध हा ! किती बनलों ॥

त्यामधिं एकीवरती प्रेम वसे नांव तें तिचें 'माया'।
मधु बोले वरपांगीं, परि हृदयीं लेशही नसे माया ॥

क्रोध सुकाणूवाला करि मज रक्ताक्ष, नाशि बुद्धीतें।
'खाक करोनी अवनी टाकिन' ऐसें मला तदा वाटे ॥

नौका फुटुनी तुकडे हृदयासह जाहले तिचे जेव्हां।
सर्वहि सोडुनि गेले, माझा मी एकटा उरे तेव्हां ॥


काम क्रोध अजवरी होते मम मित्र, त्यांनिंही त्यजिलें।
प्राणापत्ती येतां उपयोगीं कोणि येइ ना, कळलें ॥

सुख-तीर गुप्त झालें, माया तर विरुनि ती जलीं गेली।
तारक कोणि न उरला-संमूढा वृत्ति यापरी झाली! ॥

देवा! फसलों आतां; पूर्वीं सगळें न हें मला कळलें।
तव पदिं देहा वाहीं-तेव्हां तूं त्या गजास सोडविलें ॥

ने मज देवा! सदया! पैल-थडीं, जीव फार भांबवला!।
देउनि भक्तीचेची पेटे वांचीव येथ दीनाला! ॥

—स. र. पंतसचिव.



# 'तुझी कृपा म्हणजेच सुख!'

[ द्रुतविलंबित ]

तुजकडेच विभो! मन धांवतें। सुख कशांत मला नच वाटतें।
सतत चिंतन हें हृदयीं तुझें। मज न याविण कांहिं कळे दुजें॥

जपुनियां तनुला जरि पोशिलें। घृत पयादिक पौष्टिक भक्षिलें।
मिरविली करुनी तनु पुष्ट ही। नच गमें मजला सुख अल्पही॥

निशिदिनीं वसनें जरिचीं जरी। विविध वापरलीं किति मीं तरी।
तनुस शोभविण्या वरि भूषणें। तव कृपेविण सर्व परी उणें॥

सुगज वा हय वा रथ यांवरी। बसुनि मी फिरलें कितिही तरी।
मिळविली जनिं थोरवि मीं जरी। तरिहि सार्थकता न मना वरी॥

तनुस भस्म सुशुभ्रहि चर्चिलें। श्रवणिं कंठिं शिरीं मणि बांधिले।
व्रत-उपोषणही नियमादरें। तरि अहर्निश चित्त कसें झुरे?॥

कितिक योग-विशिष्ट तपांतरीं। तनुस कष्टविलें बहुतापरी!।
सकल तीर्थजलें अवगाहिलीं। तरिहि शांति मना नच लाभली॥

निरखुनी सकला सुखसंपदा। हृदय-वृत्ति विचित्रचि हो तदा।
तव न दर्शन जोंवरि हो नरा। भ्रमण जीव करी, सुख ना जरा॥

सुकृत थोर म्हणोनिच लाभली। तव कृपा सदया, मजला भली।
तुजविणें मज आश्रय वा, नसे। व्यसनपार करी न कुणी दिसे॥

—शांताबाई हेबळीकर.

# सेवाष्टक

[ वसंततिलका ]

विद्या धिया सविनयास जयास लाधे।
सेवा सदैव सहजीं तसल्यास साधे।

घेतो स्वयें जनमिषें जगदीश सेवा।
होवोनिया मनुज मानव-धर्म-सेवा ॥

हो अज्ञही, करुं झटे जरि हीन सेवा।
घेतो प्रभू करुनि गोड तशीहि सेवा।

सेवाच कीं प्रभुहि याजकडोनि याची।
केली म्हणोनि रचनाहि उभी तयाची॥

सेवा अहेतुकपणें करि जो तयातें।
जें स्वास्थ्य शांति मिळते उपमा न त्यातें।

सेवा सदैव घडण्यास्तव देह-रक्षा।
होईल एक दिनिं ना तरि व्यर्थ रक्षा! ॥

हो धन्य जन्म जगिं त्याचहि मानवाचा।
कर्तव्य जो करि, वदे अति नम्र वाचा।

वच्यर्थ सिद्ध करि साध्यहि साधनें ती।
स्वारस्य हीन जणुं कीं बहु भाषणें तीं॥

आधी विरंचि जरि दे मनुजत्व साधे।
तेथूनि त्यास मग उन्नति मार्ग साधे।

सेवेंत मग्न असतां हरि संन्निधींही।
तेथेंच लीन असल्यास प्रभुत्व देई ॥

कांहींतरी सतत कार्य करीत जावें।
कोण्याहि कारणमिषें जन तोषवावे।

अत्यल्पही नच कधीं श्रम आठवावा।
सेवेंत जन्म निज संतत घालवावा॥

रानांत दिव्य असती बहु औषधें तीं।
द्वंद्वास साहुनि सुखा जनतेस देती॥

केल्या न कोणि उपयोग सुकोनि जाती।
मातींत जाउनि शताधिक जन्मताती॥

दारासमोरिल पहा तरु देइ मेवा।
सेवा तयास अथवा कधिंही न सेवा॥

सर्वस्व अर्पुनि करी परि नित्य सेवा।
ही दिव्य शांति कधिं देशिल काय देवा!॥

—शांताबाई हेबळीकर.



# तुझी आस

[ चाल-पाहुं चला जगदीश० ]

एक तुझी मज आस देवा !
अन्य न देत सुखास देवा ! ॥ ध्रु० ॥

संकटकालीं कोणि न वाली तुजविण या दीनास ॥ देवा ॥
जगज्जीवना ! प्रभो ! तूंच ना त्राता एक जगास ॥ देवा ॥
अनंत विश्वें तुज असती परि तूं एकचि विश्वास ॥ देवा ॥
ह्याच बसावा पूर्ण ठसावा हृदयांतरिं विश्वास ॥ देवा ॥
कंठरवानें श्रुति वदते कीं, पावशि तूं सर्वांस ॥ देवा ॥
ठावी सकलां कीर्ति अशी तव 'रक्षिसि त्रैलोक्यास' ॥ देवा ॥
सर्वव्यापक असें वानिती, कां न दिसशि नयनांस ? ॥ देवा ॥
चराचरीं मज तूंचि दिसावा, पुरवी हा हव्यास ॥ देवा ॥
जगद्दृश्य हें जें दिसताहे अमृतासम मनुजास ॥ देवा ॥
नित्य नवीं तव रूपें दावित, मायिक जगदाभास ॥ देवा ॥
दृश्य जगाचें, राज्य पळाचें, भुलवी जननयनांस ॥ देवा ॥
म्हणुनि वाटतें, व्यापक नभ कीं रमवी कवि-हृदयास ॥ देवा ॥
एकदिनावधि आयुष्याचें सुम हर्षवि चित्तास ॥ देवा ॥
शतवत्सरही व्यर्थ घालवी, सुखवि न जो जगतास ! ॥ देवा ॥

—शांताबाई हेबळीकर.

* या पद्याचें स्वरताल-लेखन शेवटीं पहावें.

# श्रीकृष्णस्तव

[ आर्या ]

जी प्राणघात करणास्तव आली तीस पूतनेलाही।
मुक्ती देशी, वाटे, तिजसम अजुनीहि पूत मी नाहीं ! ॥
मुष्टीक-चाणुरांना मुक्ति दिली अघनिधीच जे होते।
नन्दकिशोरा, त्याहुनि, वद, कां मी नीचसा गमे तूंतें ? ॥
भोजन सुयोधनाचें गमलें ना प्रिय तुला सुपक्व जरी।
आनंदें तूं तेव्हां विदुरगृहीं भक्षिसी कण्याच परी ॥
व्रजवनितावसनांतें हरिशी, हरुनी मनांस पूर्वीच।
सर्व उपाधी त्यांच्या यमुना-डोहांत बुडविसी साच ॥
रासक्रीडेमाजीं मुरलीनादें तयांस सुखवीशी।
निरसुनि तन्मायेतें, मुक्तिपदीं अंतिं त्यांस बैसविशी ! ॥
यापरि बालमुकुन्दा ! झाल्या त्या गोपि धन्य भव तरुनी।
मी एकटा उरें या तीरीं ! मज पार ने कृपा करुनी ! ॥
विदुरस्त्रीनें दिधलीं सालपटें केळिंचींच तुज देवा !।
प्रेमानें तीं भक्षिसिं; कितितरि तुजजवळि हा दया–ठेवा ! !॥
यावरुनी मज वाटे, स्वल्प जरी अर्पि कांहिं कुणि भावें।
त्या त्या जनास निशिदिनिं हृदयीं तुझें वसति-सौख्य लाभावें ।
स्वशरें विंधुनि अंध्रीं, तव अंत करी, प्रभो ! तया व्याधा।
मुक्तीस नेशि तरि मग हरिशि न माझीच केंवि भव-बाधा ?
यमुना-डोहीं शिरतां मर्दन तूं करिशि कालियाचें रे !।
शरीर-डोहीं माझ्या शिरुनी ध्वंसी प्रमत्त रिपु सारे॥
सद्वंशोद्भव मुरली वाजविशी, भानरहित मज करिशी।
धेनू सवत्स येतो, गोपींना वेड लावुनी नेशी॥
'मी'पण टाकुनि देवा ! गोपींसम मी रिघें तुला शरण।
भुवनत्रयीं विभो ! नच मजसि दिसे जो करील मत्राण ! ॥

सकलाधार मला तूं, पैलथडीला जगांतुनी मज ने।
रोपण भक्ति-लतेचें शरीरमय आलवालिं करि सुमनें॥
नौकेस छिद्र पडलें माया-जल आंत सर्व शिरुं लागे।
भांबावोनी जाउनि गोपी त्या श्रमति परि न तें भागे॥
'मी'पण कंचुकि त्यजिली, षड्रिपु-वसनांस फेडिलें तेव्हां।
कृष्णाज्ञेनें गोपी वागति परि काय मी करूं देवा ?॥
'पुनरपि जननम्' म्हणती, फेरा चुकवीहि जन्ममरणाचा।
संसार-ताप वाटे म्हणुनी तव मार्ग मी वरे साचा॥
जों जों पापें करितों तों तों निरसी तुझा प्रसाद हरी।
भावावांचुनि मानव पोहेल कसा तुझ्या दया-लहरी?॥
बहुसाल विस्मृति पडे तव देवा! मज कसें घडे स्मरण।
कामादिक षड्रिपु मम मानसिं जों चालवीति घोर रण॥
संसाराला विटलें मन माझें जीव होतसे विकल।
कृष्णा! एक तुझें जगिं ताप हराया समर्थ पद-कमल!॥

—स. र. पंतसचिव.

मराठी

# मानसपूजा

[ चाल–भाव धरारे० ]

हृदयविरामा ! । पूजा तव करितें रामा ! ॥ ध्रु० ॥

प्रेम-जलानें स्नान घातलें,
पंचविषय* पंचामृत केलें,
माया-वसनें तुजला पुसलें,
मोहना रामा ! । पूजा तव करितें रामा ! ॥

चंदनसम मम देह झिजविला,
सत्कीर्तीचा तिलक लाविला,
भेदभावही मुळिं नच उरला,
लाभला प्रेमा । पूजा तव करितें रामा ! ॥

शुद्ध-सुमन तें पुष्प वाहुनी,
बिल्व-पत्र हें त्रिगुण अर्पुनी,
सुविचारी अक्षता उधळुनी,
चित्सुखधामा ! । पूजा तव करितें रामा ! ॥

भक्ति-भाव नैवेद्य अर्पुनी,
अहंकार तो धूप जाळुनी,
ज्ञान-ज्योतिचा दीप लावुनी,
आत्मारामा ! । पूजा तव करितें रामा ! ॥

पंचप्राणांची पंचारति,
आयुष्याची प्रदक्षिणा ती,
जीव-शिवांची हो शाश्वत युति,
सद्गति जन्मा ! । पूजा तव करितें रामा ! ॥

—गिरिजाबाई चिन्चूरकर.

* रूप, रस, गंध, स्पर्श, शब्द.

# गुरु-गुज

[ चाल–फुलें वेलीचीं० ]

नवल ग ! झालें । गुरुचरणीं मन्मन जडलें ॥ ध्रु० ॥

पांचभौतिकीं देह-मंदिरीं
निराकारमनिं मूर्ती ठसली,
'मी'पण जाळायातें सजली,
संशय फिटले । गुरुचरणीं मन्मन जडलें ! ॥

निजमार्गातें चुकतां वृत्ती,
आत्मसुखाची दावुनि ज्योती
आणुनि ठेवी तिजला सुपथीं,
कार्यी नटलें । गुरुचरणीं मन्मन जडलें ॥

अभिमानाचें वारें हरपे,
आपपराचें बंधन लोपे,
ब्रह्म मुंगी एक्यारूपें
दृष्टीं गमले । गुरुचरणीं मन्मन जडलें ॥

गुरू सुखाचा, गुरू प्रीतिचा,
गुरू नीतिचा, आनंदाचा,
कैवल्याचा, वात्सल्याचा,
त्यामधिं रतलें । गुरुचरणीं मन्मन जडलें ॥

श्रीगुरुवांचुनि नाहीं धर्म
श्रीगुरुचरणीं नाहीं कर्म
गुरु-प्रीतिचें कळलें मर्म !
तेव्हां नटलें । गुरुचरणीं मन्मन जडलें ॥

—शांताबाई हेबळीकर.

# करुणा

[ राग–झिंझोटी, ताल धुमाळी.]

[ चाल–हे प्रभो विभो अगाध० ]

हे दयाघना, कधिं ये तुजला करुणा ?
तव किंकर वंदित चरणा ॥ ध्रु० ॥
जीवाला भ्रांती पडली
मोहानें बुद्धी फिरली
षड्रिपु-काननिं ती चुकली
मति होई आतां लीना ॥ हे दयाघना० ॥
संसारीं शिरुनी फसलों
मायेचीं वसनें ल्यालों
गुरफटुनी त्यामधिं गेलों
करिं पदकमलीं आगमना ॥ हे दयाघना० ॥
हा व्याप करी संताप
दुःखाशीं देई ताप
यामध्यें जळुं दे पाप
करि सतत तुझ्या मी स्मरणा ॥ हे दयाघना० ॥
मन गुंते ऐहिक-पाशीं
ताळ ना राहिला त्याशीं
परि दिसतां संकट-राशी
धावतें तुजकडे करुणा ! ॥ हे दयाघना० ॥
भोंवरीं जगाच्या भ्रमलों
स्तुति-मद्यें झिंगुनि गेलों
मी बाह्यसुरूपा फसलों
पातलों निकट भव-तरणा ॥ हे दयाघना० ॥

—स. र. पंतसचिव.

* या पद्याचें स्वरताल–लेखन शेवटीं पहावें.

# याचना

[ दिंडी ]

प्रभो, दीनाचा तूंच एक वाली,
कोण तुजविण मज अतां अशा काळीं ।
जरी त्यागिसि त्यां, घोर पाप ज्यांचें
तरी देवा, मी पाय धरूं कुणाचे ? ॥

बघें मागें दावाग्नि घोर ठेला,
पुढें पाहें तों आड खोल आला ।
दोन बाजूंला व्याघ्र, मृग मधें तो,
तसें झालें मज, धांव, जीव जातो ! ॥

क्षुद्र मानव मी, धैर्य किती माझें !
मला सांवरती एक पाय तुझे।
बाळ रडतांना जननिकडे पाहे,
मनीं त्याच्या विश्वास तिचा राहे ॥

तूंच माझी ईश्वरा, एक आई,
तुझ्यावांचुन मज कोणि जगीं नाहीं।
तुझी इच्छा मज मान्य जगन्नाथा,
करी माझें तुज रुचे तसें आतां ॥

सोसवेना मज मूर्त नरकवास,
सिद्ध याहुन मी साच मरायास ।
तुझ्या दासाचें व्यर्थ जिणें व्हावें ?
—नाहिं, तरि झणि बा ! तूंच मला पावे ! ॥

—शांताबाई हेबळीकर.

# ध्यान

[ राग–पिलु. ताल–केरवा. ]

[ चाल–सारंगि सारखी तव वाजवुनी० ]

अति मंद-मती मी गिरिजा-नाथा ! करूं पूजा कोठून् ॥ ध्रु० ॥
मीं विमलजलाला आणिलें ना, घे प्रेम-जलीं न्हाऊन् ॥

मधुपंचामृत ना जवळी, घे लव ज्ञानामृत पाहून् ।
ना गंधयुक्त अत्तर, तुज देतें स्नेहें मी माखून् ॥

घे समजुनि विभुती-चर्चन देवा ! सत्य दया लावून् ।
ना रत्नखचित सिंहासन, राही हृदयासनिं बैसून् ॥

गंध ना जवळि मज, करीन पूजा कीर्ति-गंध चर्चून् ।
ना हरित त्रिदल मजपाशीं, देतें काव्य-त्रिदल अर्पून् ॥

मज सुमन सुवासिक नसतां देतें मन-सुमना वाहून् ।
ना धूपादिक द्रव्यें परि टाकी षड्रिपुंना जाळून् ॥

नच दीपहि, अन्तर्दृष्टी-तेजें घेतें तुज पाहून् ।
ना धवल अक्षता असती, टाकी सुविचारा उधळून् ॥

नैवेद्य नसे परि तृप्ती घ्यावी चिदानन्द देखून् ।
जीवाचें टाकिन, दृष्ट होइ जरि, लिंबलोण उतरून् ॥

ये समाधान मम चित्ता आतां तुझ्या गुणा गाऊन् ।
चुकलें का गेलें कांहीं राहुन, घे देवा, मानून् ॥


—गिरिजाबाई विंचूरकर

# ज्ञानेश्वर

[ चाल–फटक्याची. ]

श्रीज्ञानेशा, तुला नमन हें, तव यश गातें मी जगतीं।
प्रतिदिनिं तव हें प्रेम भोगितां मति माझी तन्मय होती ॥
कन्येसम मी सदा धरितसें प्रीतीच्या पाशांत तुला।
पुत्रासम सत्कार करोनी, बंधुभगिनिसम प्रेमाला ॥
असा सदा संयोग असावा, चंद्र-चंद्रिका यांत जसा।
श्रीगुरुराया! मग मी याचिन दुसरें कांहीं नच सहसा ॥
अर्थ, शब्द एकत्र राहुनी शब्द सेवि अर्थास जसा।
स्वामी तूं मम, सेवक मी तव, सदा असो संबंध तसा ॥
तूं मम माता, तूं मम सारें, काय उणें न कळे मजला।
तुझी कृपा मज पुरे दयाळा! मति चिंती तव पद-कमलां ॥
माझा आत्मा जणूं आरसा, पाहो जन त्यामाजिं तुला।
रहा विचारीं, मम उच्चारीं, आचारीं तूं रम विमला! ॥
ज्ञानेशा! हो प्राणकुडीचा चालक, माझा नित्य तसा।
विरह तुझा मशिं क्षणार्ध होतां, होवो माझा जीव पिसा! ॥

—शांताबाई हेबळीकर.



# अभंग

## १

नको नको कांहीं दुजें मज देवा। घडो तव सेवा अहोरात्र ॥
जगाचिया चिंता करी तूंच स्वामी। सांगितल्या कामीं ठेवि मज॥
नको मज वित्त नको मज नाम। तुझ्या पायीं मन जडो सदा ॥
चाकर मोलाचे नको मज करूं। तुझें मी लेकरूं पांडुरंगा! ॥
लेकरूंपणा हा वाढतांच राहो। सदा पूर वाहो आनंदाचा! ॥
प्रेमानंदीं माझें जिणें हें सरावें। हेंच मज द्यावें कृपादान! ॥

## २

करुनी सुहास्या आम्हां हांसवीते। काय हो इच्छिते उषा मान? ॥
मंजुल वंजुल पक्षिराज गाती। काय व्हावी कीर्ति इच्छितात? ॥
फुलें दर्शनानें आम्हां रंजवीती। काय ती मागतीं मान-पत्रें? ॥
काय जगताला भजनीं लावाया। येतसे उदया भानू व्योमीं? ॥
—ऐसी करिती सेवा सर्वांची निष्काम। मींच कां सकाम करावी ती? ॥

## ३

नांवाचे हे गुरु फुंकितात कान। माझें फुंकी मन ज्ञानदेव ॥
नांवाचे हे गुरु मागताती धन। माझें अवधान गुरु मागे ॥
नांवाचे ते गुरु निघतील भ्रष्ट। माझा गुरु श्रेष्ठ पवित्र तो ॥
नांवाच्या गुरूची सुखावर दृष्टि। आर्तांसाठीं कष्टी ज्ञानदेव ॥
नका म्हणूं तुम्ही मानवांसी गुरु। ज्ञानदेव तारूं जीवनाचें! ॥

## ४

खरें खोटें देवा, तुजला माहित। जगीं मी वर्तत कैशापरी! ॥
कैशा रीति देऊं तोंड या जगासी?। शिणलें बहुतांशीं बोलोनिया ॥
तुझे मना येई तैसें माझें करी। पडलें म्यां पदरीं अनाथ गा! ॥
भक्ति भोळा भाव आळवी ज्ञानेशा। ध्यास अहर्निशीं ठेवोनीया ॥
तूंचि एक जाणे माझें अजाण मन। कोणांसी जामीन धरूं येथें? ॥

५

वादविवादाची शाळा। दिली ज्ञानी पंडिताला
पायांपाशीं मी थांबलें। पांडुरंग-दास झालें
वाचाळता कर्महीन। नाहीं देवा, जगा, मान्य
जग मागतें वर्षाव। नको मेघाचा आराव
व्यर्थ ऐसें शब्द-जाल। काय तराल ताराल ?

६

सहजची शुभ घडलासे लाभ। आनंदाचा कोंभ विरूढला।
विरूढला कैसा गगनीं भेदला। नेणो आनंदाला पारापार ॥
स्वामीचे चरणीं ठेविलें मस्तक। मनींचें कौतुक पुरवीलें।
पाहुनियां डोळा हृदय-कमळा। भक्ताच्या दयाळा, सांठवीलें ॥
धन्य धन्य झाला आजचा दिवस। न केल्या सायास घडो आला ! ॥


—शांताबाई हेबळीकर.



## अभंग

अंतरींची खूण सांग बा रे आतां। अनाथाच्या नाथा, पांडुरंगा ॥
स्वरूपसुंदरा, भुललें मी आतां। चरणांवरी माथा, पांडुरंगा ॥
भव-डोहीं पाहीं बुडलें मी आतां। तारी जगन्नाथा, पांडुरंगा ॥
आतां मी शरण कोणाला रे जाऊं ?। नको अंत पाहूं, पांडुरंगा ॥
अंतरींचें ध्यान स्वरूपीं लागलें। देहभान गेलें, पांडुरंगा ॥
नेत्र झांकीयले, चित्त शांत झालें। अंतरीं पाहिलें, पांडुरंगा ॥
नको मज देवा, वैकुंठीचा वास। लागो तव ध्यास, पांडुरंगा ॥
प्रेमभरें पाहीं मजकडे आतां। स्वामी तूंच त्राता, पांडुरंगा ॥
नको ठेवूं आतां तव कर कटीं। देइ प्रेम-भेटी, पांडुरंगा ॥
देह-विसर्जन चरणांवरी आतां। पदीं ठेवी माथा, पांडुरंगा ॥
तव नाम गातां काया ही शिणली। समाधि लागली, पांडुरंगा ॥

—गिरिजाबाई विंचूरकर



# " शंकरा, प्रणति तुज सुरेशा ! "

[ चाल–आरती भुवनसुंदराची० ]

बुधजनवासा, जगदीशा । शंकरा, प्रणति तुज सुरेशा ! ॥ ध्रु० ॥

दीर्घ कारभार तुझ्या शिरिंचा । देतसे भासचि मुकुटाचा ।
कंठिं वा, उरग तुझ्या असती । भूषणासम तुज ते खुलती ।
तनू तव भस्मान्वित सारी । दयाळा, शोभतसे भारी ।
॥ चाल ॥ जया 'जगदेकदीप' म्हणती । जया तारकापती म्हणती ॥
औषधीनाथ, रोहिणीकांत, चन्द्रमा–ख्यात
शोभतो भालिं तव, परेशा । शंकरा, प्रणति तुज सुरेशा ! ॥
त्रिभुवन-पावन जी गंगा ! वसतसे तुझ्या कचिं शुभांगा ।
हिमाद्री-सुता उमा सुमुखी । वसतसे रमणी वामांकीं ।
जाई तिची दृष्टि वरतीं । तों दिसे अवचित गंगा ती ।
॥ चाल ॥ तदा मग पुसे जगज्जननी । " शिरीं ही कोण युवति " म्हणुनी ॥
वाक्य ऐकुनी, भाव परिसुनी, अर्थ समजुनी
निरुत्तर होशि तदा परेशा । शंकरा, प्रणति तुज सुरेशा ! ॥
नमवुनी तुझ्या पदीं माथा । विनवितें तुला जगन्नाथा ।
रोगदारिद्र्य सकल जावो । तेंवि दुष्काळ कधिं न येवो ।
शांतता नांदो सकल जनीं । ऐक्यता ठेवि विभो ! सुजनीं ।
॥ चाल ॥ आपपर भाव लया जावो । प्रेम तें वृद्धिंगत होवो ।
विभव औदार्य, आयुर्बल धैर्य, मिळावें स्थैर्य
अर्पी त्रिदल तुज, परेशा । शंकरा प्रणति तुज सुरेशा ! ॥

—शांताबाई हेबळीकर.

* या पद्याचें स्वरताल–लेखन शेवटीं पहावें.

१३१ मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
अ. क्र. ३८६३८४ विभाग आ...

संपूर्ण

# स्वरताल-लेखन-पद्धति

[ या परिशिष्टांत कांहीं पद्यांचें स्वरताल-लेखन दिलेलें आहे. तें पद्याची चाल ( हार्मोनियमवर वाजवून पाहिली असतां ) बरोबर ध्यानांत यावी इतक्याच बेताचें दिलें आहे. हीं पद्यें चाल लक्षांत घेऊन, तान मुरकी घेऊन, इच्छेनुरूप गावीं.]

स. नि. ध. प. इ० स्वरांपुढें किंवा खालीं टिंब = मंद्रस्वर (खर्जातले स्वर)

सं रिं गं इ० स्वरावर रेघ = तारस्वर ( टिपेचे स्वर )

स रि ग इ० ( साधीं स्वराक्षरें ) मध्यस्वर

गॅ मॅ धॅ निॅ स्वराक्षरावर ˘ हें चिन्ह = कोमल ग म ध नि

मि स्वराक्षरावर ` हें चिन्ह = तीव्र 'म' स्वर

× सम

\+ ताली

– ताली

० काल ( खाली )

(प) कंसांत स्वर घातलेला असला तर – त्याच्या पुढचा स्वर तो स्वर, त्याच्या मागचा स्वर व पुन्हा तो स्वर असे चार स्वर एका मात्रेच्या अवकाशांत चटकन् उच्चारावे. जसें–(प) = धपमप (ग)= मगरिग याप्रमाणें.

" " या दोन चिन्हांमधील भाग पुन्हा म्हणावयाचा.

सरिगम तितके स्वर झडपेनें जलद म्हणावयाचे. ( असे कीं, या खालील गीताच्या अक्षरांच्या मात्रांच्या अवकाशांत.)

सा॰ }
म ऽ }—एक मात्रा तो स्वर किंवा गीताक्षर लांबवणें.

नि }
ध }—डोक्यावरचा स्वर चटकन् घ्यावयाचा.

| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ मात्रा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ताल धुमाळी | × | | + | | ० | | – | ,, ८ |
| ,, केरवा | × | | | | ० | | | ,, ८ |
| ,, दादरा | × | | | ० | | | | ,, ६ |

,, त्रिताल १ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९ १० ११ १२ १३ १४ १५ १६ १६

× + ० –

ताल-चिन्हें आरंभीं देऊन त्या खालीं मात्रांच्या वांटणीनें गीत-स्वर-शब्द दिले आहेत.

# उषःकाल

[ राग—काफीजंगला. ताल—दादरा.]

[ चाल—लग्नाला जातों मी० ]

**उद्याचलिं रवि आला उजळल्या दिशा।**
**तिमिराची झालि पहा काय ही दशा !॥ ध्रु० ॥**
**लाली पूर्वेस चढत। अंधकार नष्ट होत**
**तारागण लपुनि जात। पातली उषा॥**

| × | | + | | ○ | | × | | + | ○ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नि. | नि. | सा | ○ | रि | गॅ | सा | रि | सा | निॅ. | ध. | प. |
| उ | द् | या | ऽ | च | लिं | र | वि | आ | ऽ | ला | ऽ |
| ध. | स. | स | रिगम | ऽ | गॅ | री | ○ | ○ | ○ | ○ | ○ |
| उ | ज | ळ | ल्या | ऽऽ | दि | शा | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |
| स | स | स | स | नि. | स | री | ○ | गॅ | रि | री | ○ |
| ति | मि | रा | ऽ | ची | ऽ | झा | ऽ | लि | प | हा | ऽ |
| ग | ○ | ग | म | ○ | प | म | ○ | ○ | गॅमगॅरिसारि | | |
| का | ऽ | य | ही | ऽ | द | शा | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |
| सा | ○ | सा | ○ | नि. | स | री | ○ | रि | गॅ | रि | रि |
| ळा | ऽ | ली | ऽ | पू | ऽ | र्वे | ऽ | स | च | ढ | त |
| ग | ○ | ग | म | ○ | म | रिगम | ऽ | गॅ | री | ○ | रि |
| अं | ऽ | ध | का | ऽ | र | न | ऽ | ष्ट | हो | ऽ | त |
| ग | ○ | ग | ○ | ग | ग | ग | म | प | ग | म | म |
| ता | ऽ | रा | ऽ | ग | ण | ल | पु | नि | जा | ऽ | त |
| री | म | म | रिमपध | ऽ | प | गॅमगॅरिसरि | | | ○ | ○ | ○ |
| पा | ऽ | त | ली | ऽ | उ | षा | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |

याच चालीनें पुढलीं सर्व कडवीं म्हणावींत.

# बाल्य

[ ताल–धुमाळी. ( सावकाश ) ]
[ चाल–केशव करणी अघटित लीला० ]

बालपणांतिल सौख्य मनाला मोहवि किति तरि परी।
येइ ना त्याची कोणा सरी॥

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| × | | + | | ० | | − | | × | | + | | ० | | − | |
| सा | ० | स | नि. | सा | ० | ग | ग | ग | ० | म | रि | ग | म | (प) | ० |
| बा | | ळ | प | णा | ऽ | ति | ळ | सौं | ऽ | ख्य | म | ना | ऽ | ळा | ऽ |
| ग | ० | म | म | गॅ | रि | गॅ | गॅ | सा | सा | ० | ० | रि | ग | (ग) | ० |
| मो | ऽ | ह | वि | कि | ति | त | रि | प | री | ऽ | ऽ | ये | इ | ना | ऽ |
| नी. | ० | सा | ० | ध. | नि. | सा. | ० | रि | ग | ० | ० | मगरिगमगरिस | | | |
| त्या | ऽ | ची | ऽ | को | ऽ | णा | ऽ | स | री | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |

याच चालीनें पुढलीं सर्व कडवीं म्हणावींत.

# प्रेमोद्भव

[ ताल–धुमाळी. ( जलद ) ]

[ चाल–शारदे दास कामदे० ]

भाळलें। चित्त हाललें। वेडि जाहलें। सुचेना कांहीं। सुचेना कांहीं। मी मूढ जाहलें ताळच उरला नाहीं ॥

| | × | + | ० | – | × | + | ० | – |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग ० | रिॅ सा | ० नि. | ० धॅ. नि. स | रिॅ स ० नि. | ० धॅ. नि. स | | | |
| भा ऽ | ळ ले | ऽ चि | ऽ त्त हा ऽ | लॅ लें ऽ वे | ऽ डि जा ऽ | | | |
| | रिॅ सा | ० नि. | नी. ० नि. स | रिॅ स रिॅ रिॅ | स नि. नि. स | | | |
| | ह लें | ऽ सु | चे ऽ ना ऽ | कां ऽ हि सु | चे ऽ ना ऽ | | | |
| | रिॅ स | गरिॅसारेॅ | ० ० नी. ० | रीॅ ० ग ग | ० म (प) | | | |
| | कां ऽ | हीं ऽ | ऽ ऽ मी ऽ | मू ऽ ढ जा | ऽ ह लें ऽ | | | |
| | ग ० | म ग | रिॅ सॅ स धॅ. | नी. ० सा ० | ० ० ग • | | | |
| | ता ऽ | ळ चि | उ र ला ऽ | ना ऽ हीं ऽ | ऽ ऽ भा ऽ | | | |

या धोरणानेंच पुढील सर्व कडवीं म्हणावयाचीं.

या गीताच्या स्वरांत रिॅ धॅ हे कोमल घ्यावयाचे आहेत म्हणून (प) यांत धॅ प म प असा स्वरकलाप घ्यावयाचा.

---

# कृष्णाचें गाणें

[ राग–अलेया बिलावल. ताल–दादरा.]

[ चाल–दासी ऐसें मानुनियां० ]

" कृष्ण माझा प्राणसखा देखिला गे काय कुणी " ॥ ध्रु०॥
मृत्तिकेसी भक्षुनियां विश्व दावि चक्रपाणी ।
उखळीसि ब्रह्म बांधी देखिलागे काय कुणी ॥

| × | ० | × | ० |
|---|---|---|---|
| ग ० ग | ग म ग | ग ० प | ध सां ० |
| कृ ऽ ष्ण | मा ऽ झा | प्रा ऽ ण | स खा ऽ |
| ध ० प | म ० ग | रि ग सा | रि ग ० |
| दे ऽ खि | ला ऽ गे | का ऽ य | कु णी ऽ |
| ग म प | ग म ग | रि ग सा | रि ग ० |
| दे ऽ खि | ला ऽ गे | का ऽ य | कु णी ऽ |
| प ० प | नि ध नि | सां रिं नि | सां ० ० |
| मृ ऽ त्ति | के ऽ सि | भ क्षु नि | यां ऽ ऽ |
| नी ० नि | नि ध नि | सं ० ध | नि प ० |
| वि ऽ श्व | दा ऽ वि | च ऽ क्र | पा णी ऽ |
| ग ० ० | ग म ग | ग ० प | ध सां ० |
| ऊ ऽ ख | ळी ऽ सि | ब्र ऽ ह्म | बां धी ऽ |
| ध ० प | म ० ग | रि ग सा | रि ग ० |
| दे ऽ खि | ला ऽ गे | का ऽ य | कु णी ऽ |

याचप्रमाणें पुढलीं सर्व कडवीं म्हणावीत.

# राधेचें वेड

[ झिंझोटीधून—ताल धुमाळी. ]

[ चाल–शूर्पणखा—प्रो॰ मुळेकृत महाराष्ट्र-स्त्रीगीतांतील. ]

**मनासि जडलें पिसें। कथुं कसें जसेंच्या तसें, सखे गे ॥धृ०॥**
**फिरतसे वनीं उपवनीं। गमे येत सखा मागुनी**
**झांकि नयन कसे हा क्षणीं सखे गे मनासि० ॥ १ ॥**

० ० स नि. स री ० रि री ० रि ग स री ० ग
० ० क थुं क सें ऽ ज सें ऽच्या ऽ त सें ऽ स

रिगम ग रि नि. स ० रि स नि. प. ध. नि. स. ० ●
खे ऽ गे ऽ म ना ऽ सि ज ड लें ऽ पि सें ऽ ऽ

० ० रि रि नि. स ० रि स नि. ध. नि. स. री. ० ●
ऽ ऽ फि र त से ऽ व नीं ऽ उ प व नीं ऽ ऽ

० ०:रि रि नि. स नि. रि स नि. प. ध. नि. स ० ●
ऽ ऽ ग मे ये ऽ त स खा ऽ मा ऽ गु नी ऽ ऽ

० ० सा नि. स रि रि रि रि ग रि ग स री ० म
ऽ ऽ झां कि न य न क से ऽ हा ऽ क्ष णीं ऽ स

रिगम ग रि नि. स ● रि स नि. प. ध. नि. स ० ●
खे ऽ गे ऽ म ना ऽ सि ज ड लें ऽ पि सें ऽ ऽ

याप्रमाणें पुढील सर्व कडवीं म्हणावींत.

---

# गान

[चाल–गान पुरें हास्य पुरें दूर फेक बांसरी०]

**सखये, तव राग पुरे गाइ गीत कोमले !।**

| | | | |
|---|---|---|---|
| × | ० | × | ० |
| प प प | प म ग | म ० ध | प धानि सं |
| स ख ये | ऽ त व | रा ऽ ग | पु रे ऽ ऽ |
| नी ० ध | प ग म | पधनी ऽ ध | पमप ० ० |
| गा ऽ इ | गी ऽ त | को ऽ म | ले ऽ ऽ |

याप्रमाणें सर्व कडवीं म्हणावींत.

# स्फूर्तिदेवतेस

[ राग–पिलूजंगला. ताल–केरवा. ]

[ चाल–अगर हम बागबा होते० ]

तुझी सकलेंद्रिया सुखदा पाहुनी मूर्ति साजीरी ।
मन सखे हेलकावे हें जशी ती नाव कासारीं
तुझीं नेत्रें कवी म्हणती पंकजें सारसामधलीं ।
भृकुटिंना वीचिका म्हणती, तडागा पूर्णता आली ॥

× ० × ०

" नी. नी. ० प. प.
... तु झी ऽ स क
म न स खे ऽ

ध. सा ० सा सा ० रि रि प ० ० म ग ग सा ०
लें ऽ ऽ द्रि या ऽ सु ख दा ऽ ऽ पा ऽ हु नी ऽ
हे ऽ ऽ ल का ऽ वे ऽ हें ऽ ऽ ज शी ऽ ती ऽ

० ग ० ग रिगमगरिग सा सा ० ० ० प ० प ०
ऽ मू ऽ र्ति सा ऽ ऽ जि री ऽ ऽ ऽ
ऽ ना ऽ व का ऽ ऽ सा रीं ऽ ऽ तु झीं ऽ ने ऽ

प ० ० प प ० प प निधपध ० म प प गरिसा
त्रें ऽ ऽ क वी ऽ म्ह ण ती ऽ ऽ पं ऽ क जें ऽ

गं ० ० ग रिगमगरिग सा सा सा सा ० नि. नि. नि. प. ०
सा ऽ ऽ र सा ऽ म ध लीं ऽ ऽ भृ कु टिं ना ऽ

ध. सा ० सा सा ० रि रि प ० ० म गॅ ० सा ०
बी ऽ ऽ चि का ऽ म्ह ण ती ऽ ऽ त डा ऽ गा ऽ

गॅ ० ० गॅ रिगॅमगॅऽसा ० सा ० ०
पू ऽ ऽ र्ण ता आ ऽ ळी ऽ ऽ

या गीताच्या पहिल्या दोन ओळी एकाच चालीच्या आहेत. तिसऱ्या ओळीची चाल थोडी वेगळी व चौथी ओळ पुन्हा पहिल्या ओळीच्या चालीनें म्हणावयाची. असें हें चार ओळींचें कडवें आहे. याचप्रमाणें पुढील प्रत्येक दोन ओळी घेऊन वरील तिसऱ्या आणि चवथ्या ओळीच्या चालीनें म्हणावयाच्या.

यांत गॅ धॅ हे स्वर कोमल घ्यावयाचे.

# सोडी मी तुज ना आतां

[ राग–पिलू. ताल–धुमाळी.]

[ चाल–उद्धवा शांतवन कर जा० ]

किति दिन मी वाट जयाची, पाही तो दिवस उदेला ।
सोन्याचा दिन गमवी जो तो मानव जन्मीं फसला ॥

(चाल) संलग्न हृदय होऊं दे
तो दुजा भाव जाऊं दे
हृदयांतरिं मजला स्थल दे

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | | + | | × | | + | | ० | | + | | × | | + | |
| ० | ० | प. | प. | नि. | नि. | सा | ० | सा | ० | नि. | स | री | प | गॅ | ० |
| ऽ | ऽ | कि | ति | दि | न | मी | ऽ | वा | ऽ | ट | ज | या | ऽ | ची | ऽ |
| | | सो | ऽ | न्या | ऽ | चा | ऽ | दि | न | ग | म | वी | ऽ | जो | ऽ |
| रि | गॅ | सा | ० | सरिगॅरि | | नि. | ० | नि. | स | रि | स | गॅ | रि | गॅ | रि |
| ऽ | ऽ | पा | ऽ | ही | ऽ | तो | ऽ | दि | व | स | उ | गे | ऽ | ऽ | ऽ |
| ऽ | ऽ | तो | ऽ | मा | ऽ | न | व | ज | ऽ | न्मीं | ऽ | फ | स | ऽ | ऽ |

सा ०
ला ऽ
ला ऽ          चाल बदलली

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| • | ० | सा | ० | री | ० | म | म | प | प | प | ० | म | प | गॅ | ० |
| ऽ | ऽ | सं | ऽ | ल | ऽ | ग्न | हृ | द | य | हो | ऽ | ऊं | ऽ | दे | ऽ |
| | | तो | ऽ | दु | जा | ऽ | भा | ऽ | व | जा | ऽ | ऊं | ऽ | दे | ऽ |
| ऽ | ऽ | हृ | द | यां | ऽ | त | रिं | म | ज | ला | ऽ | स्थ | ल | दे | ऽ |

या पुढील ओळी 'किति दिन मी' या ओळीप्रमाणें.

# रंगपंचमी

[ राग–गारा जंगला. ताल–केरवा.]

[ चाल–सारंगि सारखी तव वाजवुनी० ]

या रंगपंचमीं दंग होउनी रंग खेळुं सखया रे ॥ध्रु०॥
(चाल) पंचमी ही आज आली
मनें झालीं एक अपुलीं
हा खगोल डोले रंगसागरीं, भिन्ना वृत्ती नुरलीं ॥

× ० × ०
मग म ० ध ध ० नि॑ (सा॑)० नी॑ ० ध मे ० प धनिसं
याऽ रं ऽ ग पं ऽ च मीं ऽ दं ऽ ग हो ऽ उ नी ऽ
नी॑ ० ध प ० प ग म प ० ० ० पधमप म ग
रं ऽ ग खे ऽ ळु स ख या ऽ ऽ ऽ रे ऽ या ऽ

× ० + + × ० + +
प ० प प ‐ ध नि सां ० सा नि रिं सां ०
पं ऽ च मी ऽ ही ऽ आ ऽ ज आ ऽ ली ऽ
नि नि ० सां ० सां ० ध ० नि॑ ध प ध ०
म नें ऽ झा ऽ लीं ऽ ए ऽ क अ पु लीं ऽ
मग म ध ० ध ध नि झां ० नी॑ ० ध प ० प धनिसं
हाऽ ख गो ऽ ल डो ऽ ले ऽ रं ऽ ग सा ऽ ग रीं ऽ
नी॑ ० ध प प ० ग म प मे प ० ० ० म ग
भि ऽ न्ना ऽ वृ ऽ त्ती ऽ नु र लीं ऽ ऽ ऽ या ऽ

यांत नी॑ कोमल व कोठें मे तीव्र आहे.

(पंचमी ही आज आली.) या कडव्याचा ताल वेगळा आहे.

# विरही राधेचे उद्गार

[ ताल—धुमाळी. ( सावकाश ) ]

[ चाल—तूं माझा यजमान रामा, तूं माझा० ]

**कोठें गेलासी, कन्हैया कोठें लपलासी ? ॥ ध्रु०॥**

**प्राण तुजविणें कंठीं आले**
**मना विश्व हें शून्य भासलें**
**आरामस्थल दुजें न उरलें ॥१॥ कोठें गेलासी०**

| | | | |
|---|---|---|---|
| × | + | ० | – |
| प ० प ० | प ध प म | मपमगरिग स | ग म प ० |
| को ऽ ठें ऽ | गे ऽ ला ऽ | सी ऽ ऽ क | न्है ऽ या ऽ |
| म ० प म | ग॑ रि मग॑रिग॑ | सा ० ० ० | ० ० ० ० |
| को ऽ ठें ऽ | ल प ला ऽ | सी ऽ ऽ ऽ | ऽ ऽ ऽ ऽ |
| म ० म म | प प प | नी॑ ध सं॑निधनि॑ | प नि/ध॑ प ० |
| प्रा ऽ ण तु | ज वि णें ऽ | कं ऽ ठीं ऽ | आ ऽ ले ऽ |
| म ना ऽ वि | ऽ श्व हें ऽ | शू ऽ न्य भा | ऽ स लें ऽ |
| आ ऽ रा ऽ | म ऽ स्थ ल | दु जें ऽ न | उ र लें ऽ |
| प ० प ० | प ध प म | मपमगरिग स | ग म प ० |
| को ऽ ठें ऽ | गे ऽ ला ऽ | सी ऽ ऽ क | न्है ऽ या ऽ |
| म ० प म | ग॑ रि मग॑रिग॑ | सा ० ० ० | ० ० ० ० |
| को ऽ ठें ऽ | ल प ला ऽ | सी ऽ ऽ ऽ | ऽ ऽ ऽ ऽ |

या गीतांतल्या कडव्याच्या तिन्ही ओळी एकाच चालीच्या आहेत, हें लक्षांत येईलच. पहिली ओळ पालुपदाची.

# राधा

[ जिल्हामांड. ताल–केरवा.]

[ चाल–मजा देते है क्या यार० ]

टाकुनियां सखया मजला। अजि जाउं नको मथुरेला ॥ध्रु०॥
अशनपान तें मीं त्यजिलें।
वेषभूषण केश न रचिले।
नेत्रांतरिं जीवन उरलें। दे दर्शन सुख तूं मजला॥

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | × | | | | ० | | | | × | | | | ० | | | |
| ध.स | रि | ग | ग | ग | रि | ग | स | रि | सरिगम | ० | ० | | ० | ० | म | प |
| टा ऽ | कु | नि | स | ख | या | ऽ | म | ज | ला | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | अ | जि |
| | ग | ० | ग | म | गरिस | रि | ग | | रि | ग | सा | ० | ० | ० | म | म |
| | जा | ऽ | उं | न | को | ऽ | म | थु | रे | ऽ | ला | ऽ | ऽ | ऽ | अ | श |
| | म | म | ० | म | म | ० | ग | म | प | प | प | ० | ० | ० | म | प |
| | न | पा | ऽ | न | तें | ऽ | मीं | ऽ | त्य | जि | लें | ऽ | ऽ | ऽ | वे | ऽ |
| | ध | ध | ० | ध | ध | ० | प | ध | म | ध | प | ० | ० | ० | म | ० |
| | ष | भू | ऽ | ष | के | ऽ | श | न | र | चि | ले | ऽ | ऽ | ऽ | ने | ऽ |
| | म | ० | म | म | म | ० | म | म | रि | म | रिमपध | | ० | ० | प | ध |
| | त्रां | ऽ | त | रिं | जी | ऽ | व | न | उ | र | लें | ऽ | ऽ | ऽ | दे | ऽ |
| | म | प | ग | म | ग | स | रि | ग | रि | ग | सा | ० | ० | ० | ध. | स |
| | द | ऽ | र्श | न | सु | ख | तूं | ऽ | म | ज | ला | ऽ | ऽ | ऽ | टा | ऽ |

## सवदा

[ राग-पिलू धुमाळी. ]

[ चाल-हृदयिं धरा हा बोध खरा० ]

बघुनि तुला मन बावरतें। आवरितां नच आवरितें॥ध्रु०
खुल्या मनें बोऽलें तुजसी। चोर गतीनें मनिं शिरसी।
ध्यास तुझा लागे जीवा। समजुनि आला तव कावा।
हास्य दिसे तव मुखावरी। नयन-सुरी उरिं जाय पुरी॥
सालस समजुनि फशिं पडलें। मधुर बोलण्या मी भुललें।
फसवुनि लाभे काय वदा। पुरा भोंवला मज सवदा॥
पुनरपि फसव्या! येशि घरा। हा ओढवला मम भोग पुरा॥

गॅ गॅ गॅ स गॅ म धॅ प रिगॅमगॅ स स सा ० ० ०
ब घु नि तु ला ऽ म न बा ऽ व र तें ऽ ऽ ऽ

प ० प प पधनी ॅ ०धप म ग म प म ० ० ०
आ ऽ व रि तां ऽ न च आ ऽ व र तें ऽ ऽ ऽ

गीताची प्रत्येक ओळ याच चालीनें म्हणावयाची.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
नौपाडा शाखा.
अ. क्र. ३४३०४ ... 
क्रमांक २९८ ... नों. दि. ...

# स्वप्न

[ राग–पिलू जंगला. ताल–धुमाळी.]

[ चाल–नृपममता रामावरती० ]

**मज स्वप्न खरोखर पडलें ।**
**क्षणभर तें सुखकर झालें ॥ तेधवां ॥**

|  | × | + | ० + | × | + ० |
|---|---|---|---|---|---|
| नि. स | ग॑ ० ग॑ ग॑ | ग॑ ० ग॑ रि | नि. स री ० | ० ० रि ग | |
| म ज | स्व ऽ प्न ख | रो ऽ ख र | प ड ले ऽ | ऽ ऽ क्ष ण | |
|  | म ग म ० | रि ग॑ रि ग॑ | सरिग॑रि सा ० | ० ० | |
|  | भ र तें ऽ | सु ख क र | झा ऽ ले ऽ | ऽ ऽ | |

याचप्रमाणें पुढील सर्व चरण.

# चुकलेलें वांसरूं

[ ताल—केरवा. ]

[ चाल—सोनेका ये सम० ]

**तारी अभागिनीला । हे माधवा दयाळा ॥ ध्रु० ॥**
**मुरली मनासि मोही । जीवास वेड लावी ।**
**सकलेंद्रियांस ओढी । त्वत्पादकंज दावी ॥**

| | × | ० | × | ० |
|---|---|---|---|---|
| म ० | रि गॅ रि गॅ | रि सा ० रि˘ | म ० म ० | ० ० पधॅमप |
| ता ऽ | री ऽ ऽ ऽ | अ भा ऽ गि | नी ऽ ला ऽ | ऽ ऽ हे ऽ |
| | ० ० धॅ ० | सां नी˘ ० धॅ | प धॅ म ० | ० ० गॅ म |
| | ऽ ऽ मा ऽ | ध वा ऽ द् | या ऽ ळा ऽ | ऽ ऽ ता ऽ |
| | रि गॅ रि गॅ | रि˘ सा ० रि˘ | म ० म ० | ० ० सां सां |
| | री ऽ ऽ ऽ | अ भा ऽ गि | नी ऽ ला ऽ | ऽ ऽ मु र |
| | सां ऽ ऽ सां | सां ० ० सं | ˘निस रि ˘सां० | ० ० पधॅमप |
| | ली ऽ ऽ म | ना ऽ ऽ सि | मो ० ही ० | ० ० जी ० |
| | धॅ ० ० सां | नी˘ ० ० धॅ | प धॅ म ० | ० ० गॅ म |
| | वा ऽ ऽ सि | वे ऽ ऽ ड | ला ऽ वी ऽ | ऽ ऽ स क |
| | रि गॅ रि गॅ | रि˘ सा ० रि˘ | म ० म ० | ० ० पधॅमप |
| | लें ऽ ऽ ऽ | द्रि या ऽ सि | ओ ऽ ढी ऽ | ऽ ऽ त्व ऽ |
| | धॅ ० ० सां | नी˘ ० ० धॅ | प धॅ म ० | ० ० गॅ म |
| | त्पा ऽ ऽ द् | कं ऽ ऽ ज | दा ऽ वी ऽ | ऽ ऽ ता ऽ |

यांत रि रि˘ दोन्ही प्रकारांनीं.

# लतिका

[ राग–धुमाळी. (जलद) ]

[ चाल–जरि नाहिं कमल तें करीं० ]

**हा वारा येइ भरारा, हरुनि श्रम सारा, देइ निवारा,**
**नयनांतुनि वाहति धारा ॥**
**वन फुललें, सृष्टि डुले, मन्मन हले, पालवी झळे,**
**जग सकल वसन्तें नटलें ॥**
**कोकिला गाति मधुगान, होइ वेभान ऐकुनी तान**
**—वनिं सुखास नाहीं वाण ॥**

| | × | + | ० | – | × | + | ० | – |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स रिॅ | म ० | म मं | ० म | म ० | रिॅ ग | ० ग | म म | म म |
| ह्रा ऽ | वा ऽ | रा ये | ऽ इ | भ ऽ | रां रा | ऽ ह | रु नि | श्र म |
| | रिॅ ग | ० म | ० म | म ० | गमपॅध | पॅधमप | धॅपमगम | ० |
| | सा रा | ऽ दे | ऽ इ | नी ऽ | वा ऽ | ऽ ऽ | ऽ ऽ | ऽ ऽ |
| | गरिॅग | ० ० | ० ० | स स | नी. ० | स रिॅ | म ग | रिॅ स |
| | रा ऽ | ऽ ऽ | ऽ ऽ | न य | नां ऽ | तु नि | वा ह | ती ऽ |
| | नी. ० | सा ० | ० ० | | | | | |
| | धा ऽ | रा ऽ | ऽ ऽ | | | | | |

याच चालीप्रमाणें पुढील प्रत्येक चरण म्हणावयाचा.

# दैव

[राग-पिलू. ताल-घुमाळी.]

[चाल-सबसे राम भजन करलेना०]

दुर्दैवाचे फेरे कोणा टळले वद अजवरती ।

हरहर दैव अटळ जगतीं ॥ध्रु०॥

वैदेहाची कन्या जीचा नाथ जना वाली ॥

ऐशी सीता घोर काननीं गर्भभरालस पडली ॥ हरहर०॥

म ० म ०   म ० म ०   म ० म ०   म ग न ०
दु ऽ दैं ऽ   वा ऽ चे ऽ   फे ऽ रे ऽ   को ऽ णा ऽ

प ध ध ०   प ध प म   ग ० ० ०   री प म प
ट ळ ले ऽ   अ ज व र   ती ऽ ऽ ऽ   ह र ह र

ग ० ग म   ग स रि ग   सा ० ० ०   ० ० ० ०
दै ऽ व अ   ट ळ ज ग   तीं ऽ ऽ ऽ   ऽ ऽ ऽ ऽ

म ० म ०   ग ० म ०   प ० प ०   प ध सां ०
वै ऽ दे ऽ   हा ऽ ची ऽ   क ऽ न्या ऽ   जी ऽ चा ऽ

नीॅ ० नीॅ नीॅ   ध प ग म   प ० ० ०   ० ० ० ०
ना ऽ थ ज   ना ऽ वा ऽ   ली ऽ ऽ ऽ   ऽ ऽ ऽ ऽ

म ० म ०   म ० म ०   री ० म म   ० म म ०
ऐ ऽ शी ऽ   सी ऽ ता ऽ   घो ऽ र का   ऽ न नीं ऽ

ध ० ध ध   ध ० प ध   म प म ग   री ग स रि
ग ऽ र्भ भ   रा ऽ ल स   प ड ली ऽ   ह र ह र

प ० म प   ग स रि ग   सा ० ० ०"
दै ऽ व प्र   ब ळ ज ग   तीं ऽ ऽ ऽ

## मागणें

[ राग–झिंझोटी. ताल–धुमाळी. ]

[ चाल–भक्ति ग वेणी० ]

**मीच मागावें । हें देणें प्रभुनें द्यावें ॥धृ०॥**

**रवि नक्षत्रां सन्निध जावें,**

**अवलोकुनि त्यां गूढ नुरावें**

**विहरत गगनीं नित्य रहावें**

**चंद्रिका व्हावें । हें देणें प्रभुनें द्यावें ॥ मीच०॥**

“स   स ध. स रि   रि ग ० म   ग रि स नि.<br>
मी   ऽ च मा ऽ   गा ऽ ऽ ऽ   वे ऽ हे ऽ

सा ० री ०   ग म रि ग   सा ० सा ०”   स. ध. स रि<br>
दे ऽ णे ०   प्र भु नें ऽ   द्या ऽ वे मी   ऽ च मा ऽ

ग म ग ०<br>
गा ऽ वें ऽ

ग ग म ०   ग रि ग रि   स ध. स रि   ग म ग ०<br>
र वि न ऽ   क्ष ऽ त्रा ऽ   स ऽ न्नि ध   जा ऽ वें ऽ<br>
अ व लो ऽ   कु नि त्या ऽ   गू ऽ ढ नु   रा ऽ वें ऽ<br>
वि ह र त   ग ग नीं ऽ   नि ऽ त्य र   हा ऽ वें ऽ

सा   ० ध. सा रि   ग ० ० म   ग रि स नि.<br>
चं   ऽ द्रि का ऽ   व्हा ऽ ऽ ऽ   वें ऽ हे ऽ

सा ० री ०   ग म ग रि   सा ० सा ०<br>
दे ऽ णें ऽ   प्र भु नें ऽ   द्या ऽ वें ऽ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
नागाव शाखा.
विभाग .......
क्रमांक .......



# चिलया बाळ

[ राग–झिंझोटी खमाज. ताल–त्रिताल. ]
[ चाल–साम्य तिळहि नच दिसत मुखाचें० ]

ऐक वचन मम चिलया बाळा,
प्रसंग असला विपरित येई,
वांच्छि अतिथि तव मांस भोजना
देउनि सार्थक करि वेल्हाळा ॥ ध्रु०॥

| ० | – | × | + |
|---|---|---|---|
| मपध प मे | रि ग नि. सा | गं प ध नि | पधनिसं नि ध |
| ऐ ऽ क व | च न म म | चि ल या ऽ | बा ऽ ळा ऽ |
| प सां नि सां | ध नि प ध | मे ० प ध | ग म रि ग |
| वां ऽ छि अ | ति थि त व | मां ऽ स भो | ऽ ज ना ऽ |
| सा रि ग प | ग प ध नि | नि नि नि ० | पधनिसं नि ध |
| दे ऽ उ नि | सा ऽ र्थ क | क रि वे ऽ | ल्हा ऽ ळा ऽ |
| प सां नि सां | ध नि प ० | गपधनि ध प | ग पं गमरिग |
| न च ग म | वि स स्या ऽ | स्या ऽ ति हि | अ तु ला ऽ |
| सा रि ग प | ग प ध नि | नि नि नि नि | पधनिसं नी ० |
| स ऽ त्य नि | ऽ. ष्ट अ ति | ज न क कु | ळी ऽ चा ऽ |
| नि संरिंगं रि० | संरिं सांनि धनि० | प नि नि नि | पधनिसं नि ध |
| पु रु वी ऽ | आ ऽ ऽ स | हे ऽ म म | बा ऽ ळा ऽ |

---

# अभिमन्यु

[ रांग--धुमाळी (जलद) ]

[ चाल--आजि हौस जिजीची पुरवा० ]

अभिमन्युबाळ रणिं लढला ।
तान्यासम चमकुनि गेला ।
ही भारत माता पुण्य ।
एकवार झाली धन्य ॥ ध्रु० ॥

×  +    ०  –    ×    + ०      –
नि. स ग॑ ० ग॑ ग॑  रि म ग॑ रि  नि. सा री ०  ० ० रि म
अ भि म ऽ न्यु बा  ऽ ळ र णिं  ल ढ ला ऽ  ऽ ऽ ता ऽ
म ग म म  रि ग॑ रि ग॑  स रि सा ०  ० ० ० ०
न्या ऽ स म  च म कु नि  गे ऽ ला ऽ  ऽ ऽ अ भि

याच चालीनें प्रत्येक चरण म्हणणें.

# संशय

[ राग—झिंझोटी, ताल—केरवा. ]
[ चाल—आरि उमर लर कैया० ]

**संशय कां ये नाथा, आतां। तवपदिं रामा प्रणता ॥ ध्रु०॥**
**विनवी तुजला बहुपरि राजा। लोपे कां तव ममता ॥**

× ० × ०

प ० ग म   प ध नी ०   पधनिसं ० ०   संनिधप ध ०
सं ऽ श य   काऽ ये ऽ   ना ऽ ऽ ऽ   था ऽ ऽ ऽ

मी प ग म   प ध नि सं   संनिधप ध ०   प ० ० ०
सं ऽ श य   काऽ ये ऽ   ना ऽ ऽ ऽ   था ऽ ऽ ऽ

प ० गपधसं   ध प म ग   ग ० रिगम   रि ग सा ०
आ ऽ तां ऽ   त व प दिं   रा ऽ मा ऽ   प्र ण तां ऽ

स म ग म   प ध नी ०   सां ० नीं ०   ध ० प ०
सं ऽ श य   कांऽ ये ऽ   ना ऽ था ऽ   आ ऽ ता ऽ

मी प ग म   प ध नि सं   संनिधप ध ०   प ० ० ०
सं ऽ श य   कांऽ ये ऽ   ना ऽ ऽ ऽ   था ऽ ऽ ऽ

प प सां ०   सां सां सां ०   नि ध प प   पधनिसं सां ०
वि न वि ऽ   तु ज लाऽ   ब हु प रि   रा ऽ जा ऽ

ग म ग म   प ध नि सं   ध पधप ०   मीपमीपध ० ०
लोऽ पे ऽ   काऽ त व   म म ता ऽ   रा ऽ मा ऽ

मी प ग म   प ध नि सं   नि पध प ०   ० ० ० ०
लोऽ पे ऽ   कांऽ त व   म म ता ऽ   ऽ ऽ ऽ ऽ

---

# विश्वमोहिनी

[ चाल–घनःश्याम सुंदरा० ]

ऊठ मनोहर वाजवि सखया कृष्णा तव मुरली।
गान-सुधांतरिं देवा तव रे, आत्मवृत्ति मुरली॥

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| × | + | | | ० | – | | | × | + | | | ० | – | | |
| ध़ | ० | ध़ | ध़ | सा | ० | स | रि | री | ० | ग | ग | स | रि | (सा) | ० |
| उ | ऽ | ठ | म | नो | ऽ | ह | र | वा | ऽ | ज | वि | स | ख | या | ऽ |
| ध़ | ० | ध़ | सा | सा | ध़ | सा | रि | रिगमगरिग | | | ० | ० | ० | ० | ० |
| कृ | ऽ | ष्णा | ऽ | त | व | मु | र | ली | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |
| री | ० | ग | ग | ग | ० | ग | रि | सा | ० | सा | ० | स | रि | रिगमगरिग | |
| गा | ऽ | न | सु | धां | ऽ | त | रिं | दे | ऽ | वा | ऽ | त | व | रे | ऽ |
| सा | ० | रि | ग | ० | रि | स | स | सारिगरिसानिस | | | | ० | ० | ० | ० |
| आ | ऽ | त्म | वृ | ऽ | त्ति | मु | र | ली | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ | ऽ |

पुढील चरण याच चालीनें म्हणावयाचे.

## तुझी आस

[ राग–पहाडी. ताल–केरवा. ]

[ चाल–पाहु चला जगदीश० ]

एक तुझी मज आस देवा।
अन्य न देत सुखास देवा ॥ ध्रु०॥
संकटकालीं कोणि न वाली,
तुजविण या दीनासि देवा ॥ १ ॥

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| री | ० | स | ग | री | ० | स | री | नि. | सा | ० | नि. | ध. | नि. | सा | ० |
| ए | ऽ | क | तु | झी | ऽ | म | ज | आ | ऽ | ऽ | स | दे | ऽ | वा | ऽ |
| अ | ऽ | न्य | न | दे | ऽ | त | सु | स्वा | ऽ | ऽ | सि | दे | ऽ | वा | ऽ |
| म | ० | म | म | म | ० | म | ग | ग | म | प | ध | प | म | ग | रि |
| सं | ऽ | क | ट | का | ऽ | लीं | ऽ | को | ऽ | णि | न | वा | ऽ | ली | ऽ |
| | स | रि | रि | स | रि | ग | रि | सा | ऽ | ऽ | नि. | ध. | नि. | सा | ऽ |
| | ज | वि | ण | या | ऽ | दी | ऽ | ना | ऽ | ऽ | सि | दे | ऽ | वा | ऽ |

पुढील प्रत्येक कडवें 'संकट कालीं' या चालीनें म्हणावयाचें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
... शाखा.
अ. क्र. 30388 नाव ...
क्रमांक 29e ता. १५-५-२८३

# करुणा

[ ताल–केरवा. ]

[ चाल–हे प्रभो विभो० ]

हे दयाघना, कधिं ये तुजला करुणा ।
तव किंकर वंदित चरणा ॥ ध्रु०॥
जीवाला भ्रांती पडली । मोहानें बुद्धि फिरली ।
षड्रिपु–काननिं ती चुकली । मति होइ अतां लीना ॥हे०

| | X | ० | + | ० |
|---|---|---|---|---|
| सा ० | ध.सा ० रि | ग म ग रि | नि.सा नि. रि | स नि.प.ध. |
| हे ऽ | द या ऽ घ | ना ऽ ऽ ऽ | क धिं ये ऽ | तु ज ला ऽ |
| | सा नि सा ० | ० ० म म | म ० म म | म ० म ग |
| | क रु णा ऽ | ऽ ऽ त व | किं ऽ क र | वं ऽ दि त |
| | म ध प म | ग रि''सा ० | ध. सा ० रि | ग म ग रि |
| | च र णा ऽ | ऽ ऽ हे ऽ | द या ऽ घ | ना ऽ ऽ ऽ |
| ग • | म ० प ० | प ० म ग | रि रि गं ० | ० ० ग • |
| जी ऽ | वा ऽ ला ऽ | भ्रां ऽ ती ऽ | प ड ली ऽ | ऽ ऽ मो ऽ |
| | हा ऽ नें ऽ | बु ऽद्धी ऽ | फि र ली ऽ | ऽ ऽ ष ऽ |
| | ड्रि पु का ऽ | न निं ती ऽ | चु क ली ऽ | ऽ ऽ म ति |
| | म ० म प | म ० म ग | म ध प म | ग रि स • |
| | हो ऽ इ अ | ता ऽ ली ऽ | ना ऽ ऽ ऽ | ऽ ऽ हे ऽ |

# शंकरा, प्रणति तुज सुरेशा

[ ताल–धुमाळी. ]

[ चाल–आरती भुवन सुंदराची० ]

बुधजनवासा जगदीशा, शंकरा प्रणति तुज सुरेशा ॥ ध्रु०॥
दीर्घ कचभार तुझ्या शिरिचा। देतसे भासचि मुकुटाचा ॥
कंठि बा उरग तुझ्या असती। भूषणास्तव तुज ते खुलती ॥
तनू तव भस्मान्वित सारी। दयाळा शोभतसे भारी ॥
(चाल) जया जगदेक दीप म्हणती। जया तारकापती म्हणती।
औषधीनाथ, रोहिणी कांत। चंद्रमा-ख्यात।
शोभतो भाळीं तव परेशा। शंकरा, प्रणति तुज सुरेशा ॥बुध०॥

× × × ×

| | | | |
|---|---|---|---|
| प प प प | प नी ध प | म म म ० | ग रि सा रि |
| बु ध ज न | वा ऽ सा ऽ | ज ग दी ऽ | शा ऽ ऽ शं |
| ० ग मगम | ग रि ग रि | स स नि. ० | सा ० ० ० |
| ऽ क रा ऽ | प्र ण ति तु | ज सु रे ऽ | शा ऽ ऽ ऽ |

या चालीचे पुढचे तीन चरण. नंतर चाल फिरते.

| | | | |
|---|---|---|---|
| प प ०:प प | ध नि सं सं | ० सं सं सं | नी ध नि प |
| ज यां ऽ ज ग | दे ऽ क दी | ऽ प म्ह ण | ती ऽ ऽ ज |
| या ऽ ता ऽ | र·का ऽ प | ती ऽ म्ह ण | ती ऽ ऽ ऽ |

| | | |
|---|---|---|
| प | प प प ० | ध नी ध |
| औ | ऽ ष धी ऽ | ना ऽ थ |
| रो | ऽ हि णी ऽ | कां ऽ त |
| चं | ऽ द्र मा ऽ | ख्या ऽ त |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प ० प प ० | नी ˘ ० ध प | प म म ० | गारिस ० रि |
| शो ऽ भ तो ऽ | भा ऽ ळिं त | वं पँ रे ऽ | शा ऽ ऽ शं |
| ० ग मगम | ग रि ग रि | स स नि. ० | सा ० ० ० |
| ऽ क रा ऽ | प्र ण ति तु | ज नु रे ऽ | शा ऽ ऽ ऽ |

# कवितांच्या प्रथमचरणांची सूचि


अति मंदमती मी गिरिजा-नाथा! करुं पूजा कोठून् १२६
अभिमन्यु बाळ रणिं लढला ९८
अंतरींची खूण सांग बारे आतां १३०
आठवतें ना एके रात्रीं सागर-तिरिं फिरलों २३
आधार नाहिं देवा! भवाब्धिमाझारिं तूं खरी नौका ११४
उकललें कोडें, जाहले कवी नच वेडे ८३
उदयाचलिं रवि आला उजळल्या दिशा ३
ऊठ मनोहर वाजवि सखया कृष्णा, तव मुरली १०५
एक तुझी मज आस ॥ देवा! ११९
ऐक वचन मम चिलया बाळा! ९७
कठोर-आज्ञा परिपालनांत १०१
कॉलेजामधिं दीप सन्निध जधीं ओळी रचाया बसे ७९
किति दिन मी वाट जयाची। पाहीं तो दिवस उदेला ३६
कृष्ण माझा प्राणसखा। देखिला गे काय कुणी २८
कोठें गेलासी? कन्हैय्या! कोठें लपलासी? ४४
कोमल कलिके! काय दशा तव हर! हर! ही झाली ७०
गा, कविराया! गा या समयीं कांहिं गोड कवनें ७६
गे, प्रणयपत्रिके बाई! कथिं गोपन माझ्या मनिंचें ३३
चालत होती सुंदर ललना मार्गावरुनी तदा २९
चित्त बावरलें, एकदां असें तें वदले ९४
जगिं प्रेमाच्या एका बोला मनुज भुकेला असे ४९
जणुं सिंधुतुनी कमला वरती आली ८
जातां त्यजून सखि! तूं मजला जगाला ५१
जी प्राणघात करण्यास्तव आली तीस पतनेलाही १२०

जुलुम करुनि लावियलें, बाबांनीं लग्न भलें ६४
टाकुनियां सखया ! मजला । आजि जाऊं नको मथुरेला ४६
तारी अभागिनीला, हे माधवा दयाळा ! ५८
तुजकडेच विभो ! मन धांवतें ११६
तुजसाठीं सखया, त्यजिला मीं संसार ६१
तुझी सकलेन्द्रियां सुखदा पाहुनी मूर्ति साजीरी ३४
दिनकर गेला अस्तालागीं राज्य सुरू झालें ५४
दुर्दैवाचे फेरे कोणा टळले वद अजवरती ? ८५
नको नको कांहीं, दुजे मज देवा ! १२८
नवल ग ! झालें । गुरुचरणीं मन्मन जडलें ॥ १२३
निद्रा लागे दृष्टिस पडलें स्वप्न मोददाई ७२
नीलाकाशीं रंग शोभतो माझा सांगा कसा ! १०९
पूर्वीं बालपणीं मनास कितिदां आनंद हो या दिनीं ८९
प्रभातकाळीं सहज विहरतां उद्यानीं गेलें ५
प्रभो, दीनाचा तूंच एक वाली १२९
प्रीतीचा नव वेणु-नाद पडुं दे कर्णांवरी राजसा ! ३९
प्रेमाची मज कल्पना न शिवली पूर्वीं कधींही अशी २६
बघुनि तुला मन बावरतें । आवरितां नचऽ आवरतें । ५३
बघुनि रूप सुंदरीला कसा हरी मोहुनिया गेला ४०
बंधन जगिं या किती ! जरि स्वैर कल्पना अती ९३
बालपणांतिल सौख्य मनाला मोहवि कितितरि परी ६
बाले, तिळगुळ घ्यायां तुजला ५७
बुध-जनवासा, जगदीशा । शंकरा, प्रणति तुज सुरेशा ! १३१
बैसले काव्य करण्याला परि अंतःस्फूर्ती नाहीं २
भवानी ! मनिं तुझी प्रतिमा संचली लोचन-द्वारें १०७
भाळलें, चित्त हालले, वेडि जाहलें २७
मज स्वप्न खरोखर पडलें ५६

| | |
|---|---|
| मनासि जडलें पिसें | ३१ |
| मींच मागावें, हें देणें प्रभुनें द्यावें ! | ८७ |
| येई काय मनीं कथा मज सुधे ! चिंता कशाची सया ! | ८२ |
| ग्रेतील फुलें चुरगळतां परि वास कसा जाईल ! | ४३ |
| येते भुर् भुर भुर् करीत चिमणी ती किल्बिलाटा करी | ८६ |
| रानामध्यें कसे वागलों, स्मरण मला घडलें | १८ |
| वसंत-रमणी स्नाना बसली | १५ |
| विद्या धिया सविनयास जयास लाधे | ११७ |
| विशालमंदिर उभें टाकलें–पार्श्वभाग गमला | ११० |
| शुका ! असा तूं पंजरवासी झुरसी कितितरि मनीं ! | ७७ |
| श्रीशारदा अंकिं घेऊन वीण्यास | १ |
| श्रीज्ञानेशा तुला नमन हें, यश तव गातें मी जगतीं | १२७ |
| संशय कां ये नाथा, आतां | १०० |
| सखये, तव राग पुरे, गाइ गीत कोमले ! | ३२ |
| सखि, शोक आवरी चिन्ता कसली तुजला | ८० |
| सखे गे ! सुरम्य यमुना किती | १४ |
| सखे गे ! सुरम्य रजनी खरी | ९ |
| सायंकाळीं नित्य सखे ! मीं उद्यानीं जावें | २२ |
| सुरम्य स्थल हें अहा ! क्षण विसरूनि देहा पहा | ११ |
| हा पोपट विपिनीं येइ, सुस्वरें गाई | ६३ |
| हा वारा, येइ भरारा, हरुनि श्रम सारा, देइ निवारा | ६७ |
| हिंडूनी नटव्या जगांत, सखये ! | ९२ |
| हे दयाघना, कधिं ये तुजला करुणा ? | १२४ |
| हृदय विरामा ! पूजा तव करितें रामा ! | १२२ |
| हृदयाची ती तळमळ संपे कधीं न माझी तरी | ९० |
| ह्या रंगपंचमीं दंग होउनी रंग खेळुं सखया ! रे ! | ४१ |


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

REFBK-0020245
REFBK-0020245